
साप्ताहिक

# माणूस

१ जानेवारी ८३ दोन रुपये




## सर्वसामान्य शीखांना खलिस्तान नको आहे, हिंदूंशी वैरही नको आहे मग त्यांना हवे तरी काय

पंजाब दौऱ्यावर आधारित खास वार्तापत्र

पुण्याच्या विश्रामबागवाड्यात

'दत्तू बांदेकर'

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : एकूणतिसावा 39

¤

१ जानेवारी १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

। पत्ता ।

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

## श्रीमती सुलभा महाजन यांस अनावृत पत्र

# C/o उंबरठा....

प्रिय सुलभा महाजन यांसी..

'स्त्रीच्या अस्मितेचा विजय', 'अपमान पत्करण्यापेक्षा सुलभा महाजन घर सोडते हा चित्रपटाचा प्रभावी शेवट', 'या शतकातला सर्वोत्तम मराठी चित्रपट' ...या व अशाच काही वेधक शब्दांतील आपल्या 'उंबरठा' च्या जाहिराती पाहून मोठ्या औत्सुक्याने पाहण्यास गेले; पण चित्रपटाच्या सुरुवातीपासूनच आपले अबोल घुमेपण पाहून आम्ही तर स्तंभितच झालो. भरल्या संसारात आपण स्मितही करू नये– ('स्मिता' असून... पण छे छे ... विसरलेच... 'अस्मिता'च खरी !)– एवढं का 'कोंडोनी मारणारं' सासरघर खरंच द्वाड होतं? आपले पती तर प्रेमळ, समजस वाटले. ते समंजस होते म्हणूनच तर त्यांनी विवाहानंतरच्या नवलाईच्या दिवसांतही आपणास समाजकार्याच्या अभ्यासासाठी दोन वर्षे संधी दिली. पत्नीने सुवर्णपदकासह ती पदवी मिळवली याचा निश्चितच त्यांना अभिमान होता. राहत्या गावीच आपण संगमवाडीसारखा काही आश्रम काढला असता तर अवश्य पतिराजानी– पतिराजांनीच काय, जाऊबाई, समाजकार्यकर्त्या सासूबाई–साऱ्यांनीच आपणास सहकार्य केलं असतं. नुसताच ताठ चेहरा करून आपण बसू लागलो तर कस बरं कोणी समजून घेणार? 'बलात्कारप्रकरणी' सुभाष मूर्खासारखं वरळत होते; पण सुलभाताई, आपण वादविवाद करून त्यांना ते जरूर पटवून देऊ शकला असता. ते नक्कीच इतके समंजस दिसतात, की तो मूर्खपणा त्यांनी (किमान मनोमन तरी !) कबूलही करून टाकला असता. पुरुषाचा पोच खूपदा सुटतो, बोलतातच ते असे काहीवाही, पण मग आपल्या स्त्री–शक्तीचा (शिवाय पदवीचा) उपयोग काय? केवळ समाजासाठी? सुलभाताई, घर हा सुद्धा छोटासा समाजच असतो. ती पहिली पायरी, मग एकेक पायरी चढत मोठ्या समाजाकडे सहकार्याने जाता येते आणि बिनसताच हे छोटेसे विश्वही जी स्त्री सोडू पहाते ती उद्या येथला मोठा समाजही न पेलून सोडन निघून जाणार ! हे काही खरे नाही ! समाजातील, आश्रमातील, लहान मोठी दुःखे पाहून आपणास जे धक्के बसले ते पाहूनही आश्चर्याचा धक्काच बसला. अहो, आपण एवढ्या समाजकार्यपदवीधर ! आपल्या अभ्यासक्रमात मग याविषयी काडीमात्रही कुणी सागितले नव्हते का? आश्रमातील गैरप्रकार, तरुण सुदर स्त्रीचे लांबसडक केस कापून टाकणे, या गोष्टीही आपणास अपरिचित? अगदी २५–३० वर्षांपूर्वीही (म्हणजे फार जुना काळ नव्हे !) पत्नी स्वरूपसुदर म्हणून केवळ तिला विवाहोत्तर महाविद्यालयीन पाठवणारे महाभाग होते. यातल्या श्रेणी वेगळ्या असल्या तरी पुरुषी वृत्ती एकच आहे !

'आश्रमविषयक लघुपट' म्हणून मधला काही भाग जमलासा वाटतो; पण तेथेही वेडी कशासाठी? समजा, प्रथम अनाथम्हणून भरती झाली तरी चालकानी तिला वेडयाच्या इस्पितळात लगेच पाठवायला नको का? आणि मग तिला उंच ठिकाणी चढलेली दाखवून हिंदी सिनेमा फेम तमाशा कशासाठी ठिगळासारखा जोडायचा? तसेच शय्या-देखाव्यांचे ! मराठी चित्रसृष्टी 'पुढे' गेलेली दाखवण्याचे सोपे प्रयत्न !! याशिवाय आज-काल कोणताच सिनेमा चालत नसावा आणि काही म्हणा, अभिनयापासून स्वभावगुणापर्यंत सर्वांत तुमचे यजमानच सतत बाजी मारून गेलेत. परंतु... आता काळ बदलला आहे. किती तरी स्त्रिया आत्मविकासास्तव पतीपासून दूर राहू शकतात; पण म्हणून लगेच काही कुणी पती दुसरा 'संबंध' जोडत नाही. निदान आपल्या 'सुभाष'च्या बाबतही ते सारे (दिग्दर्शकाची हौस म्हणून !) निश्चितच गैरवाजवी अन्याय्य वाटते. पत्नी आश्रमात, (सुलभा

दुर्लभा ) अशा वेळी पतीला घरी असूनही 'सश्रम कारावास !' लेकीबाबतही आपण अकारण कोरड्या वाटता.फोनवरील एखाद-दुसरा 'ओक्साबोक्शी' अभिनय सोडला तर पत्रबित्रही पाठवताना आपण दिसत नाही. येताना खेळणे राहो, एवढा-तेवढा खाऊ स्टेशनवर उतरताच घ्यायचा. पोरांचे नेहमीचेच–आई गोड की खाई गोड !

आपण घर सोडून गेलात असे दिग्दर्शकाला दाखवायचेय. पण कुठे ? असा अधांतरी शेवट का ? काही सुचले नाही म्हणून? की कवितेऐसा अबोध अस्फुट वगैरे ? पण सुलभाताई, वास्तव जीवन असे अबोध अस्फुट, असूच शकत नाही. एकूण काय, दिग्दर्शकाचे मूळ हेतूच सर्वत्र फसलेले दिसतात. साधलेले नेमके उलटे वाटते, की हे पहा बायांनो, समाजकार्य करणाऱ्या स्त्रियांच्या संसाराचे असे असे धिंडवडे होतात बरं,सम्हालके रहना! नेमकं सगळं वाईट वाईट निवडून उचलून सिनेमात घातलं की समाजाचा प्रातिनिधिक चित्रपट तयार ! अशी दिग्दर्शकमहाशयाची कल्पना दिसते आणि तसा स्त्रियाच्याही दृष्टीने हा चित्रपट प्रातिनिधिक होऊच शकत नाही. श्रीमंत, ताठ ( र ! ) मानेने केवळ बगिच्यात फिरणाऱ्या सूनबाईंचा चित्रपट असू शकेल. आम्हा सामान्य संसारी स्त्रियांना भावभावनाना एवढे जपत नि कुरवाळत बसायला वेळच कुठे आहे ? या धकाधकीतूनच, धडपडून जमेल ते करायचे. केवळ घर सोडून जाणे म्हणजे मोठा विजय की काय ? आणि तशी वेळ तरी का यावी ? सुलभाताई, आपणही याला अजिबात जबाबदार नाही ? पहा, विचार करा... ( तो तर आपण नेहमीच जब्बर करताना दिसता ! ) ......पण आता वेळ गेली. उंबरठा ओलांडला गेला !

पुणे —सौ. अंजली ठकार

मुक्काम जळगाव

# कवितेचा दिवस

१९ डिसेंबर १९८४ हा दिवस जळगाव जिल्ह्यातील साहित्यरसिकाना पर्वणीचा ठरलेला दिवस ! कायमचा स्मरणात राहील असा ! विशेषत: त्या दिवशी धुंद झालेली संध्याकाळ, पश्चिमेला मावळतीला गेलेला सूर्य ! गुलाबी संध्याकाळ ! अशा या धुंद वातावरणात महाराष्ट्राला सुपरिचित असलेले कवी ना. धों. महानोर याचे काव्यवाचन ! त्यांचे काव्यवाचन म्हणजे पर्वणीच! म्हणूनच मी दुपारच्या ३–५० च्या एस. टी. ने जामनेरहून जळगावी गेलो आणि त्या काव्यसंध्येत अक्षरश: न्हाऊन निघालो. कार्यक्रमासाठी भारत कृषक समाजाच्या सभागृहात प्रवेश केल्याबरोबर व्यासपीठाने माझे मन आकर्षित केले. साधी भारतीय पद्धतीची भव्य नजरेत भरणारी आणि उठून दिसणारी बैठकव्यवस्था, व्यासपीठाच्या मागील भव्य निळ्या पडद्यावरील खेडयाची मराठी कविता ही सोनेरी अक्षरे डोळे दिपवून टाकणारी होती. त्याखालीच ना. धों. महानोर यांचं पाढऱ्या ठाशीव अक्षरातील कवी उत्तम कोळगावकरानी कोरलेले नाव मोठे उठून दिसत होते ! व्यासपीठाच्या डाव्या बाजूला निसर्गकन्या बहिणाबाईंचा हार घातलेला फोटो !

उत्सुकता शिगेला पोहोचली होती. पहिल्याच आणि सलामीच्या या कार्यक्रमाची सुरुवात जळगावपासूनच ना. धों. महानोरानाही तितकीच उत्सुकता आणि आतुरता. बरोब्बर सहा वाजून सोळा मिनिटांनी ना. धों. महानोर आले. शांत आणि मंगलमय वातावरणात ठीक ६–३० ला व्यासपीठावर स्थानापन्न झाले. सभागृहातील सुमारे पाचशे काव्यवेड्या रसिकानी टाळ्यांच्या गडगडाटात त्यांचे स्वागत केले.

सुरुवातीलाच महानोरानी खानदेशभूषण ठरलेल्या निसर्गकन्या बहिणाबाई याच्या स्मृतीला अभिवादन करून आपली या कार्यक्रमामागील भूमिका आणि संकल्प मोजक्या आणि नेटक्या शब्दात विशद केला. महानोर साऱ्या महाराष्ट्राला हाडाचे शेतकरी अन् रानाचे कवी म्हणून परिचित ! जळगावपासूनच या कार्यक्रमाला का आपण सुरुवात केली याविषयी स्पष्टीकरण करताना जळगाव जिल्ह्याच्या साहित्यिक महान परंपरेचा त्यानी उल्लेख केला. केशवसुतांपासून ते मर्ढेकरांपर्यंतचा उल्लेख समर्पक वाटला ! या श्रेष्ठ परंपरेचे पाईक ना. धों. महानोर. आजचा दिवस हा आपण '**कवितेचा दिवस**' पाळू या असं सांगून, निसर्गकन्या बहिणाबाईंचे आपणही काही देणं लागतो, हे देणं संपूर्ण प्रमाणात नाही तरी अंशत: का होईना देऊन उतराई व्हावं या हेतूनं, या कार्यक्रमातून जी काही रक्कम जमेल तिचा 'ट्रस्ट' स्थापन करून, निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी याच्या स्मृतीनिमित्त एखाद्या कवीच्या कवितासंग्रहाला बक्षीस देण्यापेक्षा त्या कवीला रोख रकमेच्या स्वरूपात बक्षीस देण्याचा मनोदयही सुरुवातीलाच महानोरांनी सागून टाकला.'**ही बहिणाबाईंची झोळी आहे**', '**या नभाने या भुईला दान द्यावे**' या भावनेनं गोळा झालेले पैसे आणि त्यांचं हे पारितोषिक सामान्य रसिकाचं हे पारितोषिक ! खानदेशच्या परंपरेला शोभून दिसणारं पारितोषिक ! जळगावपासून शुभारंभ. दुसरा आयोजित कार्यक्रम नागपूरला अन् त्यानंतर उभ्या महाराष्ट्रभर ठरलेल्या तारखा यांचा उल्लेख करून नागपूरच्या कार्यक्रमाचे, कार्यक्रम होण्याआधीच जमलेले एकूण रुपये १०,०१५ जमा झाल्याचे सांगितल्याबरोबरच टाळ्यांचा प्रतिसाद. हा सन्मान माझा नसून बहिणबाईंचा आहे, असे कृतज्ञतापूर्वक उद्‌गार महानोरानी काढले. शुभारंभाच्या या कार्यक्रमाला असं काही तरी हृद्‌गत सांगितलं पाहिजे.या भूमिकेतून हा सुरुवातीचा प्रास्ताविक प्रपंच केल्याचा आदरपूर्वक उल्लेख महानोरांनी करून प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात केली.

१८८० ते १९८० या शतकातील निवडक ११ कवींच्या निवडक कविता महानोरांनी आपल्या नेहमीच्या खड्या आवाजात सादर केल्या. जमिनीला माय-माउली संबोधून, महानोरांनी बहिणाबाईंची 'धरित्रीला दंडवत' या कवितेनं कार्यक्रमाला

सुरुवात करून धरणीमातेला दंडवत केले. नंतर बहिणाबाईंच्याच 'पेरणी' आणि 'झोका' या कविता बहारदार पद्धतीनं सादर केल्या. बहिणाबाईंच्या झोक्यावर भरारी मारून झाल्यानंतर बालकवींच्या 'औदुंबर', 'एका खेड्यातील रात्र', 'उदासीनता' या कविता एका विशिष्ट मूडमध्ये म्हणून सभागृहात खरोखरच गंभीरता आणली. राजकवी यशवंत यांची हुरहुर लावणारी 'संध्याकाळची कविता' आणि 'प्रेमाची दौलत' या कविता खूपच दाद देऊन गेल्या. **'खेड्यातच माझं साधेपण टिकेल'** असं सांगणाऱ्या ग. ह. पाटलांच्या दोन कविता, ग. ल. ठोकळांचं 'जात्यावरचे गाणे' आणि महा ओळींची 'सुनीता' खूपच भाव खाऊन गेली. कविता आणि गाणं यांचं अतूट नातं सांगणारी कवी ना. घ. देशपांड्यांची 'नदीकिनारी' ही कविता–

**सळसळली ग तुझी हिरवी साडी**
**तिनेच केली तुझी चहाडी**

असं म्हणत महानोरांच्या आवाजात ताल धरू लागली. महाराष्ट्र साहित्यशारदेच्या मंदिरातील कोंदण आणि शब्दप्रभू ग. दि. माडगूळकर यांची 'मृगाची कविता' अन् 'रानातली अंगाई'ने रसिकांना अंगाई करावयास लावली. "**सुंदर पुस्तकांचं गाठोडं मृत्युसमयी द्या आणि त्यात मात्र कवितेचा जास्त भाग असू द्या.**" असं म्हणून कवितेला जिवापाड जपणारे श्री. रघुनाथ यांच्या 'उन्हात बसली न्हात' आणि 'स्वप्न' या दोन कविता टाळ्या घेऊन गेल्यानंतर इंदूररहिवासी परंतु महाराष्ट्राला फारसे परिचित नसणारे मराठी कवी भालचंद्र लोवलेकरांची कविता मोठ्या ठसक्यात महानोरांनी पेश केली. ग्रामीण साहित्याचे पुरस्कर्ते डॉ. आनंद यादव यांच्या खेड्यातील दारिद्र्य आणि दुःख सांगणाऱ्या दोन कविता महानोरांनी आपल्या ढंगात सादर केल्या.

आणि शेवटी ना. धों. महानोरांनी स्वतःच्या अगदी अलीकडील कोऱ्याकरकरीत दोन कवितांची मेजवानी आम्हा रसिकांना दिली· "आम्ही राजे या मातीचे, आम्ही राजे या शेतीचे, मऱ्हाठमोळी मातीचे" ही कविता हृदयाला स्पर्श करणारी तर होतीच; परंतु शेतकरी आंदोलनाच्या वेळी पिंपळनेर बसवंतला झालेला गोळीबार याची आठवण करून देणारी होती. असा हा निसर्गवेडा धुंद कवी आमदार असल्याने मुंबईला फ्लॅट देऊ केला तरी न घेणारा, आपल्या पळसखेड्याचे शेतात वास्तव्य करणारा, मातीशी इमान टिकविणारा, आपल्याच पत्नीला "**तुला रग पांघरावयाचा असेल तर तू खुशाल पांघर, मला मात्र माझी 'गोधडी' (आईची माया, वडिलांचे प्रेम आणि पत्नीची प्रीति यांचा संगम असणारी) पांघरू दे!**" असं म्हणणारा, खेड्यातील संस्कृतीवर जिवापाड प्रेम करणारा अन् खेड्यातील साधेपण टिकवलं की 'माणूस' आणि माणुसकी टिकेल अशी श्रद्धा बाळगणाऱ्या या कवीनं निरोप घेतला तो मात्र या दोन ओळींनी–

**गारठ्याची रात्र, थंडाई हवेला !**
**मी इथं कवटाळून माझ्या गोधडीला ! !**

निरोप घेतला ८ वाजून १० मिनिटांनी "कविता प्रत्येकानं अनुभवली पाहिजे" याची प्रचीती तिथं आली. काव्यवाचनाच्या या तिकिट लावून (प्रत्येकी ५ रु.) केलेल्या कार्यक्रमाला जळगावकरांनी मात्र खरोखरच मनापासून आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मी मात्र असा हा अस्सल गावरान अन् खानदेशी मेवा खाऊन तृप्तीचा ढेकर देऊन ९च्या एस्. टी.ने १०-१५ला जामनेरला परतलो. स्वप्नातही त्या ओळी गुणगुणत होतो.

**गारठ्याची रात्र थंडाई हवेला।**
**मी इथं कवटाळून माझ्या गोधडीला ॥**

–प्रा. घनःश्याम मोहरीर

---

कामगार वृत्त

# अनुभव
## मफतलाल कामगारांचा

कळवा येथील मफतलाल इंजिनिअरिंग कारखाना एक वर्षाच्या विश्रांतीनंतर अखेर पूर्ववत सुरू झाला आहे. 'मफतलालचे चार हजार कामगार वाऱ्यावर!' अशा शीर्षकाचा एक लेख २४ एप्रिल ८२ च्या 'माणूस' मध्ये मी लिहिला होता. कारखाना बंद झाल्याने या कामगारांना कोणी वालीच राहिला नव्हता. मान्यताप्राप्त युनियनचे नेते मनोहर कोतवाल परदेशात जाऊन बसले होते, तर कामगारांना लढण्याची हाक देणारे नेते खासदारकीच्या निवडणुकीत मग्न होते! म्हणूनच मफतलालची कोंडी कोण व कशी फोडणार असा प्रश्न त्या वेळी निर्माण झाला होता.

अखेर ही कोंडी न्यायालयानेच फोडली. मफतलालच्या एकूण प्रकरणात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम. एल. पेंडसे यांनी जो निर्णय दिला तो कामगार चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला पाहिजे. पेंडसे यांनी आपल्या महत्त्वपूर्ण निकालाद्वारे मफतलालची गेले वर्षभर चाललेली कामकाज स्थगिती ही कायद्याने टाळेबंदी नव्हे, असा निर्णय दिला. त्याचबरोबर औद्योगिक न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. पी. बी. तलाठी यांनी मफतलाल इंजिनियरिंग विरुद्ध दिलेला निकाल रद्दबातल ठरविला. पेंडसेंच्या महत्त्वपूर्ण निकालाने अखेर या प्रकरणातील कोंडी फुटली गेली आणि चार हजार कामगारांसमोर फक्त एकच प्रश्न राहिला–कामावर जावयाचे की नाही? आणि सरतेशेवटी कामगार आपणाला बाजूला सारून कामावर जाण्याच्या तयारीस लागले आहेत हे पाहून डॉ. सामंतांनीच सरळ शरणागती पत्करली आणि कामगारांना कामावर जाण्याचा आदेश दिला!

न्यायमूर्ती पेंडसे यांनी आपल्या ३५ पानी निकालपत्रात डॉ. सामंतांच्या कार्यपद्धतीवर कडक ताशेरे ओढले आहेत. पेंडसे आपल्या निकालात म्हणतात की, ज्या दिवशी काही पुढारी आणि त्यांच्या मूठभर पाठीराख्यांना अशी जाणीव होईल की, हिंसाचार व हडेलहप्पी या कारवायांपासून काहीही निष्पन्न न होता उलट त्यामुळे असहाय्य कामगारांना अतोनात हालअपेष्टा सहन कराव्या लागतात तो दिवस कामगार-चळवळीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदावा लागेल! ते पुढे म्हण-

तात की, कोणतीही मागणी नसताना केवळ कायद्याने मान्यताप्राप्त युनियनला डावलून प्रतिवादी क्र. १ च्या युनियनला (डॉ. सामंत यांच्या) मान्यता द्यावी या हट्टापायी कामगाराना कामापासून वंचित व्हावे लागते, या गोष्टीचे सदरहू बाब म्हणजे मूर्तिमंत उदाहरण आहे. युनियनला मान्यता मिळविण्यासाठी कायद्यात विशिष्ट कार्यपद्धतीची तरतूद आहे आणि कामावर जाऊ इच्छिणाऱ्या कामगाराना धमक्या देऊन व धाकधपटशा दाखवून अगर यंत्रसामुग्रीची नुकसानी करून अशी मान्यता मिळवता येत नाही.

पेंडसेंनी आपल्या निकालात जे मुद्दे मांडले आहेत ते खरोखरच विचार करण्यासारखे आहेत. तशी मफतलालच्या कामगाराची काय मागणी होती म्हणून त्यांना वर्षभर उपासमार सहन करावी लागली ? –तशी त्यांची मागणी कोणतीच नव्हती. कारण मान्यताप्राप्त युनियनचे नेते मनोहर कोतवाल यांनी १९ फेब्रुवारी १९८१ रोजी व्यवस्थापकाबरोबर वेतनश्रेणीचा एक करार करून कामगारांच्या पगारात १२५ रुपयापासून ३७५ रुपयापर्यंत वाढ घडवून आणली होती. त्याचे फायदे कामगाराना मिळूही लागले होते. या कराराची मुदत ३१ मार्च १९८४ पर्यंत असल्याने मागण्याबाबतचा कोणताच प्रश्न नव्हता. तरीही बोनसबाबत असंतुष्ट असलेल्या काही कामगारानी झुंझार कामगारनेते डॉ. सामंत यांना गाठले आणि त्याचे आगमन या कारखान्यात करविले. डॉ. सामंत आल्याने कामगारात एक जोष चढला होता. या जोषातच त्यांनी 'मान्यताप्राप्त युनियनविरुद्ध आंदोलन उभे केले. त्यासाठी कंपनीच्या आवारात त्यानी डॉ. सामंताच्या नावाचा जयजयकार केला, मेन ऑफिसवर एक मोर्चा काढला, काही अधिकाऱ्यांना घेरावही घालण्यात आला. हे सर्व कंपनीच्या नियमात बसत नसल्याने कंपनीने ४२ कामगारांना सस्पेंड केले ' त्या कामगाराना लागलीच कामावर घ्या नाही तर आम्हास पुढील कृती करावी लागेल' असा इशारा डॉ. सामंतांनी दिला; पण व्यवस्थापकानी त्याकडे दुर्लक्ष केल्याने कामगारांनी 'काम बंद' आंदोलन सुरू केले. या सर्वांचा उत्पादनावर भयंकर परिणाम झाल्याने कंपनीने ४ डिसेंबर १९८१ पासून टाळेबंदी घोषित केली.

कंपनी बंद होऊन आज पुरते वर्ष लोटले. हे वर्ष कामगारानी कसे घालविले असेल, ते कशाच्या आधारावर जगले असतील हे पाहण्यासारखे आहे. बाहेर बसण्याची कामगाराची जराही तयारी नव्हती; पण युनियनने हे सर्व प्रकरण न्यायालयात नेल्याने गप्प बसण्यावाचून कामगार काहीच करू शकत नव्हते. न्यायालयात तारखा वरचेवर पडत होत्या. विचारे कामगार निकालाची वाट पहात होते. अखेर औद्योगिक न्यायालयाचे न्यायमूर्ती तलाठी यांनी ११ ऑक्टोबरला जो निकाल दिला त्याने कामगार भारावून गेले. कंपनीने केलेली टाळेबंदी अयोग्य असल्याने बंद कालातील ५० टक्के पगार कामगाराना देऊन कंपनी लागलीच सुरू करावी असा निर्णय तलाठीनी दिला. तलाठीच्या निर्णयाने निराश झालेला कामगार पुन्हा आनंदी बनला. ५० टक्के पगार मिळणार या बातमीने तो डॉ. सामंतावर खूष झाला. काही कामगारानी डॉ.सामंतांच्या विजयाबद्दल तर पेढेही वाटले !

पण हा आनंद क्षणिक ठरला. तलाठीच्या निर्णयाचा मान राखून कंपनीने कारखाना उघडला; पण कामगाराकडून हमीपणाची मागणी केली. डॉ. सामंताना हमीपणाची मागणी मान्य नसल्याने त्यानी कामगाराना त्यापासून बाजूस ठेवले. कंपनीने मग उच्च न्यायालयात धाव घेतली आणि पेंडसेंनी मफतलालचे हे प्रकरण निकालात काढले.

'आपलाच विजय होणार' हा टेंबा डॉ. सामंताचे कामगार मारत होते; पण दुर्दैवाने त्याच्या पदरी निराशा आली. औद्योगिक न्यायालयाच्या निवाड्यानंतर कामगार कामावर गेले असते तर त्याचे हे नुकसान तरी झाले नसते; पण तेवढे शहाणपण कोणालाच सुचले नाही ! विजय आपलाच... या धुंदीत ते नाचत गेले आणि अखर त्याना मान खाली घालून एकही पैसा न मिळता आतमध्ये जावे लागले!

या पराजयाचे खापर डॉ. सामंतांच्या माथी मारून प्रश्न सुटत नाही आणि तशी असल्या पराभवाची डॉ. सामंत फारशी कदरही करीत नाहीत; पण कोणत्याही मागण्या नसताना किती काळ भिऊन आपण एखाद्याच्या पाठीमागे राहावयाचे हा विचार कामगारानीच आता करावयास हवा. मफतलालचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी लढे दिले पाहिजेत. नुकसान कामगार-नेत्याचे होणार नसते तर आपले–ही जाणीव मनी बाळगूनच त्यानी योग्य वेळी योग्य ते निर्णय घेतले पाहिजेत. अन्यथा आपल्या पायावर आपणच धोंडा पाडल्याची खत आयुष्यभर होत राहील !

—मोहन शं. कुलकर्णी


**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल ! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलाच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

**—रा. ग. जाधव**

(केसरी, रविवार, ६–१२–८१)

# आंबेडकर भारत

लेखक : **बाबुराव बागुल**

**राजहंस प्रकाशन, पुणे.** मूल्य : २० रुपये.

मुक्काम धुळे–शहादे

# आम्ही श्रमिक संघटनेचा राजीनामा का दिला व सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षात का गेलो ?

आदिवासी व इतर श्रमिक बंधुभगिनींनो !

भुरीबाई व रायसिंग ठाकरे हे इंदिरा काँग्रेसमध्ये गेले असा व इतर खोटानाटा प्रचार करून श्रमिक संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते आमची बदनामी करायचा प्रयत्न करीत आहेत, म्हणून आम्ही सत्य परिस्थिती तुमच्यापुढे मांडत आहोत.

सौ. गुलीबाई रायसिंग ठाकरे ही तिच्या तान्ह्या मुलीच्या औषधोपचारासाठी फेब्रुवारी महिन्यात श्रमिक संघटनेच्या शहादा ऑफिसवर गेली. ता. १२–२–८२ ला रात्री तिला एकटीला पाहून तिच्यावर श्रमिक संघटनेच्या एका नेत्याने बलात्कार करायचा प्रयत्न केला. तिने बाहेर पळत येऊन बाहेर झोपलेल्या विठ्ठल पटेल या कार्यकर्त्याला उठवलं आणि ही घटना सांगितली; पण त्याने तिला गुपचूप झोपायला सांगितले. तिने सकाळी ही घटना इतर प्रमुख कार्यकर्त्यांना सांगितली; पण त्यांनी तिलाच दहशत घालून दोन महिने ऑफिसमध्ये डांबून ठेवले. नंदुरबार तालुक्यातील धुळवद या तिच्या नवऱ्याच्या गावी जाऊ दिले नाही.

तेव्हा कॉ. रायसिंग मटाणे शेतमजूर परिषदेच्या प्रचारसंघटनेत गुंतलेला होता. गुलीबाई २ महिन्यांनी शहाद्याहून निसटून धुळवदला आल्यानतर त्याला ही घटना कळली. मग श्रमिक संघटनेच्या सर्व शाहू व आदिवासी नेत्यांनी त्याला संघटनेची बदनामी होईल अशी भीती घातली. १२०० रु. ‘छिनाल तंटा’ देऊ करून व इतर आमिषे दाखवून प्रकरण मिटवून टाकायची गळ घातली; पण त्याने स्त्रीमुक्तीच्या रिवाजाप्रमाणे अपराध्याला शासन करायच्या मागणीचा आग्रह सोडला नाही ! कॉ. भुरीबाईला हे जुलैनंतर कळले. तिने कॉ. रायसिंगची बाजू घेऊन अंबरसिंग-महाराजांच्या परंपरेला काळिमा न लावायचा आग्रह धरला. मग, श्रमिक संघटनेच्या शाहू व आदिवासी पुढाऱ्यांनी अपराध्याला फरार करून त्याला हाकलून दिल्याची अफवा उठवली आणि आम्हा दोघावर खोटेनाटे आरोप ठेवून आम्हाला श्रमिक संघटनेतून काढून टाकायचा निर्णय घेतला.

अपराधी नेता हा सोशलिस्ट युनिटी सेंटरचा सभासद आहे. कुमार शिराळकर, प्रकाश सामत, रवीन्द्र मोकाशी, जयसिंग माळी इ. २ वर्षांपासून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झालेले आहेत आणि त्यांनी श्रमिक संघटना माकपच्या सिटूला जोडून टाकलेली आहे. विजय कान्हेरे, वाहारू सोनवणे, रूपसिंग ठाकरे व नारायण हे मे ८२ मध्ये श्रमिक मुक्ती दलाचे सभासद झाले आहेत. या सर्व डाव्या पक्ष व संघटनांच्या कार्यकर्त्यांनी ब्राह्मण गुन्हेगाराला संरक्षण देण्यासाठी व गुलीबाईवर त्याने केलेला अत्याचार आम्हा आदिवासींना शिक्षा देऊन दाबून टाकण्यासाठी अमंगळ एकजूट केलेली आहे. या भट व भटाळलेल्या आदिवासी नेतृत्वाची मजल १५ नोव्हेंबरला कॉ. भुरीबाईच्या घरावर मोर्चा काढण्यापर्यंत गेली आहे या मोर्चाचे नेतृत्व वाहारू, हिरकणी वाहारू, चंद्रसिंग इत्यादी कार्यकर्त्यांनी केले !

कॉ. भुरीबाईची लोकसभा निवडणूक सोडली, तर ७७ सालापासूनच्या बाकी सर्व सार्वत्रिक निवडणुकात श्रमिक संघटनेच्या या नेतृत्वाने इंदिरा काँग्रेसला छुपा पाठिंबा दिलेला आहे. हे नेतृत्व भारतीय जनता पक्षाशी राजकीय दोस्ती करणाऱ्या माकपमध्ये गेल्यामुळे त्याने जातिव्यवस्थाविरोधी लढ्याशी बेइमानी केलेली आहे. डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोडमधील हक्क आदिवासी स्त्रियांना द्यायच्या मागणीला या नेतृत्वाचा विरोध असल्यामुळे ते स्त्रीमुक्ती-विरोधी झालेले आहे. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाला मागील वर्षापासूनच्या भीषण दडपशाहीत एकाकी पाडून व फोडून त्याला सरकारने चिरडायला हे नेतृत्व मदत करीत असल्याने ते डाव्या लोकशाहीवादी आघाडीचे वास्तवात विरोधक झालेले आहे. याउलट, एकाधिकारशाहीवादी इं. कॉं. व जातिव्यवस्थावादी भाजप, यांच्या विरोधात, भारतीय दलित, आदिवासी व इतर श्रमिकांची वर्गजातिस्त्रीदास्यअंतक मुक्तिआघाडी बांधायचा विचार व व्यवहार केवळ सकपपाशीच आहे अशी आमची खात्री पटलेली आहे. म्हणून, श्रमिक संघटनेच्या शहादे व नंदुरबार तालुक्यातील २२ स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांसह आम्ही श्रमिक संघटनेचा राजीनामा दिलेला असून सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षात ता. २०–११–८२ ला प्रवेश केलेला आहे.

यापुढे आम्ही सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेतर्फे ग्रामीण कष्टकऱ्यांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अन्याया-विरुद्ध संघटित लढे उभारू आम्ही सत्यशोधक कष्टकरी महिला सभेमार्फत हिंदू कोडचे शाहू स्त्रियाना मिळालेले हक्क आदिवासी स्त्रियाना मिळावेत, स्त्रियावरील अत्याचारांना विरोध, यासारखे स्त्रीमुक्तीचे संघटित लढे उभारू. एकाधिकारशाहीवादी इं. कॉं. व जातिव्यवस्थावादी भाजप या समान शत्रूविरुद्ध आम्ही वर्गजाति–स्त्रीदास्यअंतवादी डावी व लोकशाहीवादी आघाडी उभारू. माकप, श्रसं, सोयुसें व श्रमुद यांच्याशी आमचे कितीही मतभेद असले, तरी आदिवासी, दलित व इतर श्रमिक जनतेच्या शोषणपीडनविरोधी सर्व लढ्यासाठी आम्ही त्यांच्याशी एकजूट करू.

**मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव दिलेच पाहिजे !**

**वर्गजातस्त्रीदास्यअंताच्या मुक्तिलढ्याचा विजय असो ! मार्क्सवाद फुले–आंबेडकरवाद झिंदाबाद !**

**आपले,**

**कॉ. भुरीबाई शेमळे, चिटणीस, स. क. प. ची शहादे तालुका समिती**

**कॉ. रायसिंग ठाकरे, चिटणीस, स. क. प. ची नंदुरबार समिती.**

प्रकाशक– कॉ. शरद् पाटील, सरचिटणीस, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष

## खालसा करेगा राज

# हिंदू - शीख ऐक्यावर पहिला घाव काँग्रेसनेच घातला !

### दिल्ली, चंदीगड, अमृतसर, जालंदर, लुधियाना, पठाणकोट
### पंजाब-दौऱ्यावर आधारित खास व प्रदीर्घ वार्तापत्र — बंडू ठाणेकर

आशियाई सामने निर्विघ्नपणे पार पडले. भारतीय संघानी नेहमीप्रमाणे निराशा केली हे खरं असलं, तरी ज्या पद्धतीनं आशियाई स्पर्धांचा कार्यक्रम संयोजकांनी पार पाडला, त्यामुळं भारताच्या प्रतिष्ठेत मानाचा तुरा खोवला गेला ह्यात वाद नाही. अकालीची धमकी, तिचा एक, सफदरजंगवर लावला गेलेला अर्थ, त्याला मिळालेली प्रसिद्धी, ह्यामुळे हे सामने कसे पार पडतात ह्याविषयी साशकता निर्माण झाली होती. त्यामुळंच ह्या कार्यक्रमांच्या पूर्ततेला राजकीय प्रतिष्ठाही प्राप्त झाली होती. अमेरिकन वार्ताहरांनी तर म्हणे, ह्या राजकीय बाजूलाच अमेरिकन वृत्तपत्रातून महत्त्व दिलं. प्रत्यक्ष स्पर्धा, त्यासाठी भारतातली पूर्वतयारी वगैरे वृत्ताना तिथे प्रसिद्धी मिळालीच नाही. मिळाली ती फक्त 'स्पर्धा उधळून लावण्याच्या अकाली मनसुब्याना !' (??) व त्यावर इंदिराजींनी मिळवलेल्या राजकीय विजयाला !

राजधानीतल्या राज काँग्रेस वर्तुळातही ह्याच गोष्टीचा बोलबाला अधिक होत आहे त्यापुढे बिचाऱ्या बुटासिंग आणि कंपनीने केलेल्या अटीतटीच्या धडपडीला गौण स्थान मिळत आहे. अर्थात भारतीय क्रीडाविश्व अशा उपेक्षेनं नेहमीचंच पंगू झालेलं आहे. प्रत्यक्ष सामने चालू असतानाही जुन्या जाणत्या क्रीडापटूपेक्षा, क्रीडातज्ज्ञापेक्षा, अधिकाऱ्यांचं लक्ष पंतप्रधान, राजीव गांधी, अमिताभ बच्चन ह्यांच्यावरच जास्त असायचं, असं सामने बघितलेल्या अनेकांनी मला सागितलं. साहजिकच अशा परंपरेत, अकाली विरुद्ध केंद्रसरकार ह्या प्रश्नाला महत्त्व मिळून त्यातल्या इंदिराजींच्या विजयालाच आशियाई स्पर्धांच्या यशस्वी सांगतेचं श्रेय मिळावं ह्यात काही नवल नाही.

'......हे यशही इंदिराजींनी खुल्लंखुल्ला युद्ध खेळून, खेळाचे नियम पाळून मिळवलेलं नाही......' जेलमधून सुटल्यानंतर बागला साहिब गुरुद्वाराच्या आवारात माझ्याशी बोलताना शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक कमिटीचे अध्यक्ष गुरुचरणसिंग तोहरा म्हणाले. त्यांच्या मते, '...सामने उधळून लावण्याचा किंवा हिंसात्मक आंदोलनाचा आमचा विचारच नव्हता. तसा आदेश मोर्चाचे प्रमुख लोंगोवाल ह्यांचाही नव्हता. घटनात्मक पद्धतीने शांततामय निदर्शनं करण्याचाच आमचा विचार होता. लोकशाही राजवटीत प्रत्येकाला बहाल असलेला हा अधिकार आम्हाला नाकारण्यात आला. शिखांना दुसऱ्या दर्जाची, मानहानिकारक वागणूक मिळते ह्याचं हे एक स्पष्ट उदाहरण आहे. गेल्या पंधरा दिवसात एकूणच शीख जमातीला अत्यंत मानहानी पत्करावी लागली. दिल्लीला शीख निघाला आहे—पकड त्याला, टाक तुरुंगात ! चौकशी नाही, कारण नाही—काही नाही. ह्यातनं मुलंबाळं सुटली नाहीत, स्त्रिया सुटल्या नाहीत, म्हातारी-कोतारी, आजारी मंडळीही सुटली नाहीत !

'......हरयाणा-दिल्लीच्या सीमा रेषांवर अशा तऱ्हेचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता की, तेवढा आतरराष्ट्रीय सीमा-रेषावरही नसावा ! रेल्वेगाड्या, बसेस, खाजगी गाड्या, बैलगाड्या रस्त्यावर मध्येच थाबवायच्या. प्रत्येक माणसाची झडती घ्यायची. दाढी आणि निळी पगडी दिसली की त्याला उतरवायचं. घरी परत जायला सागायच. दिल्लीत जायला मिळणार नाही असं बजावायचं. नाही ऐकलं तर उचलायचं आणि जेलमध्ये टाकायचं. हा प्रकार सर्रास चालू होता...'

सरदारनी निर्लेपकौर ह्या माजी खासदार. बिहारमधल्या पटनासाहिब गुरुद्वारच्या अध्यक्षा. पेप्सूचे माजी मुख्यमंत्री ग्यानीजी रारेवाला ह्यांच्या सरदारनी निर्लेपकौर ह्या सुपुत्री. मी 'बागलासाहिब' मध्ये गुरुचरणसिंग तोहरा, माजी आमदार हाजी अन्वरखान (हेही अकाली आंदोलनात तुरुंगात होते). माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल आदींशी बोलत असताना ह्या सरदारनी तुरुंगातून सुटून आल्या. लोंगोवालानी अमृतसरमध्ये 'दिल्लीतल्या मोर्चाची' घोषणा करताच ह्या सरदारजीना त्यांच्या घरातून अटक करून जेलमध्ये टाकण्यात आलं होतं. त्यांच्या मते दिल्लीतल्या शिखाना तर ह्या काळात फारच त्रास झाला......' त्याना स्वातंत्र्य असं उरलच नाही. क्रीडाग्रामाजवळ किंवा त्या बाजूला वा विविध स्टेडियम्सच्या बाजूला फिरकलं तरी त्याना हटकलं जायचं. थोडं बोललं तरी उचलून गजाआड .....दिल्लीतला प्रत्येक शीख म्हणजे 'संशयास्पद' व्यक्ती असाच आभास केंद्रसरकारनं निर्माण केला होता......'

'......खरं तर आम्ही काही आततायीपणा करण्याऐवजी केंद्रसरकारनंच आमच्या विरुद्ध आततायी हिंसात्मक धोरण अवलंबलं असं मी म्हणेन !' आमच्या चर्चेत मधेच भाग घेताना श्री. प्रकाशसिंग बादल म्हणाले,

'... ... आमच्याशी चर्चेचं नाटक चालू ठेवून एकीकडे आमची नाकेबदी करण्याचा धूर्त डाव केंद्रशासन खेळत होतं. दिल्लीत आमची बोलणी कुठेच यशस्वितेच्या दिशेने पुढे सरकत नसताना, केंद्र-अकाली समझौत्याच्या वावड्या केन्द्रानं उठवल्या. खास विमानानं आम्ही अमृतसरला करारावर सह्या आणायला जाणार अशा कंड्याही पसरवल्या अपेक्षा ही की, त्या काळात शिखांनी गाफील रहावं व केन्द्राने नाकेबदी पूर्ण करावी. प्रत्यक्षात इंदिराजींनी कुठल्याही प्रकारे तडजोड व्हावी अशा हालचाली केल्या नाहीत. आमचे तसे प्रामाणिक प्रयत्न असूनही ! अर्थात केन्द्राने चालवलेल्या डावपेचाची कल्पना आम्हाला होती आणि खरोखरच आम्हाला काही आततायी मार्ग अवलंबायचे असते तर ते आम्हाला फारसे अवघड नव्हतं. केन्द्राने स्वीकारलेल्या डावपेचांना तोड देऊनही ते शक्य होतं; पण आमची तशी इच्छाच नव्हती. आम्हाला शांततेनंच हा लढा चालवायचा आहे. लोंगोवालासह आम्ही सर्वांनी हे वारंवार स्पष्टही केलं आहे... आणि म्हणूनच म्हणावंसं वाटतं की, आततायीपणा केला तो केन्द्रसरकारनं ! हिंसात्मक मार्ग अवलंबले ते केन्द्रसरकारनंच !

### सगळी नाटकंच

'... ह्या जहाल–मवाळ किंवा आततायी आणि शांत असे अकालीमध्ये दोन गट असल्याच्या आरोपाचीच मला गंमत वाटते. वास्तवात अकाली सगळे एक आहेत. ते शांतताप्रिय आहेत आणि त्यांच्यात असे काही गट आहेत हेच मुळी साफ खोटं आहे आमच्यातला आततायी गट हिंसाचार करतो, दबाव आणतो ह्या काँग्रेसी राज्यसरकारने, हिंदूंच्या वर्चस्वाखाली असलेल्या पंजाबातल्या वृत्तपत्रसृष्टीने निर्माण केलेल्या आपमतलबी कल्पना आहेत. लोकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा तो एक प्रकार आहे– पंजाब सरकारने अकालींवर खुनाच, दंगलीचे आरोप ठेवून एकूण पाच खटले गेल्या दोन-तीन महिन्यात भरले. ह्यातले बहुताश खटले हिंदू न्यायाधिशांपुढे चालले. ह्या पाचही खटल्यात सर्व अकाली निर्दोष सुटले. ह्यातले तीन खुनाच्या आरोपाखाली होते, एक लुटालूट–जाळपोळ वगैरे व एक बॉम्बस्फोटाचा. मुळात हे खटले,घटनाच बनावट होत्या' हाच ह्या न्यायालयीन प्रकरणाचा अन्वयार्थ.' पंजाबातल्या अत्याचाराविषयी असं सांगून गुरुचरणसिंग तोहराजींनी पुढे आव्हान केलं की, 'दिल्लीत आशियाई सामन्यांच्या वेळी जे काही लहान-सहान प्रकार घडले त्यांचीही न्यायालयीन चौकशी व्हावी. माझी खात्री आहे हेही प्रकार 'नाटकं'च होती असं सिद्ध होईल...!'

'... अशी नाटकं पंजाबात प्रत्यही घडत आहेत. दरबारासिंग राज्यकारभाराऐवजी अशा नाटकातच जास्त रस घेतात आणि त्यातनं प्रसिद्धीमाध्यमं वाटेल तशी राबवून केंद्रसरकारला बनवत राहतात, केंद्रही त्यात 'गुमराह' होतं; एवढंच नाही तर, अशा नाटकांना दिल्लीतही परवानगी देतं...'

थोडक्यात अकाली नेत्यांच्या मतानुसार आशियाई खेळांच्या वेळी अकाल्यांविरुद्ध जी नाकेबंदी केली गेली त्याची आवश्यकताच नव्हती. अकाली तसे शांतच होते. त्याचा देखावा केला तो फक्त इंदिराजींनी, स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी आणि अकालींचं हे मत कदाचित राजकीय स्वार्थासाठी असेल; पण अनेक विरोधी पुढाऱ्यांनाही मान्य आहे. एस. काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरद पवार ह्यांनी तर अकालींच्या चळवळीच्या एकूण सद्हेतूची ग्वाहीच देऊन टाकली आहे, तर जनपथ आणि अशोकारोडवरच्या कम्युनिस्ट आणि लोकदल कार्यालयातूनही काहीशी अशीच प्रतिक्रिया ऐकायला मिळाली.

अटलजींनी तर '... एशियाडच्या यशस्वी सांगतेचं श्रेय, राजकीय मचावरील हालचालींबाबत तरी, अकालींना आपण निःसंकोचपणे द्यायला हवं. त्यांनी संयम दाखवला म्हणूनच, त्यांनी आंदोलन शांततामय ठेवलं,म्हणूनच कुठलाही अनुचित प्रकार न घडता आशियाई सामने व्यवस्थित पार पडले ह्यात शंका नाही. त्यांनी ह्या प्रसंगी दाखविलेल्या राष्ट्रीय बाण्याचं कौतुकच करायला हवं... इंदिराजींनी मात्र ह्या परिस्थितीचा गैरफायदा उचलून शिखांना बदनाम करायचा प्रयत्न केला. त्याऐवजी त्यांनी अकालींसकट सर्व विरोधी पक्षांबरोबर चर्चा करून पंजाबचा प्रश्न सोडवायचा प्रयत्न करायला हवा होता.'

एशियाडच्या यशाचं श्रेय कुणी घ्यायचं हा प्रश्न जो तो आपल्या परीनं बघतो; पण एक गोष्ट मात्र खरी की, इंदिराजींनी ह्या निमित्ताने अकाली आणि एकूणच शिखांना धारेवर धरलं. त्यांच्या आंदोलनाच्या धास्तीने किंवा एकूणच प्रश्नाचा तोडगा हातात नसल्याने त्याला दुसरंच स्वरूप द्यायचं असं धोरण स्वीकारलं. हा त्यांचा 'मक्सद' पुरा झाला ह्यात शंका नाही; पण त्याचबरोबर हा प्रश्न अधिक बिकट झाला ह्यात वाद नाही. अकाली दलपक्ष ह्या प्रश्नाकडे सत्तेच्या राजकारणातून बघत असल्याने त्याचं तसं काही बिघडणार नाही. उद्या तो कांग्रेसशी हातमिळवणीही करेल; परंतु ह्या काळात जी मानहानी सोसावी लागली ती सर्वसामान्य शिखाच्या मनात मात्र घर करून बसेल. त्याच्या मनात कटुता निर्माण होईल. ह्या साऱ्या शिखाच्या मनस्तापाला प्रामुख्याने, पंजाबातले, चंदीगढमधले हरियाणातले हिंदू कारणीभूत असंही वारंवार ह्या शीख समाजाच्या मनावर बिंबवलं जात आहे. काही अंशी संरक्षक योजना एशियाडच्या वेळी आवश्यक होती ह्यात कुणाचं दुमत होऊ नये. परंतु त्या योजनेला शिखाविरुद्ध पुकारलेल्या युद्धाचं स्वरूप आलं त्यामुळे शीख समाज दुखवला गेला ह्यात वाद नाही.

### राजकीय केंद्र

आणि ह्या गोष्टीचा प्रत्यय मला माझ्या दिल्लीतल्या आणि पंजाबातल्या भटकंतीत आला. आधीच त्यांची मने काही वर्षातल्या सातत्याच्या प्रचाराने दूषित झालेली. त्यात गेल्या महिना-दीड महिन्यातल्या घटनांनी त्यांना कडवट बनवलं. दिल्लीतलं अकालींचं केन्द्र म्हणजे नव्या दिल्लीत कॅनॉटप्लेसजवळच असलेला बांगलासाहिब गुरुद्वारा ! ह्या गुरुद्वाराजवळचा परिसर व प्रत्यक्ष गुरुद्वारा प्रेक्षणीय आहे. हा परिसर नेहेमीच गजबजलेला असतो. गुरुद्वारात रात्रंदिवस कीर्तन-भजन चालू असतं आणि भाविकांची गर्दीही उसळलेली असते. शिखांच्या एका धर्मगुरूला औरंगजेबाच्या काळात दिल्लीत आलेल्या रोगाच्या साथीला आळा घालण्यासाठी पाचारण केलं गेलं. त्यानं दिल्लीत येऊन आपल्या आध्यात्मिक, दैवी शक्तीच्या जोरावर दिल्लीकरांची त्या साथीतून सुटका केली. ह्या शीखधर्म-

गुरूच्या स्मरणार्थ हा गुरुद्वारा उभा आहे शांततेचा, परोपकाराचा, समभावाचा संदेश देत हा गुरुद्वारा उभा आहे ! आज मात्र अकालींनी ह्या गुरुद्वाराला राजकीय अड्ड्याच स्वरूप दिलेलं आहे गुरुद्वारा कायद्याप्रमाणे, गुरुद्वाराच्या आत पोलीस घुसू शकत नाहीत. कुठलीही कार्यवाही करू शकत नाहीत. तिथे नियम चालतो तो फक्त गुरुद्वारा प्रबंधक कमिटीचा ! ह्या कायद्याचा फायदा घेऊन अनेक अकाली पुढारी स्वतःची अटक टाळण्यासाठी गुरुद्वाऱ्याचा आश्रय घेतात. तिथनं राजकीय सूत्रं हलवतात.

मी बांगलासाहिबमध्ये गेलो असता दर्शनी भागात, मंदिरात अनेक शीख–हिंदू सरमिसळून भक्तिभावाने वावरत असताना दिसले. अनेक हिंदूही तेवढ्यात भक्तिभावाने ' गुरुबाणी 'च्या पठणात–आरत्यात सामील होताना दिसले. परंतु ' गुरुद्वारा 'च्या अंतर्भागातलं दृश्य मात्र वेगळं होतं. ह्या अंतर्भागात सामुदायिक जेवणावळी उठतात. अन्नछत्रच म्हणा ना ! तिथेच बाजूला ' पंथा 'च्या अनेक यात्रेकरूंची राहण्याची पण सोय असते. काही खोल्याही तिथे उपलब्ध आहेत. ' गुरुद्वारा 'चं ऑफिसही ह्या अंतर्भागातच आहे. ह्या सर्व ठिकाणी मात्र सगळे लोक शीखच होते. एक मुसलमान माजी आमदार, की जे कवी, पत्रकारही आहेत, बाकी सगळे शीखच होते. ह्यातली बरीचशी मंडळी वेगवेगळ्या मार्गांनी, वेगवेगळे ' बहाणे ' करून दिल्लीत पोचली होती. त्यानी निदर्शनं केली होती. स्वतःला अटक करवून घेतली होती. एका अंदाजाप्रमाणे अशा शिखांची संख्या सुमारे दोन हजाराच्या घरात होती. अकालींच्या मते ५ हजारावर होती.

ह्यातच पतियाळाहून दिल्लीत पोचलेले सरदार एस. एस. शेरगिल हेही होते. कडवटपणे एकूण प्रकरणाची चर्चा करताना ते म्हणाले– ' ... शिखांच्या धार्मिक आणि विशेषत. स्वायत्ततेच्या मागणीला, स्वत.ची जुनी आश्वासनं डावलून, सरकार शिखांच्या भावनांशी खेळत आहे. वास्तविक १९४७ साली, म. गांधी आणि पंडित नेहरूंनीही शिखांच्या स्वायत्ततेच्या कल्पनेला पाठिंबा दिला होता. काश्मिरप्रमाणे पंजाबला खास दर्जा द्यायच कबूल केलं होतं .. परंतु हे मान्य करूनही भारतीय घटना तयार करताना पंजाबला असा दर्जा मिळाला नाही. फार काय, पंजाबी भाषा बोलणाऱ्यांना वेगळं राज्यही मिळालं नाही... इथेच अकाली–काँग्रेस संबंधाला वेगळं वळण मिळालं.. आपली जुनी आश्वासनं पाळून, काँग्रेसनं व शासनानं स्वायत्ततेची मागणी मान्य करावी. आदोलन थांबेल. एवढच नाही अकाली–काँग्रेस एकीही होऊ शकेल... एरवी आजचे काँग्रेसचे धोरण, सरकारचे अत्याचार आम्हाला खलिस्थानच्या मागणीकडे झुकवेल... गेल्या महिना दीड महिन्यातले शिखांवरील अत्याचार, एशियाड काळात आमच्या हिंडण्या–फिरण्यावर–बोलण्यावर आलेले निर्बंध...एकच मार्ग शिल्लक उरतो लढा ! शिरे धारतीर्थी पडली तरी चालतील, पण खलिस्थान होईपर्यंत लढा चालूच राहील...

ही एक कडेची प्रतिक्रिया म्हणायला हरकत नाही. पण सर्वसाधारणपणे, खलिस्थानला मोठा पाठिंबा नसला तरी सरकार विरुद्ध चीड मात्र अनेक शिखांमध्ये आढळली. विशेषत: दिल्ली–प्रवेशावर बंदी घालून अनेक शिखांचा रोष सरकारनं ओढवून घेतलेला आहे, ह्यात शंका नाही. काँग्रेसचेच एक शीख खासदारही ( नाव सांगू नये अशी विनंती ! ) सरकारी धोरणामुळे परिस्थिती आणखी काही काळ तरी तंग राहणार हे कबूल करतात. ' दिल्लीत यच्चयावत शिखांबाबत जे अविश्वासाचं वातावरण तयार केलं गेलं त्यामुळे पंजाबात जाऊन काँग्रेसचं काम, विशेषत: शीख समाजात करणं अवघड होऊन बसलेलं आहे. एकूण उपाययोजनेत अतिरेक झाला हे मान्यच केलं पाहिजे...'

अंबाल्याचे एक काँग्रेस ( आय् ) कार्यकर्ते वार्यामसिंग भिखींना सरकारचं धोरण साफ चुकीचं वाटत. स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणारं वाटतं. त्यामुळंच काँग्रेस (आय्) कार्यकर्ता असूनही, भिखी-अकाली मोर्चाला संपूर्ण पाठिंबा देतात. त्यासाठी पतियाळाहून दिल्लीत येतात. स्वत.ला अटक करवून घेतात. एका ठिकाणी मात्र शीख नेत्याशी ते सहमत होत नाहीत. खलिस्थान किंवा स्वायत्तता दोन्हीला त्यांचा पाठिंबा नाही. आनंदपूर साहिब ठरावाच्या बाकीच्या कलमाना ते पाठिंबा देतात. त्यांच्या मते, '......इंदिराजी देखील बाकीची कलमे मान्य करू शकतील. नव्हे त्यांनी ती करावी. तसं केलं तर अकाली चळवळीतला जोर निघून जाईल. **सर्वसामान्य शिखांना खलिस्थान नको आहे. स्वायत्तताही नको आहे. हिंदू पंजाबी लोकांशी वैर तर मुळीच नको आहे......किंबहुना पंजाबात अनेक ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, एकाच घराण्यात हिंदू आणि शीख गुण्यागोविंदाने राहात आहेत. त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार आहेत......'**

एक-दोन काँग्रेसी प्रतिक्रिया मी वर दिल्या आहेत. शीख काँग्रेस ( आय् ) वाले तसे फारसे बोलायला तयार होत नाहीत; पण गप्पा मारताना, चाचपणी करताना, एक गोष्ट मात्र जाणवली. ह्याही मंडळींना, काहीसा नकळत का होईना, पण झालेला अतिरेक रुचलेला नाही. त्याना अडचणीत टाकणाराच तो बव्हंशी ठरलेला आहे. ह्या अतिरेकामुळं एकूण शीख जनमत आज बिथरलेलं आहे ह्यात वाद नाही आणि त्याचा फायदा अकालींना मिळू लागलेला आहे. एशियाडपूर्वी, ऐन तोंडावर निदर्शन घोषित केल्यामुळं विरोधी पक्षियांनी अकाली विरोधी सूर लावायला सुरुवात केली होती; पण आशियाई स्पर्धांच्या काळातल्या अतिरेकामुळं विरोधी पक्षानी आपला सूर बदलला आहे ह्यात शंका नाही. त्याचा उघड उघड परिणाम म्हणजे आज अकालींची भूमिका जास्त जास्त अट्टाग्रही बनत चाललेली आहे. एक तर इंदिराजींनी फार वेळकाढूपणा करून मान्य करायच्या मागण्या मान्य करणं लांबणीवर टाकलं. साहजिकच इतक्या प्रदीर्घ लढ्यानंतर आनंदपूर-साहिब मागण्यावर तडजोड स्वीकारून जनतेपुढे जाणं म्हणजे स्वतःचा पराभव ओढवून घेणं असं गणित अकाली आज मनाशी मांडत आहेत. म्हणूनच आज अकाली पुढारी आनंदपूर ठरावावर अडून बसलेले आहेत. हा ठराव मान्य करून त्यानुसार मागण्या मान्य कराव्यात. अकाली आदोलन मागे घेतील असा सूर त्या सर्व मंडळींनी लावला आहे......'

## अनेक घरांतून हिंदू–शीख गुण्यागोविंदाने एकत्र राहताहेत.

## स्वायत्ततेकडे वाटचाल

ह्याचीच री ओढून श्रीगुरुचरणसिंग तोहरा म्हणाले, '......आणि आनंदपूर-साहिबा प्रस्ताव तुम्ही नीट वाचला तर तुम्हाला समजून येईल की, त्यात राष्ट्रद्रोही, अवास्तव असं काहीच नाही. त्यात स्वतंत्र 'खलिस्तान'ची मागणी तर नाहीच नाही. परकीय पैसा त्याला कारणीभूत आहे हेही साफ खोटं आहे. हे सर्व आपमतलबी लोकांचे 'झूटे प्रचार' आहेत......खरं तर, शिखांना राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रासाठी स्वार्थत्याग कुणी शिकवला नाही. आम्ही तो सतत करत आलो आहोत, पुढेही करत राहू; पण असं असूनही शिखांना मात्र सतत दुय्यम दर्जाची वागणूक मिळत गेली. गांधी-नेहरूंनी स्वतंत्र भारतांतर्गत शीखराज्य मान्य केलं होतं. शिखांना स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य केला होता प्रत्यक्षात तसं काहीच झालं नाही......पुढं भाषावार प्रांतरचना झाली. तुमच्या महाराष्ट्रासह सर्वांना भाषिक राज्यं मिळाली. पंजाबी लोकांना तेव्हाही न्याय मिळाला नाही. मास्टर तारासिंग व सरदार फत्तेसिंग ह्यांना 'पंजाबी सुब्या' साठी आंदोलन छेडावं लागलं. मूळ पंजाबची छकलं करून, चंदीगढ केंद्रशासित ठेवून, काही पंजाबी भाषिक प्रदेशांचा हरियाणा, राजस्थानमध्ये समावेश करून आजचा पंजाब निर्माण केला गेला......केंद्र एवढ्यावर थांबलं नाही. शिखांच्या धार्मिक भावनांचीही त्यांनी कदर केली नाही.....'

इथे तोहराजींच्या सुरात सूर मिळवला तो दिल्लीच्याच जनकपुरी भागातल्या गुरुद्वाराचे श्रीगुरुसिंग सभेचे अध्यक्ष सरदार गुरुबक्षसिंग धीर ह्यांनी. दिल्लीच्या गुरुद्वारा कायद्यात केंद्रसरकारने स्वतःच्या स्वार्थासाठी वेळोवेळी कसे बदल केले, ह्याची कहाणी सांगून त्यांनी बादलांकडे पाहिलं आणि बादल म्हणाले की, '......हा सरकारी हस्तक्षेप थांबावा म्हणून देशातल्या सगळ्या शीख गुरुद्वारासाठी एकच एक कायदा लागू करण्यात यावा व गुरुद्वारा प्रबंधक कमिटीच्या सर्वंकष अधिकाराखाली देशातले सगळे गुरुद्वारा यावेत अशी आमची मागणी आहे. ही सर्वस्वी, देशातल्या किंवा सर्व जगातल्याही, सर्व शीख समाजाच्या अध्यात्मिक उन्नतीसाठीची धार्मिक मागणी आहे. राजकारणाशी तिचा संबंध नाही; पण ही मागणीही ' राजकीय स्वार्थासाठी स्वतःचे पित्ते गुरुद्वारामध्ये अधिकारावर नेमता यावेत ह्यासाठी शासन मान्य करत नाही '.

पुन्हा या चर्चेत हस्तक्षेप करत सरदार तोहराजी म्हणाले, '...अलीकडच्या सरकारी अतिरेकांनी तर कहरच केला...आता, शिखांवर सातत्याने होणारे हे अन्याय सहनशीलतेच्या पलीकडे गेले आहेत आणि म्हणूनच, पूर्वी कधी नव्हता इतका आज आम्ही 'स्वायत्तते'-साठी आग्रह धरत आहोत आणि ह्यातही अराष्ट्रीय, लोकशाही-विरोधी वगैरे काही नाही. अमेरिका, कॅनडा, इतकंच काय पण साम्यवादी रशियातल्या राज्यांनासुद्धा भारतातल्या राज्यापेक्षा जास्त स्वायत्तता आहे. आज आमची मागणीही तेवढीच आहे. फक्त पंजाबच नव्हे, तर देशातल्या सर्वच राज्यांना स्वायत्तता देऊन केंद्रशासनाने फक्त अर्थ, (चलन), संरक्षण, परराष्ट्रधोरण, रेल्वे इत्यादी अधिकारच स्वत.कडे ठेवावेत. बाकी सर्व बाबतीतले निर्णय राज्यांवर सोपवावेत. सत्तेचं खऱ्या अर्थानं विकेंद्रीकरण होऊन 'फेडरल' लोकशाही राज्य भारतात निर्माण होईल. आमच्या ह्या मागणीत काही गैर आहे असं वाटत नाही. अनेक विरोधी नेत्यांनाही ह्या मागणीत काही गैर वाटत नाही. मद्रासमध्ये ही मागणी केली जाते, केरळ-बंगालमध्ये तिचा पुनरुच्चार होतो, काँग्रेस (एस)चे अध्यक्ष शरद पवार तिला पाठिंबा दर्शवितात. जम्मू-काश्मिरचे मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला अशी स्वायत्तता स्वतः राबवतात, दुसऱ्यासाठी पुरस्कारतात. ह्यातले कुणीही राष्ट्रद्रोही ठरत नाहीत, अतिरेकी ठरत नाहीत. तीच मागणी अकालींनी केली की, अकाली आणि एकूण शीखसमाज राष्ट्रद्रोही कसा ठरतो ?...आणि मी पुन्हा सांगतो की, अकालींना व शिखांना पंजाबसाठी, 'सर्व पंजाबी भाषिकांच्या पंजाबी राज्यासाठी फक्त स्वयंनिर्णयाचे राष्ट्रांतर्गत हक्क हवे आहेत, शिखिस्थान किंवा खलिस्थान ही आमची मुळी मागणीच नाही ! ...'

'.. शिखांवर अन्याय करून सर्वसामान्य शिखांना 'खलिस्थान'च्या मागणीकडे शासनाने ढकलू नये एवढं मात्र इथे अवश्य सांगावंसं वाटतं,' असं सांगून ते पुढे म्हणाले, '...आता ह्या पंजाबी राज्याच्या मागणीबद्दलच पहा ना. चंदीगढ, आजूबाजूचे इतर काही भाग पंजाबात विलीन व्हावे असं आम्ही म्हणतो. कारण ह्या भागातल्या लोकांची मातृभाषा पंजाबी आहे आणि हे सर्व भाग पंजाबात आले तर नवीन हिंदूंची संख्या ५५% होईल. आज ती ४५% च्या आसपास आहे. असं असूनही आम्ही ही मागणी करतो आहोत ती पंजाबच्या आणि शीख-हिंदू पंजाब्यांच्या भल्यासाठी. ह्या मागणीत धार्मिक असं काहीच नाही. अनेक हिंदू-मुसलमान पंजाबीही आमच्या आंदोलनात म्हणूनच सामील झाले आहेत; पण दुर्दैवाने, अनेक हिंदू-नेत्यांना मात्र हे पटत नाही. हिंदू धर्मियांची भाषा हिंदीच असली पाहिजे असा विचित्र ग्रह करून घेऊन आज अनेक मूळच्या पंजाबी हिंदूंनी आपल्या मूळ मातृभाषेला ठुकरावून लावलेलं आहे. घरात, व्यवहारात ते आजही पंजाबी भाषा बोलतात; पण जनगणनेत किंवा सरकार-दरबारी मात्र मातृभाषा म्हणून ' हिंदी ' सांगतात. त्यातनंच पंजाबच्या हिताच्या मागण्यांना ते विरोध करतात ही आजची शोकांतिका आहे...इतर प्रांतात-विशेषतः तुमच्या महाराष्ट्रात किंवा गुजरातेत अशी आंदोलनं होतात. संयुक्त महाराष्ट्र किंवा बेळगाव प्रश्नावरून शासनाविरुद्ध जनता उभी राहते तेव्हा आपसात विरोध होत नाही. तिथले मुसलमान, इसाई, हिंदू, हरिजन सगळे अशा मागण्यांसाठी ठामपणे उभे राहतात. इथे मात्र पंजाबी हिंदू, ह्या मागण्या शिखांच्या शिखांसाठी आहेत, असं मानून विरोध करतो...'

## दुहीची बीजे

असेच काहीसे सूर नंतर अमृतसरमध्ये बोलताना संत लोंगोवालांनी मांडले. माजी मुख्यमंत्री बादल ह्यांनीही काढले आणि पंजाबात अनेक हिंदू-शीख लोकांशी बोलतानाही हे विचार वारंवार ऐकायला मिळाले आणि हे म्हणणं बऱ्याच अंशी खरं आहे अशी निदान माझी तरी धारणा झाली. किंबहुना हा सारा झगडाच कृत्रिमपणे मुद्दाम घडवून आणला गेला असं म्हटलं तरी वावगं होणार नाही. दिल्ली, चंदीगढ, अमृतसर वगैरे अनेक ठिकाणी मी काही ज्येष्ठ पत्रकारांशी, सामाजिक कार्यकर्त्यांशी बोललो. बहुतेकांच्या बोलण्यातनं एक सूर वरचेवर मला जाणवला आणि तो म्हणजे

पंजाब आणि हरयाणा या दोन राज्याची निर्मितीच मुळी कृत्रिम आणि चुकीच्या निकषांवर भर देऊन करण्यात आली. आजच्या लढयाचं खरं मूळ ह्या राज्यनिर्मितीच्या चुकीतच प्रामुख्यानं सापडेल. स्वातंत्र्य पदरात पाडून घेत असताना निम्मा पंजाब पाकिस्तानात गेला. तिथनं शीख आणि हिंदू पंजाबी मोठ्या प्रमाणात पूर्व-पंजाबात व त्या वेळच्या 'पेप्सू'त आले. ह्या सगळ्यांची मूळ भाषा पंजाबी. शिखानी अधिकृतरीत्या गुरुमुखी लिपी स्वीकारली. पंजाबासाठी तरी व्यवहारात हिंदू आणि शीख दोन्ही समाज लिपी वापरत ती उर्दू. उर्दू ही यावनी लिपी आणि पंजाबी ही उर्दूतनं लिहिली जाणारी, उर्दूशी जवळीक सांगणारी भाषा म्हणून 'फॅनॅटिक' आर्यसमाजियांनी, हिंदूनी हिंदी आणि देवनागरीचा स्वीकार करावा अशी मोहीम उचलली. सुरुवातीच्या भाडणाची बीजं इथं रोवली गेली. असं असल तरी ह्यापुढंही हिंदू–शीख सर्वसामान्य समाजात कमालीचं सामंजस्य होतं. रोटी–बेटी व्यवहार होते...

पुढे, आर्यसमाजियांच्या जोडीला इतर हिंदी फॅडिस्ट आले. काही अंशी जनसंघीयानीही त्याला हातभार लावला; पण मोठा हातभार ह्या दोघांमधल्या दुहीला लावला तो आधी पं. नेहरूंनी व पुढे आधुनिक पंजाबचे भाग्यविधाते म्हणवल्या जाणाऱ्या प्रतापसिंग कैरों ह्यांनी. ह्या दोघानीही, *शिखाच्या वेगळ्या अस्मितेला फुलवलं, त्याला* खतपाणी घातलं. ह्यातून शीख आणि हिंदू ह्यांच्यातल्या दुहीला धार चढली. 'अनेकतेतून एकता' हा प. नेहरूचा लाडका मंत्र. पंजाबात पंजाबी हिंदूची आणि हिंदुत्वाचा वारसा घेऊन लढाऊ बाण्यानं पुढे आलेल्या शिखाची अपूर्व अशी एकता होती. विविधतेतली ही एकता पं. नेहरूंनी शिखाच्या अस्मितेला फुकरून पुसून टाकली. शीख मतांच्या अपेक्षेनं त्यानी आणि प्रतापसिंग कैरोंनी टाकलेला डाव आज त्याच्याच कन्येवर उलटला आहे त्याहीपेक्षा देशाच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब म्हणजे सरहद्दीवरच्या ह्या राज्यात आज केंद्राविरुद्ध धर्मयुद्धाच्या घोषणा उठवल्या जात आहेत...

गमत ही की, त्या वेळी निव्वळ मतासाठी खेळला गेलेला हा डाव अगदी अलीकडेपर्यंत वेगवेगळ्या पद्धतीनी सत्तेसाठी कॉंग्रेसी नेत्यानी पंजाबात खेळला. जनता राजवटीच्या काळात पंजाबात अकालीच्या नेतृत्वाखाली संमिश्र राजवट होती, त्या वेळी अकालीमध्ये आपसात फाटाफूट करवली. संजय गांधीनी, मनेका गांधीनी. अकालीमधली फाटाफूट प्रामुख्याने अन्य हिंदू पक्षाबरोबरच्या संबंधांमुळेच होती. पुढे इंदिराजी पुन्हा सत्तेवर आल्यानंतर दरबारासिंग विरुद्ध तेव्हाचे केंद्रीय गृहमंत्री ग्यानी झैलसिंग असं राजकारण पंजाबात रंगलं. हिंदूचे कडवे विरोधक असलेले आणि आजच्या आंदोलनात केंद्रबिंदू बनलेले अत्यंत जहाल नेते सत जर्नैलसिंग भिंद्रनवाले हे झैलसिंग–दरबारासिंग भांडणाला आलेलं फळ आहे. त्याच्या कडव्या हिंदू विरोधामुळे धर्मवेड्या लोकांमध्ये ते हळूहळू आपली छाप पाडत होते. त्याचा फायदा दरबारासिंग विरोधी राजकारण खेळण्यासाठी झैलसिंग ह्यानी करून घेतला. भिंद्रनवाल्यांचा दरारा आणि आदोलन अशा तऱ्हेनं केंद्राच्या कृपाछत्राखाली वाढत गेलं. राजकारण झैलसिगजी खेळत होते दरबारासिंगाना ठोकून काढण्याच; पण प्रत्यक्षात शिखाना भडकवलं जात होतं हिंदूविरुद्ध. लाला जगत्‌नारायण ह्या वयोवृद्ध पत्रकाराचा खून त्यातनंच घडला. पुढे खलिस्थानच्या घोषणा कॅनडा–अमेरिकेतनं होऊ लागल्या. खलिस्थानच्या नावानं अमेरिकेत पासपोर्ट बनू लागले. विमानांचं अपहरण होऊन, अपहरणकर्त्यांना पाकिस्तानात आश्रय मिळाला. अपहरणकर्त्यांचं अभिनंदन भिंद्रनवाले करू लागले....

ह्या घटना घडू लागल्या आणि सुरजितसिंग बर्नाला, प्रकाशसिंग बादल, लोंगोवाल, तोहरा वगैरेंच्या पायाखालची वाळू सरकू लागली. सगळी सूत्रं भिंद्रनवाले ह्यांच्याकडे जाणार अशी चिन्हं दिसू लागताच, ह्या मंडळींनी आपापसातले मतभेद तात्पुरते बाजूला ठेवले. घाईघाईने ही मंडळी एकत्र आली आणि 'आनंदपूरसाहिबा' सभेनुसार मागण्यासाठी अकाली मोर्च्यांचं आयोजन सुरू झालं. कॉंग्रेस अंतर्गत राजकारणानं एकदा ह्या अकाल्यांमध्ये भांडणं लावून दिली होती. आज पुन्हा त्याच कॉंग्रेसच्या राजकारणानं त्यांना एकत्र आणलं आहे; पण पूर्वीपेक्षा अधिक कडवट बनवून!

...दिल्लीत आणि अमृतसरमध्येही असं उघड उघड बोललं जातं की, कडवेपणानं एकत्र आलेल्या अकाल्याचं जोरदार आंदोलन सुरू होणार असं दिसू लागलं तेव्हा इंदिराजीनी उपाययोजना केली. या योजनेनुसार त्यानी झैलसिंगाना राष्ट्राध्यक्ष केलं. हेतू हा की, त्यामुळे झैलसिंग–दरबारासिंग खेचाखेच बंद होईल व त्याचबरोबर शीख राष्ट्राध्यक्ष झाल्यामुळे शीख समाजाला चुचकारल्यासारखं होईल; पण इंदिराजीना उपाययोजना करण्यास उशीर झाला असच म्हटलं पाहिजे. कारण ह्या वेळेपर्यंत जर्नैलसिंग व इतर मंडळींनी दरबारासिंगाविरुद्ध वातावरण खूपच कलुषित केलेलं होतं. त्यातही सत्तेच्या राजकारणातला जर्नैलसिंग भिंद्रनवाल्याचा पाठीराखाही केंद्रातनं दूर झाला होता. साहजिकच जर्नैलसिंगांना दरबारासिंग विरोधात अकाल्यांबरोबर जाणं भाग होतं, तर अकाल्यांनाही शीख समाजातलं स्वतःचं स्थान पक्कं करण्यासाठी जर्नैलसिंगापेक्षाही 'जहाल' वेष धारण करणं भाग पडलं. परिणाम एवढाच झाला की, आंदोलन अधिकाधिक उग्र बनत गेलं. लोंगोवाल–तोहरा ह्या प्रमुख नेत्यांनी 'हिंदू' केंद्राविरुद्धचं ते 'धार्मिक युद्ध' असल्याची घोषणा केली. एशियाड संपल्यावर आजही दोन्ही बाजूत समेटाची चिन्हं नाहीत. लोंगोवालाना लढा उग्र करण्यासाठी सर्व ते मार्ग अवलंबायचे सर्व अधिकार अकालीनी दिले आहेत. सर्व अकाली खासदारानी राजीनामे सादर केले आहेत, तर तिकडे केंद्रीय गृहमंत्री सेठी ठणकावून सांगताहेत— 'धार्मिक मागण्या मान्य केल्या आहेत. इतर कशावरही समझौता करणं वाटाघाटीशिवाय शक्य नाही...' विशेषतः स्वायत्ततेच्या मागण्यांवर तर चर्चाही होणार नाही असं ते सांगतात. अकाली म्हणतात, 'चर्चांचा घोळ बस्स झाला. आमच्या मागण्या पूर्णपणे मान्य करा, तरच समझौता नाही तर अनंतकाळच्या धर्मयुद्धाला आम्ही तयार आहोत!'

## दुहीची बीजे पेरली गेली.... पुढचे राजकारण

## चंदीगढमध्ये

चंदीगढमध्ये मी पोचलो तेव्हा तिथे पत्रकारांचा मेळावा भरला होता. चंदीगढमधल्या 'ट्रिब्यून' ह्या इंग्लिश–हिंदी–पंजाबी दैनिकातल्या पत्रकारांच्या सहकार्याने. संपूर्ण देशातून, विशेषत: दिल्ली वगैरे भागातून ज्येष्ठ-श्रेष्ठ पत्रकारमंडळी चंदीगढमध्ये जमली होती. चलपती राव, प्रेम भाटिया, कुलदीप नय्यर, राधेश्याम शर्मा वगैरे मातब्बर मंडळी समेलनाला उपस्थित होती. विषय होता 'वृत्तपत्रे, वृत्तपत्रस्वातंत्र्य, शासन व जनता.' त्याचा बाकी तपशील इथे अप्रस्तुत आहे; पण तिथे घडलेला एक किस्सा मात्र अवश्य सांगावासा वाटतो. सगळे अतिरथी–महारथी वादविवाद करत असताना एक सरदारजी मध्येच उभे राहिले. त्यांनी बोलायची परवानगी मागितली. ती मिळताच, व्यासपीठावरून त्यांनी वृत्तपत्रावर, पत्रकारावर सपाटून हल्ला चढवला.त्यांच्या मते... "अकाली प्रश्नावर, एकूणच पंजाबच्या प्रश्नावर वृत्तपत्रांनी आपलं कर्तव्य अजिबात बजावलेलं नाही अकालींना योग्य ते सहकार्य दिलेलं नाही... भजनलाल (हरियाणाचे मुख्यमंत्री) पंजाब आणि पंजाबी द्रोही, घरभेदी तर खरेच; पण त्यांची धोरणं राष्ट्रद्रोही देखील आहेत. पत्रकारांनी त्यांच्याविरुद्ध जनमत तयार करून त्यांच्या राजिनाम्याची मागणी करायला हवी होती... पत्रकारांनी पंजाबबाबत प्रेक्षकाचं निष्क्रिय धोरण स्वीकारलं..." नंतर लंच ब्रेक व अन्य वेळी हे गृहस्थ अक्षरश: विथरून नाचल्यासारखे वागत होते. हातवारे करून, 'आनंदपूर मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत नाही तर 'खलिस्थान'साठीच लढा द्यावा लागेल' अशा तऱ्हेनं बोलत होते. नंतर कळलं ते प्राध्यापक मैनी होते, तिथल्याच कुठल्याशा कॉलेजमधले. प्राध्यापकमंडळी साधारणत: विचारवंतात मोडतात. अशापैकी एकाचे हे विचार होते... वागणे होते ...

नंतर समेलनानिमित्त जमलेल्या अनेक मान्यवर पत्रकारांशी बोलताना, "आंदोलनाचे फायदे काय होतील ते होवोत, पण आज तरी हिंदू विरुद्ध शीख ह्या भावना वाढीला लागल्या आहेत आणि ते फार घातक आहे." असंच ह्या पत्रकारांना वाटत असल्याचं जाणवलं हे आंदोलन, राजकारणाच्या सीमारेषा ओलांडून पुढं गेलेलं आहे आणि हे तारू कुठवर भरकटत राहणार हेच समजत नाही, असंही अनेकांनी मला सांगितलं ...

चंदीगढमधल्या वास्तव्यात मला अनेक गोष्टी जाणवल्या. केंद्रशासित चंदीगढ, पंजाब आणि हरियाणा अशा तीन प्रदेशांच्या विविध कचेऱ्या ह्या शहरात आहेत. कित्येकदा एकाच इमारतीत एक कार्यालय पंजाबचं तर त्याला लागूनच असलेलं कार्यालय हरियाणाचं अशीही परिस्थिती आहे. ह्याच्या जोडीलाच अनेक सैनिकी कार्यालयंही चंदीगढमध्ये आहेत. त्यामुळे निदान सध्या तरी चंदीगढमध्ये सर्व तऱ्हेच्या लोकांची सरमिसळ आहे ह्या साऱ्यात चंदीगढमधले रिक्षावाले एकजात उत्तरप्रदेशचे आहेत. ह्यामुळे चंदीगढमध्ये शेजारी शेजारी राहणारेही कुणी पंजाबी हिंदू, कुणी शीख, कुणी मुसलमान तर कुणी अन्य प्रांतीय असे आहेत. त्यांचे आपसातले संबंधही खरोखरच चांगले आहेत, जिव्हाळ्याचे आहेत असं वाटलं ... निदान पंजाब जनता पक्षाच्या चंदीगढमधल्या कार्यालयात तरी मला तसं सांगितलं गेलं." ... पण ह्या मित्रत्वाला अलीकडे तडे जाऊ लागले आहेत. परवाच इथल्या गुरुद्वाराच्या परिसरात एक–दोन हिंदूंना उगाचच मारहाण झाली नि पाठोपाठ 'राज करेगा खालसा' 'अकाली दल झिंदाबाद' वगैरे घोषणा झाल्या ..." जनता पक्षाचा स्थानिक कार्यकर्ता मला शोधत होता.

"वास्तविक हे सगळं भांडणच मुळात जातीयवाद्यांनी भडकवलेलं आहे ..." अशी सुरुवात करून पंजाब कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते (ते पत्रकारही आहेत !) म्हणतात, "संघ, जनसंघ एकीकडे आणि अकाली दुसरीकडे अशा कट्टर जातीयवादी पक्षांनी एकूण लढ्याचा फायदा उठवून जनमन भडकवलं आहे. ह्या वादात पंजाबातले शीख आणि हिंदू हे दोघेही आधी पंजाबी आहेत हे विसरलं जातं. *शिखांना हिंदूविरुद्ध भडकवलं जातं; तर हिंदूंना स्वत:च्या* मातृभाषेशी, पंजाबीशी द्रोह करायला शिकवलं जातं. परिणाम काय तर भोगळ मागण्या नि त्यासाठीचा लढा उभा राहतो. त्यात गरीब पंजाबी जनता, तिच्या मागण्या, पंजाबचा सर्वांगीण विकास हे सर्व मागं पडत ..." एवढं सांगून हे कम्युनिस्ट कार्यकर्ते श्री. जगजितसिंग आनंद पुढे म्हणतात की,...' म्हणूनच पंजाब कम्युनिस्ट पक्षानं एक नवीन लोकाची चळवळ सुरू करून लोकांच्या प्रश्नांना हात घालायचं ठरवलं आहे. त्यासाठी जनजागृती मोर्चे काढून आमचा पक्ष *लोकांना ह्या जातीयवादी कुटिलकारस्थानाविषयी जागृत* करील. जातीयतानिर्मूलन, जनता-विरोधी सरकारी धोरणांबाबत निदर्शनं आणि २० कलमी कार्यक्रमाची सुयोग्य अंमलबजावणी ह्या प्रश्नांवर त्यासाठी राज्यव्यापी चळवळ उभी करण्याचा संकल्प आम्ही म्हणूनच सोडला आहे (*असे मोर्चे कम्युनिस्ट पक्षातर्फे ह्यापूर्वीच पंजाबात* सुरू झाले आहेत !) .."

चंदीगढ पंजाबला मिळावं ह्याविषयी कम्युनिस्ट पक्षही आग्रह धरतो ... आणि चंदीगढला पंजाब 'भाजप' कार्यालयात बातचीत करताना भाजपदेखील चंदीगढ पंजाबचच ह्याविषयी ठाम असल्याचं तिथला कार्यकर्ता सांगतो तो पुढे म्हणतो मात्र की, ह्या प्रश्नाला जातीय स्वरूप दिलेलं आहे ते अकाल्यांनी आणि शिखांनीच ...... काँग्रेसनं ह्या जातीय भावनेला स्वतःच्या स्वार्थासाठी खतपाणी घातलं. खुद्द झैलसिंगांनी, ते गृहमंत्री असताना, अकाली व दरबारसिंग ह्यांच काँग्रेस सरकार ह्यांना सतावण्यासाठी भिंद्रनवाल्यांना पाठिंबा दिला. तेच भिंद्रनवाले आज डोईजड होऊन बसलेले आहेत. मुळात 'भाजपा'चा ह्या एकूण प्रश्नात जातीयवादी दृष्टिकोन अजिबात नाही. *शीख हे आम्ही आमचेच मानतो. आज अनेक शीख आम*च्याही बरोबर आहेत .. "दिल्लीत भाजपाच्या अशोका रोडवरच्या केंद्रीय कार्यालयात, केंद्रीय कार्यकारिणीची बैठक चालू असताना मी गेलो होतो तेव्हाही हाच सूर मला ऐकायला मिळाला होता ...... "*अकालींचा आततायीपणा, त्याला शासनाची साथ ह्यातून हा प्रश्न* चिघळलेला आहे. एरवी शीख–हिंदू ही एकाच समाजाची दोन अंगं आहेत ..."

## संघाची भूमिका

काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस ह्यांनी पंजाबचा दौरा केला. त्या वेळी त्यांनीही काहीसा असाच सूर छेडलेला होता. ते म्हणाले होते की, "शीख–हिंदू भांडण हे मुळी राजकीय भांडण होऊच शकत नाही. 'शीख' हा हिंदू

समाजाचाच एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळं हे भांडण सर्वथैव 'घरगुती' भांडण आहे. ते ह्या दोघांनी आपसात विचारविनिमय करून सोडवायचं आहे. त्यात त्रयस्थाची मध्यस्थीच नको ! ..."

प्रत्यक्षात असं घडताना मात्र पंजाबात कुठेही दिसत नाही. कुठेही हिंदू–शीखनेते एकत्र येऊन चर्चा करताहेत असंही दिसत नाही. उलट शीखनेत्यांना हा एक 'आर. एस. एस. चा बनाव'च वाटतो. ते संघाला स्वतःचा शत्रूच समजतात असंही मला जाणवलं. हिंदूच्या व्यापक विश्वात शिखांना सामावून घेऊन, त्यांचं वेगळं अस्तित्वच नाहीसं करण्याचा हा हिंदूचा,वाजपायीचा,आर.एस.एस.चा डाव आहे." असं बऱ्याच मान्यवर शीखनेत्यांनी मला सांगितलं. दुर्दैवानं वर असे उद्गार जरी संघाच्या नेत्यांनी काढले तरी संघकार्यकर्ते शिखांमध्ये स्वतःविषयी, स्वतःच्या हेतूविषयी विश्वास निर्माण करत हिंडताना मला आढळले नाहीत. उलट पंजाबात, विशेषतः जालंधर–अमृतसर इथे शिखांना क्वचित कुठे जो प्रतिकार होतो किंवा त्याची आगळीक काढली जाते, त्यामागे संघाचे स्वयंसेवकच असतात असं मला अनेक शीखनेत्यांनी सांगितलं ..."

## काँग्रेसचे सत्ता–गणित

असं सगळं असलं तरी पंजाबात एकूण बाकी पक्षांची गणना 'चिल्लर' पक्षातच करायला हवी. काँग्रेस आणि अकाली व काही प्रमाणात कम्युनिस्ट हेच खरे पंजाबातले पक्ष. हिंदू–शीख झगड्याचा परिणाम कुठं 'भाजपा'वाल्यांना होतो असं वाटलं तरी तो प्रामुख्यानं काँग्रेसलाच होतो. बिगरशीख मत साधारणतः काँग्रेसकडेच झुकतं. शिखांमध्येदेखील सत्तेमुळे काँग्रेसकडे झुकलेली मंडळी बरीच. त्यामुळे अकाली (किंवा शीख)–हिंदू फूट असणं नव्हे तशी ती कायम राखणं सत्तेच्या हिशेबात काँग्रेसला नेहमीच फायद्याचं ठरतं. शीख मुख्यमंत्री, केंद्रातले पंजाबी मंत्री शीखच असं धोरण एकीकडे ठेवून शिखांची काही मतं स्वत.कडे ठेवायची, तर दुसरीकडे शीख–हिंदू विरोध धगधगता ठेवून हिंदू मत स्वत.कडे खेचायचं व सत्ता स्वत.कडे ठेवायची हे काँग्रेसी राजकारण. त्यामुळेच, अगदी सुरुवातीपासून प्रखर शीख विरोध असला, शिखांचा बलवान असा अकाली पक्ष असला तरी सत्ता सतत काँग्रेसकडे राहात गेली. अपवाद फक्त जनतालाटेच्या वेळचा. तेव्हा शिखांनी स्वतःच्या कडव्या जातीयवादाला थोडी मुरड घातली. जनतापक्षाबरोबर आघाडी स्थापन करून अकाली पक्ष तेव्हा सत्तेवर आला. दुर्दैवानं जनता पक्ष लवकर फुटला. पंजाबातही सत्तांतर झालं. वास्तविक अकालीविरुद्ध हालचाली जनता राजवटीत झैलसिंग, संजय गांधी वगैरेनीच सुरू केल्या. अकालींना कडव्या जातीय मागण्या पुढे करून भिंद्रनवाले आदींच्या आडून ह्या मंडळींनी सुरुवात केली. पुढे पुन्हा काँग्रेस सत्तेवर आली तरी दरबारासिंगविरोधी वातावरणनिर्मितीसाठी भिंद्रनवालेंचा उपयोग करून घेण्याचं सूत्र चालूच राहिलं...आजदेखील, सर्व आंदोलनानं एवढं उग्र स्वरूप धारण केलेलं असलं तरी त्याचा एकूण काँग्रेसवर तसा परिणाम होणार नाही असं ठाम गणित मला चंदीगढमध्ये काँग्रेस (आय)कार्यालयातल्या सोहलसिंगांनी ऐकवलं. ह्या काँग्रेस कार्यकर्त्याच्या मते, 'ह्या क्षणालाही जरी कुठे निवडणूक घेतली तर काँग्रेस आयचा उमेदवार निवडून येईल ह्याची मला खात्री आहे...' त्याच्या ह्या गणिताचं उत्तरही मला लगेच सापडलं. सरदारजीच कुणी अकाली सरदारजीच्या विरुद्ध उभा करायचा. थोडी तरी शीख मतं विभागतातच. शिवाय हिंदू एकगट्ठा मतं काँग्रेसकडे झुकतातच ! इतकं हे गणित सोपं आहे......

१९४७ साली पंजाबचं विभाजन प्रत्यक्ष अनुभवलेले एक वयोवृद्ध सरदार अमरिकसिंग मला चंदीगढ ते अमृतसरच्या प्रवासात भेटले. लाहोरमध्ये तेव्हा त्यांचा तरणाताठा मुलगा निरंजनसिंग मारला गेला होता. त्या आठवणी सांगता सांगता अमरिकसिंग अनेकदा भावनाविवश होऊन जात होते. मध्येच एकदा ते म्हणाले, 'गांधी–नेहरूंनी वेळोवेळी तेव्हा आश्वासनं दिली होती. फाळणी होणार नाही. झाली तरी ज्याला त्याला आपापल्या गावी शांततेनं राहता येईल. असं काहीच झालं नाही. आमच्या रक्ताचे सडे पडूनच फाळणी होईल वगैरे वल्गना गांधी–नेहरूंनी केल्या त्या फुकट गेल्या. कृपलानी तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. ह्या साऱ्यांनी, त्याच्या काँग्रेसनी आमचा मोठा विश्वासघात केला ! खरा तर तो साऱ्या देशाचा विश्वासघात होता; पण त्याची किंमत आम्हाला मोजावी लागली. रक्ताचे सडे पडूनच विभाजन झालं; पण ते गांधी–नेहरूंच्या नाही, तर आमच्या ! पंजाब्यांच्या ! ! इथल्या हिंदूच्या, शिखांच्या ! ! ...'

त्यानंतर अमरिकसिंग बरंच काही सांगत राहिले आणि त्या साऱ्यातनं काँग्रेसविरुद्धचा साऱ्या पंजाब्यांचा संतापही सांगत राहिले आणि त्याच वेळी मला काँग्रेसच्या म्होरक्यांचं कौतुक वाटलं. जनमत एवढं विरुद्ध असतानाही, तेच जनमत एकमेकाविरुद्ध फुलवत ठेवून काँग्रेसनं आज तीस–पत्तीस वर्षं पंजाबवर अविरत राज्य केलं. तोच डाव आजही पुढे चालू आहे. फक्त अकालींचा विरोध आज प्रखर झाला आहे, कृतिशील झाला आहे......

## अमृतसरमध्ये

अमृतसरला मी पोचलो आणि अकाली आंदोलनाचा पंजाबवर काय परिणाम झाला आहे ते तात्काळ जाणवलं. अमृतसर हे अकालींचं सर्वांत पवित्र शहर. सहाव्या धर्मगुरूंनी वसवलेलं सुवर्णमंदिर इथंच आहे. हे सुवर्णमंदिर खरोखरच अप्रतिम आहे. तिथली व्यवस्थाही छान आहे. एकूण शीख जमातीतला सेवाभाव जो तिथं डोळ्यासमोर येतो तोही मनाला मोहवून टाकणारा आहे हे सुवर्णमंदिर व त्याच्या परिसरातला भाग 'पवित्र' म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. मद्यपान, धूम्रपान वगैरेला व त्या वस्तूंच्या विक्रीलाही तिथं बंदी आहे. ह्या सुवर्णमंदिरात रात्रंदिवस जाग असते. भजनं (कीर्तनं) चालू असतात. लोकांची गर्दी उडालेली असते अन्नछत्र चालू असतं.. सुवर्णमंदिराबरोबरच सारं अमृतसर शहरच 'पवित्र' घोषित करण्याची मागणी अकालींची आहे आणि ती मागणी स्वीकारल्याचंही पंजाबचे मुख्यमंत्री दरबारासिंग ह्यांनी घोषित करून टाकलं आहे त्यामुळं एका शांत निर्मळ शहरी आपण जात आहोत असा माझा समज झाला होता. तिथं पोचताच हा माझा भ्रम पार पळाला. अमृतसरमध्ये बस शिरली आणि सर्वत्र मला पोलिसच पोलीस दिसू लागले. राज्यसरकारचे पोलीस, राज्यराखीव पोलीस, सीमासुरक्षादलाचे जवान......अमृतसर म्हणजे पोलीसछावणीच बनली होती

पृष्ठ २६ वर

# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प चवथे
बुधवार २० ऑक्टोबर १९८२



## प्रा. शरद वाघ

**'मराठी विनोद' या व्याख्यानमालेतील पहिली तिन्ही व्याख्याने विनोदविषयावरचीच पण गंभीर अशी झाली. त्यामुळे श्रोत्यांकडून विनोदी भाषणाची मागणी झाली आणि प्रा. शरद वाघ यांनी ती पुरवली. त्यांनी सुरुवातच छान केली. ते म्हणाले :**

विनोदावरची व्याख्याने विश्रामबागवाड्यात व्हावी हा मोठा गमतीशीर विनोद. कारण हा सर्व वाडाच विनोदी आहे. या वाड्याच्या तळमजल्यावर जन्म आणि मृत्यूची नोंद करावी लागते. त्याच्या शेजारीच विद्यार्थ्यांना बसचे पास मिळतात. जन्म आणि मृत्यूची सुधारलेली आवृत्ती म्हणजे विद्यार्थ्यांना बसचे मिळणारे पास! त्याच्या शेजारी टपालविभाग–हे खातेच विनोदी ! तुमचे–आमचे दिवाळी अंक कुठे जातात याचा पत्ता लागू न देणारे हे खाते ! दुसऱ्या मजल्यावर पोलीसविभाग ! या पाडू हवालदाराच्याबाबतीत म्या पामरानं काय बोलावं ? काही कारणामुळे आणीबाणीत मला या ठिकाणी यावं लागलं होतं. या दुसऱ्या मजल्यावर चांगलं चार तास मला ठेवलं होतं. तेव्हा हा किती विनोदी मजला आहे हे मी चांगलं पाहिलं. महाराष्ट्र साहित्यपरिषदेचा तिसरा मजला रिकामा आहे. तिथे अतिथिगृह आहे; पण विश्रामबागवाड्याचा तिसरा मजला मात्र पूर्ण विनोदी आहे. इथला लाइट आणि माईक यातलं अधिक चावट कोण हे सांगणच कठीण आहे हा हॉलच विनोदी आहे. अशा विनोदी हॉलमध्ये विनोदावर भाषणे! विनोदासाठी तीन मजले चढून येणाऱ्या पुणेकरानो, तुम्हाला साष्टांग नमस्कार !

ज्याचे वयोमान ५० पेक्षा अधिक आहे, अशानी कोठे तरी सख्याहरी ऐकला आहे नवयुगमधून किंवा चित्रामधून. त्यांच्या मनात कुठे तरी सख्याहरी असणार आहे; परंतु यापेक्षा कमी वयोगटाच्या पिढीला बांदेकर अपरिचित असण्याची शक्यता आहे. म्हणून या विस्मरणात गेलेल्या परंतु श्रेष्ठ अशा विनोदकारावर बोलण्याची संधी मला व ऐकण्याची संधी तुम्हाला मिळाल्याबद्दल प्रथम या शासकीय ग्रंथालयाचे व परिषदेचे आभार मानू या ! हिमालयाची मोठी शिखरे पाहताना एखादं छोटंसं पण डौलदार शिखर निसटून जाण्याची शक्यता असते; पण या वेळेला हे शिखर निसटलं नाही, हा वेगळा नमुना आहे.

दत्तू बांदेकरांचा विनोद समजून घेण्यापूर्वी त्यांचं थोडं आयुष्य समजून घेणं आवश्यक आहे. कारण त्यांच्या आयुष्याचे पडसाद त्यांच्या साहित्यावर व विनोदावर उमटले आहेत. हा एक सामान्य मनुष्य ! फक्त ५५ वर्षांचं आयुष्य ! ४ ऑक्टो. १९५९ ला निधन. मूळचे कारवारचे. भाषा कोंकणी. शिक्षण ७वीपर्यंत. तेसुद्धा कानडीतून झालेलं. मराठीचा कुठे संबंध आलेला नाही. घरची परंपरा मोठी नाही. तो अगदी साधा दत्तूच आहे. पोट भरायला मुंबईला आले. अठरा विश्व दारिद्र्य ! राहायची सोय नाही. खायची भ्रांत ! अंगभर कपडा नाही, ही परिस्थिती.

१९३४ सालची गोष्ट. लोटवाला नावाचे व्यापारी होते. त्यांना साहित्याची आवड होती. लोटवालाच्या मनात आलं–आपलं स्वतःचं एक मासिक असावं. समाजवाद तेव्हा लोकांच्या आवडीचा होता, परवलीचा शब्द होता. जहाल विचारसरणीचं एखादं मासिक काढावं या विचारात दोघे–तिघे एकत्र आले आणि 'चित्रा' मासिक सुरू झालं. त्यात आपल्या परिचयाच्या दोन–तीन व्यक्ती होत्या. एक अनंत काणेकर, दुसरे नाटककार रांगणेकर. या चित्रांतूनच आपल्याला दत्तू बांदेकर प्रथम भेटतात. येथून त्यांच्या लिखाणाची सुरुवात झाली. पुढं यांचं काही पटलं नाही; पण काणेकरानी दत्तू बांदेकरांच्या जीवनातील असे काही प्रसंग सांगितले आहेत की, वाचता वाचता डोळ्यांतून टचकन् पाणी यावं. 'अनंतिका' या त्यांच्या आत्मचरित्रात बांदेकरावर एक खास प्रकरण आहे. 'कऱ्हेच्या पाण्या'त अत्र्यांची यावर दोन–तीन प्रकरणं आहेत. 'हुंदके' या अत्र्यांच्या श्रद्धांजलीवजा पुस्तकात काही उल्लेख आहेत. या सगळ्यांवरून कळतं, हा माणूस दुर्दैवी आहे !

काणेकर म्हणतात, मी एकदा किर्लोस्कर कंपनीच्या खोलीवर गेलो होतो. तिथे एक मूर्च्छा येऊन पडलेला मनुष्य आणला होता. तो होता दत्तू बांदेकर ! नेत्रा बांदेकर नावाच्या उदयोन्मुख नटीचा भाऊ ! ही पहिली ओळख. ही बहीण आणि त्यांचा एक भाऊ–दोघेही अकाली वारले. दुर्दैव एकेकाला अखेरपर्यंत कसं झोडपतं त्याचा बांदेकर हा एक नमुना !

मेलेल्या माणसांच्या नोंदी ! या नात्राच्या लेखात बांदेकर म्हणतात–माझ्या आवडीची, निकटची जी माणसं आहेत, ज्यांनी माझ्या जीवनाला स्पर्श केला आहे, अशांच्या मृत्यूची मी नोंद करतो. यात एक बालमैत्रीण, त्यांच्या गवळ्याचा लहान मुलगा, एक प्रसिद्ध गायिका यांच्याबरोबर आणखी एक नोंद आहे–दत्तू बांदेकर ! मृत्यू दिनांक......रोज दुसऱ्या दिवशीची तारीख लिहायची. सकाळी

हाउसफुल्ल ! जिकडे तिकडे हाउसफुल्ल !
बंडू, खंडू, यमू, मालती घरात पोरे हाउसफुल्ल !
शाळेमध्ये रांग लावती, प्रवेश नाही, हाउसफुल्ल !
पोरे आणि पालक सारे रखडत फिरती हाउसफुल्ल !

आणि मध्येच एक मुलगा उठून विचारतो, "अहो सर, सगळीकडे 'हाउसफुल्ल' आणि मग मला कसा प्रवेश मिळाला ?"

"अरे, तुझा बाप क्रॉफर्ड मार्केटमध्ये मोठा व्यापारी आहे. सगळ्या मास्तरांच्या घरी आंब्याच्या पेटचा पाठवतो....."

# ही गंमत, हा शेवटचा धक्का हीच बांदेकरी विनोदाची धाटणी !

सकाळी उठल्यावर 'अरे, मी जिवंत आहे' म्हणून पुन्हा पुढची तारीख. हे सर्व कशासाठी ? अहो—माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या मृत्यूची नोंद इतकी काळजीपूर्वक माझ्याशिवाय दुसरं कोण करणार ? अशा तऱ्हेने स्वतःच्या मृत्यूची नोद करणारा हा माणूस सामान्य असूनही वेगळा आहे. याची जातच वेगळी आहे म्हणून याचा विनोदही वेगळा आहे. एक सुरेख प्रवाह दत्तू बादेकरानी मराठी विनोदी वाङमयात आणून सोडला आहे. या विस्मरणात गेलेल्या प्रवाहाचा आपण आता परिचय करून घेणार आहोत.

### उपजीविकेचे एकमेव साधन

'अतिप्रसंग' नावाचा त्यांचा एक कथासंग्रह आहे. त्याच्या शेवटच्या कव्हरवर एक कोरा चौकोन ठेवला आहे. त्याखाली संपादकांनी लिहिलं आहे—या पुस्तकाच्या लेखकाचा हा फोटो आहे; पण तो तुम्हाला दिसणारच नाही. कारण हा त्याचा नसून त्याच्या स्वभावाचा फोटो आम्ही छापला आहे. हा आवडत्या लेखकाचा फोटोही पहात नाही आणि स्वतःचा चेहराही दाखवत नाही. इतक्या लेखकापैकी कोणत्याही लेखकाच्या स्वभावाचा फोटो आम्ही आजपर्यंत पाहिला नाही. 'चित्रा' मधून त्यानी विपुल लेखन केलं; पण कालातरानं चित्रामधून काणेकर व रांगणेकर निघून गेले. त्याना वाटलं बांदेकरही जातील; पण दुसऱ्या दिवशी बादेकर चित्राचे संपादक ! असं कसं झालं ? ते म्हणाले—'तुमची गोष्ट वेगळी आहे. तुमच्या खिशात दोन वेळच्या जेवणाचे पैसे आहेत. मी रस्त्यात उपाशी पडणार म्हणून मी सपादक झालो.' चित्रात ५–६ वर्षे व नवयुगमध्ये १७–१८ वर्षे (स्थूलमानाने) असं २५ वर्षे त्यांनी लेखन केलं. ते त्यांच्या उपजीविकेचं साधनच होतं. लेखनाशिवाय आयुष्यात बादेकरानी काहीही केलं नाही. दिवसा लिहायचं, रात्री भटकायचं. घर नव्हतंच. महिनान्महिना फूटपाथवर राहिले, मुबईचे बकाल जीवन अनुभवले. 'चित्रा' व 'नवयुग' मधून वेगाने लिहीत राहिले. मग 'सव्याहरी' आला आणि विनोदाला वेगवेगळे धुमारे फुटले. त्यांनी लग्न केलं ते सुद्धा चौथी पास झालेल्या मुलीशी. तिला मराठी समजत नव्हतं आणि आपण काय लिहितो हे तिला समजू नये अशीच त्यांची इच्छा होती. यातला उपहास, उपरोध, कारुण्य पाहण्यासारखे आहे.

त्याच्या विनोदाचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा ते People's humorist होते. सामान्याचा विनोद ! यांत्रिक युगात, बकाल वस्तीत, फूटपाथवर राहणारा (विशेषतः मुंबईत) सामान्य माणूस याच्यासाठी विनोद. त्याचे भावविश्व, त्याची सुखदु:खं समजून घेऊन केलेला विनोद.

कोल्हटकरांनी विनोदाची परंपरा घालून दिली. गडकऱ्यांनी विनोदाला लोकप्रियता, प्रतिष्ठा दिली. महाराष्ट्रभर विनोद पोचवला; चि. वि. जोशांनी विनोदाचा विकास केला. तेथून मराठी विनोदाला कशा वेगवेगळ्या फांद्या फुटल्या, तो सर्वांगानी कसा बहरला हे पाहण्यासारखं आहे. यात दत्तू बादेकरांचं एक वेगळं वळण आहे हा सामान्यांचा विनोद आहे. त्यांच्या सगळ्या विनोदाच्या मागे कारुण्याची झालर आहे. 'हा कारुण्याचा विनोदी शाहीर आहे.' असे अत्र्यानी म्हटले आहे. काणेकराचेही असेच उद्गार आहेत. आलमगीर किंवा श्री. बावडेकर यांनी प्रस्तावनेत हाच मुद्दा माडला आहे. यांच्या विनोदाच्या पाठीमागे अश्रू आहेत. हसूच्या मागे आसू आहेत.' त्या विनोदाच्या मागे कारुण्य लपलेलं आहे, मनातून कढ येताहेत पण हसतो आहे. हाच विनोद खरा श्रेष्ठ विनोद !

बांदेकरांचं शिक्षण फक्त मराठी सातवी. इंग्रजीचा गंध नाही. पाश्चात्य विनोदाचा प्रभाव नाही. ते रिडर्स डायजेस्ट वाचणारच नाहीत तर त्यातला विनोद भर घालून लिहिण्याची व स्वत:च्या नावावर खपविण्याची भीतीच नाही. सामान्य माणूस डायजेस्ट करून त्यांचा विनोद तयार होत असे. त्याचे स्वत:चे असे खास वेगळे तंत्र होते. सामान्यच असून प्रतिभेचे देणे असे विलक्षण, दैवी की तो विनोद असामान्य ठरला.

## बांदेकरी वळण

४०–५९ हा काळ. तेव्हाची दु:खेच आता अधिक तीव्र झाली आहेत. पुणे–मुंबईत आता फारसा फरक राहिलेला नाही. शाळेत प्रवेश नाही, लोकलमध्ये जागा नाही, हॉटेलमध्ये बसायला जागा नाही. रस्ता क्रॉस करायला सुद्धा जागा नाही. सगळीकडे हाउस फुल्ल. सामान्याचं हेच दु:ख ! *सगळीकडे हाउस फुल्ल !* बांदेकरानी सामान्याचं दु:ख कसे टिपले आहे हे पुढील उताऱ्यात दिसते. त्याचे सर्व गुण कळण्यासाठी हा एक उताराच पुढे देत आहे.

त्याचं नावच ' हाउस फुल्ल ' आहे.

कालीदेवी शाळेच्या पटांगणात जमलेली प्रचंड गर्दी पठाणाच्या सहाय्याने शिक्षक हटवताहेत. शाळेवर बोर्ड लागला आहे– ' हाउस फुल्ल ' मुलाना प्रवेश नाही. शिक्षक हाश्श–हुश्श करत वर्गात येतात. घंटा होऊन वर्ग सुरू झाले आहेत. एका वर्षात सामुदायिक काव्यगायन सुरू आहे–

हाउस फुल्ल ! जिकडे तिकडे हाउस फुल्ल !
बंडू, खंडू, यमू, मालती घरात पोरे हाउस फुल्ल !
शाळेमध्ये रांग लावती, प्रवेश नाही हाउस फुल्ल !
वर्गा–वर्गामध्ये गर्दी मास्तर म्हणती हाउस फुल्ल.
पोरे आणि पालक सारे रखडत फिरती हाउस फुल्ल.
जागा नाही, कॉलेजातही फलक लागले हाउस फुल्ल.
शालांताचे विजयी बच्चे मूर्च्छित पडले हाउस फुल्ल.
अभ्यासाला पुस्तक नाही, पुस्तक विक्री हाउस फुल्ल.
एक मिळेल तर एक मिळेना, गडबड, गोंधळ हाउस फुल्ल.

आणि मधेच एक मुलगा उठून विचारतो, ' अहो सर, सगळीकडे हाउस फुल्ल, आणि मग मला कसा प्रवेश मिळाला ?'

' अरे, तुझा बाप क्रॉफर्ड मार्केटमध्ये मोठा व्यापारी आहे, सगळ्या *मास्तराच्या घरी आंब्याच्या पेटचा पाठवितो.* हेडमास्तराच्या बेकार मुलाला त्यानंच नोकरी लावून दिली, म्हणून तुला प्रवेश मिळाला !'

दुसरा मुलगा विचारतो– ' सर, मला कसा प्रवेश मिळाला ?'

' अरे, तुझ्या वडिलानी १२ वर्षांची अॅडव्हान्स फी एकदम भरली शिवाय शाळेला देणगीही दिली, म्हणून तुला प्रवेश मिळाला.'

पुढे पुन्हा सामुदायिक काव्यगायन सुरू होते–

तळानळावर पाण्यासाठी भांडणतंटे हाउस फुल्ल.
चौपाटीवर भेळपुरीचा रगडा झाला हाउस फुल्ल.
रांग लागली गिऱ्हाइकांची, माल संपला हाउस फुल्ल.
सिनेमाच्या थेटरात झुंबड, बोर्ड लागती हाउस फुल्ल.
तिकिटावाचुनी असंख्य प्रेक्षक निराश रडती हाउस फुल्ल.
हॉटेलातही दाटीवाटी टेबल–खुर्च्या हाउस फुल्ल.
किती कपबशा आणि पेले फुटती हाउस फुल्ल.
नाही खोली, नाही आसरा, गल्ली गल्ली हाउस फुल्ल.
बेकारीचे संकट वाढे, नसे नोकरी हाउस फुल्ल.
मंत्री सत्री उदंड झाले, सचिवालयात हाउस फुल्ल.
अर्जदार दारात रखडती, दाद मिळेना हाउस फुल्ल.
कोटी कोटी प्रजा वाढली, भारत झाला हाउस फुल्ल.
अवनी, गगनी, विजनी आणि सोलापुरात हाउस फुल्ल.

–ही मांडणी, हा प्रकार हेच बांदेकरी वळण ' चित्रण '. सदाशिवपेठी, सामान्यच. पण चित्रण निर्माण होऊन *भागत* नाही. बांदेकर अडचणीत आलेल्या चित्रणच्या मदतीला येतात आणि अन्यायावर प्रहार करतात. हीच यांची ताकद आहे अत्र्यानी याना पाठिंबा दिला, प्रोत्साहन दिले हे आपले भाग्य ! पुढे पुढे तर अत्रे म्हणायचे, ' मी ' अत्रे उवाच 'मध्ये लिहितो, तुम्ही त्याला साजेशी टीका करा '. अत्रे आणि बांदेकर असा नवयुग त्या काळात खुलला होता. अत्र्यांनी एके ठिकाणी सार्थ म्हटले आहे, ' बांदेकरानी ' नवयुग 'मध्ये विनोदाचे नवे युग सुरू केले.'

तुमचं–आमचं दु:ख–महागाई खूप. मुंबापुरीत तर ती जास्तच– तिथे नवीन आलेल्या मुशाफिराला बांदेकर सांगतात–

शेगडी स्वस्त – घासलेट महाग !
म्हैस स्वस्त – दूध महाग !
लेखक स्वस्त – कागद महाग !
नोटा स्वस्त – चिल्लर महाग !
डॉक्टर स्वस्त – औषध महाग !
मोटार स्वस्त – पेट्रोल महाग !
कोंबडी स्वस्त – अंडी महाग !
बिडी स्वस्त – काडी महाग !
ब्लॉक स्वस्त – खोल्या महाग !
चहा स्वस्त – साखर महाग !
नटी स्वस्त – सिनेमाचे तिकीट महाग !

ही गंमत बांदेकरच करू जाणे. म्हणून सामान्य माणसाने बांदेकरावर प्रेम करायला सुरुवात केली. त्यांच्या लक्षात आले, हा कोणी तरी वेगळा आहे. हृदयाला भिडणारा आहे. श्रीपाद कृष्णांचा विनोद नाटकातून आला. गडकरी नाटक–पुस्तकांतून येत राहिले. चिमण पुस्तकातून भेटला त्यामुळे निवडक लोकापर्यंतच हे पोचत होतं *सामान्य लोक वृत्तपत्र* वाचत होते. केसरी, तरुण भारत, मराठा याचा खप ८० हजार–लाखाच्या घरात असतो. तेव्हा याच्यातून जो विचार, जो विनोद, जे ज्ञान जाते ते अक्षरश: लाख-लाख लोकांपर्यंत जाते. मग असा विनोद जरा चावट, मिस्किल असला, इंटलेक्चुअल–बुद्धिवादी नसला म्हणून नाक मुरडायचं काय कारण आहे ? पुढे पुढे फडक्यानी यावर आक्षेप घेतला. हा व्हल्गर विनोद आहे, चावट विनोद आहे मला असं सांगा, तुमच्या–माझ्या जीवनामध्ये चावटपणा नाही ? अगदी आधुनिक काळातील पतीपत्नीसुद्धा *लग्नात एकमेकांना घास देतात–हा चावटपणा नाही ?* आपल्याकडच्या लग्नातील अंतरपाटाची पद्धत–अशी विनोदी पद्धत तर दुनियेत नाही–पतीपत्नी आधी सगळीकडे फिरून वगैरे आलेले असतात आणि लग्नाच्या वेळी मध्ये अंतरपाट ! ही विसंगती नाही ?

चावटपणा नाही? जिथ जीवनच संमिश्र आहे त्यात मिस्किलपणा आहे, एक सूर नाही, एक चव नाही, हे जीवनच जेथे सप्तरंगी आहे–अशा सामान्यासाठी लिहिलेल्या विनोदात थोडा चावटपणा आला तर बिघडलं कुठं? बादेकर एक पायरी खाली आले तर काय हरकत आहे? संत म्हणतात, एका गालात मारली तर दुसरा गाल पुढे करा. बादेकर म्हणतात–एका गालाच चुंबन घेतलं आणि दुसरा गाल पुढे केला तर? यात अगदी भयकर भूकप झाला असं समजण्याचं कारण काय? अत्र्यांनी एके ठिकाणी लिहिलं आहे–'महाराष्ट्रीय माणसं (म्हणजे आपण) यांना शृंगार आणि विनोद म्हणावा तसा पचलाच नाही.' ते पुढे म्हणतात–'श्रीपाद कृष्णांनी हसवायला सुरुवात केली. त्यांचा, गडकऱ्यांचा विनोद प्रकट विनोद आहे. अत्र्यांचा विनोद ढोबळ आहे. चिं. वि.चा विनोद कोमल आहे आणि बादेकरांचा विनोद अस्सल मराठमोळा विनोद आहे. दत्तू बादेकरांचे विनोद मराठी लिपीत नसून मराठी भाषेतले आहेत. तुमचे–माझे आहेत.

दत्तू बादेकरांनी नळ, पोस्टाची पेटी, वटवृक्ष, मारुती अशांच्या एकूण ८ जबान्या घेतल्या आहेत. त्यात बोचरेपणा आहे आणि जीवनाची विसंगतीपण आहे. नळाच्या बाबतीत ते म्हणतात–याना सुदर सुंदर युवतीचा अधिकाधिक सहवास लाभतो. सर्व स्त्रिया नळावर जमल्यावर तो नळ पुरुषाना विचारतो, 'मला माहीत आहे, तुम्ही माझा हेवा करता; पण माझ्यात जेवढं पाणी आहे तेवढं तुमच्यामध्ये आहे का?'– हा बादेकरी टच! वटपौर्णिमेच्या दिवशी तो वटवृक्ष म्हणतो, 'आज माझ्या अंगावर रोमाच येताहेत. एक सुवासिनी नटून-थटून माझ्याजवळ आली की, माझी एकेक पारंबी रोमांचांनी बहरून येत आहे. त्यातील एक सुवासिनी काय म्हणते आहे माहीत आहे का? अहो, तिला तिचा सध्याचा पती पसंतच नाही. 'ती माझी मनोभावे प्रार्थना करत आहे–या जन्मी नाही, तरी पुढील जन्मी तरी मला माझ्या मनाजोगा पती मिळू दे! मारुतीची व्यथा ते सागतात–इतके सुंदर सुदर देव आहेत. विष्णू आहे, कृष्ण आहे, तरी या बायका माझ्याकडेच का येतात? सारख्या मला प्रदक्षिणा! मला नवस! त्या काय म्हणतात माहीत आहे काय? मारुतिराया, बजरंगा, चौदा वर्षे लग्नाला झाली, पण अजून मला मुलगा नाही. मला एक तरी मुलगा दे. पण मला सागा, आता मी काय करू?' हा चावटपणा, मिस्किलपणा विसंगतीवर आधारलेला आहे, हे बादेकराचे वैशिष्ट्य आहे.

## नटीचे अभंग

आपणा सर्वांना चित्रपटाच जबरदस्त आकर्षण असतं. आज आहे तितकच आकर्षण ४० वर्षांपूर्वी पण होतं. बादेकर त्यालाही स्पर्श करतात. नटीचे अभंगच त्यांनी रचले आहेत–

मऊ मेणाहुनी रम्य आम्ही नारी, कठीण तिजोरी फोडू ऐसी,
भले तरी देऊ आम्ही एक पापा, नाही तर देऊ श्रीमुखात।
आले तर देऊ चहा कप एक, आणि घेऊ चेक हजाराचा,
नटी म्हणे करू प्रेमळासी प्रेम, नाही तरी काढू घाम पुरा॥

–यातला ताजेपणा, हिरवेपणा अजूनही टवटवीत आहे. आजसुद्धा अमिताभ बच्चन आजारी पडला तर तो बरा होण्यासाठी नवस बोलणारे लोक आहेत. कलावंतावर लोक असच प्रेम करतात.

अशीच त्याची नटीवर आधारित 'प्रेमाचा गुलकद' ही एक कथा आहे. यात एक चोर आहे. 'प्रामाणिक चोर!' अनेक जणानी त्यांना विचारलं, चोर का घेतला? देशभक्त किंवा व्यापारी का नाही घेतला? पण देशभक्त घ्यायचा तर त्याला ढोंग करता आलं पाहिजे, व्यापारी म्हटला तर लबाडी आली पाहिजे; पण हा पडला प्रामाणिक! त्याला हे कसे जमणार? त्यापेक्षा प्रामाणिकपणे चोरीचा धंदा करणारा चोर बरा! हा चोर एका नटीच्या घरी चोरी करण्याचे ठरवितो. कारण तिची तिजोरी नोटानी पूर्ण भरलेली आहे. चोर चोरी करण्यासाठी तिच्या घरी गेला. पुढल्या दारी कुत्रा; मागच्या दारात नवरा! पंचाईत झाली. परत आला. दुसऱ्या रात्री परत गेला. आता मागच्याच दाराने गेला. तिथे लोक तिष्ठत उभे होते. चोर एकदम आत घुसला. लोक कुजबजले, 'डायरेक्टर आला!' अरेच्या! नटीच्या घरी डायरेक्टरला–डायरेक्ट प्रवेश! काय हे नटीचं शील? म्हणून परत आला. तिसऱ्या दिवशी रात्री जरा उशीराच गेला. सगळीकडे दारूच्या बाटल्या आणि नटी झिंगून पडलेली! अशा घरी चोरी करणे बरं नाही वाटलं. परत आला. चौथ्या दिवशी गेला तर नटी व तिच्या नवऱ्याचं भाडणं चालल होतं नटी नवऱ्याला वाटेल तसं बोलत होती. इतकेच नाही तर कुत्राही त्याच्यावर भुकत होता. हे योग्य नाही वाटल! परत आला. पाचव्या रात्री मात्र चोरी करण्याचा निश्चय करून गेला. तिजोरी उघडली. नोटा घेऊन निघणार तेवढ्यात नटीला जाग आली. तो पळाला. नटीने पाठलाग सुरू केला. खिडकीतून उडी मारली, पाइपवरून उतरला, रस्त्यातून वेगाने पळाला, कुंपणावरून उडी मारली, छपरावर चढला, तिथून रेल्वेत उडी मारली, गाडीच्या बरोबरीने चाललेल्या ट्रकमध्ये उडी मारली, तिथून बाजूच्या शेतात स्वत ला झोकून दिलं आणि पळू लागला. पण इतकं करून नटीन मला पकडलच. म्हणाली, 'मला जो स्टंटपट काढायचा आहे–'प्रेमाचा गुलकंद' त्याला तुम्हीच योग्य नायक आहात. तुम्हीच आमच्या चित्रपटाचे हिरो!' नटीला हिरो सापडला! हे बादेकरी चिमटे!

आता बादेकरांनी हाताळलेलं दुसरं क्षेत्र पाहू. राजकारण. नेतृत्व चांगलं असलं की लोकाची काही तक्रार नसते. नेतृत्वाचे आणि सामान्य माणसाचे सूर जमले की सुरेख सगीत तयार होतं; पण नेतृत्व बिघडलं की विनोदी लेखकाचं काम आहे की सामान्याची कुचंबणा त्यांच्या दु खाला वाचा फोडायची. आणीबाणीच्या अखेरीस पु. ल. नीं अशी काही लेखणी चालवली. सर्व राजकारण्यांचे बुरखे फाडून टाकले. विनोदाचे दणके देऊन सर्वांना हादरून टाकलं. बादेकरांनी असंच विनोदाचं शस्त्र राजकारणावर चालवलं 'उधारगावचा पुढारी' पहा. यात राजकीय उपहासाची कमाल केली आहे. दुसरी त्याची कथा–'रेडिओवरून न सांगितलेली गोष्ट!' यात समुद्रमंथनाची–आधुनिक समुद्रमंथनाची गोष्ट! 'बापूजीकडे गेलो. त्याचे मौन! मौन म्हणजे होकारी ठरल. भला मोठा बाबू आणून मुबईच्या चौपटीवर लोकविलक्षण समुद्रमंथन सुरू झालं.' स्त्रियांनी भाग घ्यायचा की नाही? पुण्याचे भालाकार भोपटकर गेले आणि म्हणाले–आर्य स्त्रियांनो, तुम्हाला हे शोभत नाही. फार तर लाबून पहा; पण स्त्रियानी ऐकलं नाही. आणि हे अभिनव समुद्रमंथन सुरू

झालं प्रथम बोकड बाहेर आला ! हा कोणी घ्यायचा ? भांडण सुरू. शेवटी मुंजांना व किजवडेकरशास्त्रींना अर्धा अर्धा दिला. मग आली पगडी ! ही कोणाला द्यायची ? ती कशी फिरवायची ते पुणेकराना माहीत आहे. पुणेकरांना पगडी दिली. फंड आला. फंडाची गडबड करणे पुणेकरांना माहीत आहे. (टिळकांच्या फंडाची गडबड) द्या त्याना हे पुणं बाहेरून जितकं सोज्ज्वळ तितकंच अंतरंगात...गुंगी–देवानी, नीरा–काका कालेलकरांनी, गांधीनी चरखा आणि समीक्षकांनी बुरखा घेतला. कोरी मोटार निघाली ती कामगारांच्या पुढाऱ्यानी आणि कोरा चेक तो सदोबा पाटलानी घेतला. शेवटी विष निघालं ते मुंबईतील नवमतवादी तरुणीच्या नवऱ्यानं प्राशन केलं आणि हे समुद्रमंथन संपलं ! यातील नाव जुनी होतील आणि बदलतील; पण त्यातील चिमटे ? ते कोणत्याही काळात लागू पडतील असेच आहेत.

बांदेकरी विनोदाचा उत्कृष्ट नमुना आणखी एका कथेत पहायला सापडतो–टिळकानी पाठविलेला काकदूत. त्यात कारुण्य आहे, भोवतालच्या समाजात पसरलेलं ढोंग आहे. त्याचा हा मराठी विनोदी वाङ्मयातील अत्युत्कृष्ट नमुना आहे. तो मुळातूनच वाचण्यासारखा आहे.

## स्त्रीविषयक विनोद

बांदेकरांच्या स्त्रीविषयक विनोदावर आक्षेप घेतले जातात; पण *आपल्या सर्वांच्या, सामान्यांच्या जीवनाचं* उद्दिष्टच मुळी प्रपंच करण्याचं आहे. त्यातली आपली अर्धी वाटेकरीण स्त्री ! ही सुद्धा बांदेकरांच्या विनोदातून सुटली नाही. जर आपल्या सर्व जीवनामध्ये, लोकजीवनामध्ये, समाजजीवनामध्ये वैयक्तिक जीवनात स्त्री आहे, तिनं आपलं सर्व जीवन व्यापलं आहे तर तिच्या स्वभावातल्या गंमतीवर विनोद करायला काय हरकत आहे ? गडकऱ्यानी इंदूबिंदूंच्या काळेपणावर टीका केली, त्यातला विनोद तेवढा घ्यावा. क्रौर्य कशाला शोधायचं ? बांदेकर सहज काही स्त्रीविषयक विधानं करतात–ती वानगीदाखल पहा–स्त्रीही इस्त्रीसारखी आहे. एकदा बिघडली की बिघडली. स्त्रीचं प्रेम हे मराठी चित्रपटासारखं [असतं–चार–पाच आठवडे चालतं, पुढे संपून जातं. पोलिसापेक्षा बायकोचं ऐकणं पुरुषाच्या जास्त फायद्याच ठरतं. स्त्री मोटारीसारखी आहे. तिचा तोल गेला की गेला. सावरता येत नाही. नवरा ओळखण्याची त्यांची यादी तर वाचण्यासारखी आहे. 'स्वच्छ नवरा मोहीम' यातली सात कलमं सर्व पुरुषवर्गानं अभ्यासण्यासारखी आहेत. त्याची 'तो आणि ती' लघुतम कथा केवळ बारा ओळीची !

तो आणि ती एकमेकांच्या प्रेमात पडले होते.
तो देखणा होता, ती पण देखणी होती.
त्याचे तिच्यावर प्रेम होते, तिचे पण त्याच्यावर प्रेम होते.
रात्रीचे दहा वाजले, तो घरी आला.
त्याने आपले कपडे काढून खुंटीवर ठेवले.
दहा वाजून पाच मिनिटानी ती खोलीमध्ये आली.
लुगडे बदलून खुंटीवर ठेवले.
तो पलंगाच्या एका कोपऱ्यात बसला, ती पलंगाच्या एका कोपऱ्यात बसली.
त्याने पुस्तक वाचायला सुरुवात केली.
वाचता वाचता पुस्तक तिने फेकून दिले.
तिने दिवा मालवला.
तो पलंगावर आडवा पडला, तीही पलंगावर आडवी पडली
तो डाव्या कुशीवर झोपला; ती उजव्या कुशीवर झोपली.
तो *मुंबईमधल्या लॉजिंग बोर्डिंगच्या* खोलीमध्ये होता.
ती आपल्या पुण्याच्या खोलीमध्ये होती.
–हा बांदेकरी धक्का–शेवटच्या दोन ओळीत दिलेला.

सामान्य माणसाला थोडा रिलीफ द्यायचं काम विनोदी लेखकाचं. तेवढं काम किमानपक्षी त्याने केलं पाहिजेच. हे बांदेकरांनी योग्य प्रकारे केलं. उपहास कसा आहे ? दंभ कसा आहे ? हे सगळं बांदेकरांनी फार चावटपणे लिहिले आहे. बांदेकरानी वेगवेगळ्या लोकांवर खटले भरले आहेत. त्यात त्यानी एका वेश्येवर पण खटला भरला आहे. काणेकरानी त्याचं विश्लेषण करताना म्हटलं आहे 'अनेकानी आजपर्यंत वेश्येवर लिहिलं आहे. कोणी तिचा उद्धारसुद्धा केला आहे; पण बांदेकरांनी विनोदाच्या आश्रयानं जो जळजळीत विनोद दाखविला आहे, त्याला तोड नाही ! त्यातील न्यायाधीश व वेश्या याची प्रश्नोत्तरे समाजाच्या दांभिकपणावर प्रखर झोत टाकणारी आहेत विनोदी लेखकाने समाजातील ढोंगी लोकाचे बुरखे फाडले पाहिजेत, असे अत्रे म्हणतात. त्या अर्थाने तुमचं-आमचं बांदेकराशी नातं आहे.

असे बांदेकर सर्वार्थाने People's humorist होते. त्यांचं स्वत.चं असं खास तंत्र होतं. 'भिकाऱ्याची दिवाळी' हा त्यांचा लेख म्हणजे कारुण्याचा उत्कृष्ट नमुना आहे. तो वाचल्यावर बांदेकराना 'कारुण्याचा विनोदी शाहीर' का म्हणतात हे आपणाला पटतं.

शेवटी बांदेकरांचा 'एकच लेख' पाहू. यातील सुधाकर व रामलालच्या प्रवेशात ते लिहितात–

सुधाकर :– थांब रामलाल, हा एकच लेख मला लिहू दे.

रामलाल :– अरे सुधा, एक एक म्हणून किती लेख लिहिलेस ? आता तरी थांब ! या लेखामुळं गावात तुझा किती दुर्लौकिक झाला आहे. अजून तरी हा नाद सोड !


आदिवासी जीवन-विकासाविषयी
सर्वांगीण व समतोल माहिती देणारे त्रैमासिक

# 'हाकारा'

वार्षिक वर्गणी : रुपये २०
कार्यकारी संपादक : जगदीश गोडबोले

पत्रव्यवहाराचा पत्ता :
'हाकारा'
सीमा, व–७, शिरोळे मार्ग
पुणे ४११ ००४

**सुधाकर :–** आता मोड ? इतके दिवस लेखन लिहिल्यावर, वेड्या, इतके दिवस कशाला ? अरे, एकदाच लिहिल्यावर लेखन मोड ? लेखन ही अशी तशी गोष्ट नव्हे की या लेखणीने लिहून त्या लेखणीने मोडून देता येईल. ही एखादी चैनीची गोष्ट नव्हे की, मॅजेस्टिकवर जिची मोबत आज जोडता येईल व उद्या सोडता येईल. लेखन हा मलेरियाचा ताप नव्हे की, चार दिवस अंगावर बाळगून डॉक्टरच्या औषधाने टाळता येईल. लेखन हा नटीचा नवरा नव्हे की, आज आहे तर उद्या नाही. अजाण मुला, लेखन ही एक शक्ती आहे. दुबळ्या माणसाच्या हातातलं हे शस्त्र आहे. रिकामटेकड्या माणसाला लागलेला हा अघोरी नाद आहे. मूर्ख माणसाच्या मेंदूला जडलेला हा भयानक रोग आहे. लेखन ही पोरखेळ करता येण्यासारखी क्षुद्र बाब असती तर तिच्याबाबत जगात एवढा गवगवा झाला नसता. भीषण महायुद्धानं जागतिक मंदीचा एवढा वडवानळ पेटवून कागद आणि शाई महाग केली तरीसुद्धा ज्याचा अखंड महापूर गल्ली-गल्लीतून वाहात आहे, हे लेखन म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे ! लेखनाची विनाशशक्ती तुला माहित नाही. प्रचंड तोफेच्या गोळ्यानं जखमी न होणारा वज्रदेही भीम लेखणीच्या एकाच फटकाऱ्यापुढे चारी मुंड्या चीत होतो !

**रामलाल :–** सुधाकर, डोळ्यानं हे पाप पाहवत नाही रे ! काय आहे एवढं या एका लेखात ?

**सुधाकर :–** हट्टी मूर्खा, अजून माझा हात धरतोस ? अरे, आता हात धरून काय फायदा ? अजून तुला माझा लेख थट्टेचा वाटतो काय ? रामलाल, ही शाईची दौत पहा. यात तुला काय दिसतं ? हा पहा, माडखोलकरांच्या कादंबरीतील कुचग्रामाचा काळा, निळा रंग ! ही पहा, पु. य. देशपांड्यांची विवस्त्र अवस्थेतील काळी राणी ! हा पहा, फडक्यांच्या संगमोत्सुक कुमारीने स्वप्नातल्या संभोगासाठी दिवा काढून केलेला अंधार ! हे पहा, खांडेकरांच्या देवतेनं पवित्र गुन्हा करण्यासाठी तोंडाला फासलेले काजळ ! रामलाल, तोंड फिरवू नकोस ! ही दौत जरा आणखी निरखून पहा. अरे, वरचा गाळ सोडून दिला तर खालचा चिखल पाहून तुझी छाती दडपूनच जाईल ! अरे, ही पहा महाराष्ट्रातील मान्यवर लेखकांची आपापसातील अभद्र लाथाळी ! हा पहा अत्रे–फडके वादाचा शेणसडा. हे शिमग्यातले उखाणे आणि सख्याहरीचा अतिप्रसंग ! हे पहा सज्जन माणसाच्या चारित्र्यावर उडवलेले शिंतोडे. ही पहा पब्लिसिटीसाठी धडपडणाऱ्या सिनेमानटीची थापेबाज मुलाखत ! ही पहा सिनेमा-दिग्दर्शकानं स्वखर्चानं वाजवून घेतलेली टिमकी. मग संपादकावर झालेली बदनामीची फिर्याद आणि त्यानंतरची सपशेल माफी ! रामलाल, हाच तो विराटस्वरूपी एकच लेख. हे उग्र आणि भयानक चित्र पाहून ठेव ! माझ्या हातातील लेखणी काढून घेण्याचा प्रयत्न करू नकोस. रामलाल, लेखनाची सवय सुटण्याची एकच वेळ असते, ती म्हणजे प्रथम लेख लिहिण्यापूर्वीची !

असे बांदेकर ! त्यांच्या ' सख्याहरी 'मध्ये श्रृंगार जास्त असल्याने व वेळेचे बंधन असल्याने त्याला पुरेशी treatment दिली गेली नाही याची जाणीव आहे. पुन्हा कधी संधी मिळाल्यास त्याचा विचार करण्याचा अवश्य प्रयत्न करीन !

शब्दांकन : **सौ. शलाका सोमण**

---


गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

**राजहंसचे आगामी प्रकाशन**



# महात्मा आणि माणूस

**लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे**

**लवकरच प्रसिद्ध होत आहे !**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०



# प्रेरणा चिपकोची, भटकंती उत्तराखंडाची !

**जगदीश गोडबोले : लेखांक – पाचवा**

पथकातील गटक्रमांक तीन – चार आणि पाचचे अभ्यासक्षेत्र अलकनंदा व तिच्या उपनद्यांचा पाणलोटविभाग हे होते. त्यापैकी गटक्रमांक तीनसाठी जरा दूर पल्ल्याची पहाडी गावे निवडली होती. गटातील उमेदवारही निवडताना शारीरिक क्षमतेच्या दृष्टीने विशेष लक्ष पुरविले होते. गटक्रमांक चार आणि पाचचे अभ्यास–क्षेत्र प्रामुख्याने गोपेश्वर आणि गोपेश्वरचा परिघ एवढेच मर्यादित आखले होते. कारणे दोन. एक तर गोपेश्वर आंदोलनाचे उगमस्थान. दशोली ग्राम–स्वराज्य संघाचे प्रभाव–क्षेत्र आणि मर्म – क्षेत्रही. त्यामुळे आंदोलनाची – संघाच्या कामाची परिणामकता समजून घेण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील गावाचा सखोल अभ्यास महत्त्वाचा होता. संघटन व आंदोलन या दोन्ही बाजूंची चांगली जाण असणाऱ्या वहारु सोनवणे वा प्राध्यापक शेठसारख्यांना हा अभ्यास उपयुक्त ठरला असता. दुसरी गोष्ट या विभागातील मुलुखगिरी जरा कमी खडतर होती, त्यामुळे अशा खडतर मोहिमांची पुरेशी सवय नसलेल्या काही साथीदारांना या गटामध्ये सामावून घेणे शक्य होते. ते अपरिहार्यही होते.

अलकनंदेची उपनदी बालखिलाच्या खोऱ्यात दोन्ही गटांनी अभ्यास–पाहणी केली. बालखिलाच्या पूर्वतीरावर गोपेश्वर, पपडिघना, पाडोली आणि पश्चिम तीरावर गैर, तंगसा, कांडई, कठूड, दोगडी, बछेर अशी गावे वसली आहेत. गोपेश्वर हे चमोली जिल्ह्याचे मुख्य ठाणे, या सर्व गावांपासून जवळ आहे. किंबहुना गोपेश्वराच्या नजरेच्या विळख्यातच ही गावं आहेत. बरेचजण गोपे-

श्वरला जाऊन परत येतात. तेथे नोकरी वा व्यापार–धंदा करतात. साहाजिकच शहराचा या गावांवर झालेला परिणाम जाणवतो.

मध्य–हिमालयातील पाच–सहा हजार फुटांवरील हा भाग खूप उंच–सखल आहे. उच्च आकाशाला भिडणारे बर्फाच्छादित पहाड आणि पाताळात गायब होत जाणारे नदी–नाले, चीड–बांज–बुरांश, तून आदि वृक्षांनी भारावलेली धरती, पर्वताच्या अंगा–खांद्यावर पायऱ्या – पायऱ्यांनी बांधलेली खाचरे, खाचरातून कलकल करीत वाहणारे निर्झर, टुमदार गावे याने मन प्रसन्न होते, तर मध्येच कुठे भूस्खलनाने जखमी झालेली धरती बघून मन उदास होते. हिंदीमध्ये अशा जखमी भूभागाला 'धरती की खाल उधेडना.' म्हणतात. शब्द फार अर्थवाही आहेत. धरतीची लोळवलेली चामडी शब्दश: डोळ्यासमोर उभी करतात !

पहाणी केलेली गावे हमरस्त्यापासून साधारणत: पाच–सात किलोमीटर्सच्या आत होती. गावे हमरस्त्याजवळ होती याचा अर्थ गावापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सोपा होता असा मात्र नाही काही काही गावांना असलेली पायवाट भयंकर अनवट असायची, विशेषत आमच्यासारख्या सवय नसणाऱ्यांना. अशा वेळी वाटायचे की हे गावकरी विशेषत: महिला, वृद्ध या अशा रस्त्यांनी सतत कशी ये-जा करत असतील? या रस्त्याची पण एक गंमत आहे. हृषीकेश–जोशीमठ हा हमरस्ता सरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा. जोशीमठाच्या पुढे अनेक लष्करी ठाणी आहेत, त्यामुळे त्यांना रसद पुरविण्याच्या, सपर्क राखण्याच्या दृष्टीने हा रस्ता वाहतुकीला सदैव खुला ठेवावा लागतो. लष्करी वाहनांचे तार्फे सतत यावरून जा–ये करीत असतात; पण घाई–गर्दीने वा अदूरदर्शीपणाने बनविलेल्या या रस्त्याची व ते खोदून काढलेल्या पहाडी चट्टानांची तब्येत मोठी नाजुक. निमित्तालाच टेकलेले असतात ते. जरा कुठे काही खुट्ट झालं की संयुक्त आघाडीच्या मंत्रिमंडळापेक्षाही (आणि आता कॉंग्रेस आय्–ओ–यू वगैरे आदि !) ते धडाधड खाली कोसळतात; पण लष्करातील जवानांना व रस्तादुरुस्तीपथकाला रस्त्याच्या या ढासळणाऱ्या तब्येतीची इतकी सवय झाली आहे की, बुल–डोझर वगैरे घेऊन ते ताबडतोब धावतात आणि चार–दोन तासात रस्ता मोकळा करून देतात. मुख्य रस्ता सोडून जरा आड–मार्गाला गेलं की रस्ता एवढ्या तातडीने चालू होण्याची शाश्वती नसते; पण त्यामुळे खास काही बिघडत नाही. दोन्ही कडची वाहने कोसळलेल्या दरडीच्या नाही तर ढासळलेल्या रस्त्याच्या दोन बाजूंना उभी राहातात. दरडीच्या ढिगाऱ्यातून एखादी पाऊलवाट बनवलेली नाही तर बनलेली असते. वाहने थांबली की डोक्या–पाठीवर ओझी घेऊन लोक लगाबगा त्या अवघड वाटेने पल्याड जातात. अगदी सहजपणे आणि पलीकडे उभ्या असलेल्या वाहनातून चालू पडतात. मुंबईचे पब्लिक जसे आठ–पचावन्नची डब्बल – फास्ट ऐन टायमाला दोन नंबरऐवजी चार नंबरच्या प्लॅटफॉर्मवर आली तरी निवेदिकेच्या 'हमे खेद है' वगैरेने न पाणावताच सफाईने चालू पडतात, त्यातलाच हा प्रकार ! मात्र आपल्याला हा प्रकार नवीन असला की, प्रथम आपण कमालीचे गोंधळतो. मग वेंधळ्यासारखे उगाचच इकडे–तिकडे करत राहतो. दरड कुठून कोसळली, कोठे कोसळली, कशी कोसळली, का कोसळली याची नुसती चाभार-चौकशी करीत राहतो. तोपर्यंत दोन्हीकडची वाहने हाउस–फुल्ल झालेली असतात. काही चालू पडलेली असतात, कारण पुढची कोसळलेली दरड त्यांची वाट बघत असते. असो.

## 'तंग–सा' गाव

हमरस्ता व इतर महत्त्वाच्या रस्त्यांची निर्माण–निगराणी सरकार करीत असले तरी अभ्यास–पहाणीत काही गावे स्वत:चा रस्ता स्वत:च करीत असल्याचे आढळले. (एवढेच काय स्वत: स्वत:ची वीजही निर्माण करीत आहेत. त्याबाबत पुढे येईलच !) यात काही वेळा सरकार मजुरीचा खर्च उचलते; पण प्रामुख्याने गावकऱ्यांनाच स्वयस्फूर्तीने पुढे यावे लागते. टंगसा गावाचा रस्ता 'तंग–सा' म्हणून गावाचे नाव टंगसा ! टंगसाचा रस्ता गावकऱ्यांनीच बांधला. अजूनही काम चालू आहे. कठूड गावचा रस्ता आणि एकूणच जीवन इतके कठीण की म्हणून–कठूड ! दोगडी गावचा रस्ता बनविण्याचे काम चालू होते. आम्ही गेलो तेव्हा गावकऱ्यांनी सांगितले की, गोविंदीनदीवरचा साकव त्यांनी गेल्या वर्षी एक शिबीर घेऊन बांधला मनात आलं की, हा साकव नसताना गावाची काय अवस्था असेल ? नदीने वाट अडविल्याने 'अडलेली' अनेक गावे महाराष्ट्रात आहेत; पण त्यातील किती गावांनी 'आपला रस्ता' शोधण्याचा प्रयत्न केलाय ?

गोपेश्वरहून प्रथम भेट दिली पापडियानाला. गोपेश्वरच्या खालच्या अंगालाच हे छोटेसे गाव आहे गावकऱ्यांबरोबर वृक्षारोपण-कार्यक्रमात भाग घेतला. सांस्कृतिक कार्यक्रमही झाला. खूप चर्चा, गप्पागोष्टी झाल्या. त्यामधून एक व नंतरच्याही पहाणीतून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की या आंदोलनक्षेत्रातील बहुतांश गावकऱ्यांना आंदोलनामुळे भौगोलिक पर्यावरणाची चांगल्यापैकी जाण आली असली तरी सामाजिक–सांस्कृतिक पर्यावरणाच्या दृष्टीने लोक अजून मागासच आहेत. दलित व स्त्रियांच्या बाबतीत हे विशेषच जाणवले. उदाहरणार्थ पापडियाना गावच्या लोकांनी आमच्याशी खूप सहकार्य केले. आदरातिथ्य केले; पण ती सर्व हरिजन मंडळी होती. नेमक्या त्याच कारणामुळे गावातील सवर्ण मंडळींनी आमच्याकडे पाठ फिरवली असावी आमच्याशी बोलायलाही ती नाखूष होती. म्हणजे संघाचे काम फक्त सवर्णांत वा हरिजनात आहे असं नाही. मुख्यत: सवर्णांत असले तरी हरिजनातही आहे. मात्र एकाच गावातील सवर्ण व हरिजनात एकत्रितरीत्या अभावानेच आढळले !

महिलांच्या बाबतीतले मागासलेपण खूपच जाणवले. वास्तविकत: आंदोलनात महिला आघाडीवर आहेत. कारणे दोन. एक तर रोजगाराच्या अभावामुळे गावातील बहुतांश बापेमंडळी आपल्या येथील कोकणासारखी दूर शहरात. दुसरी गोष्ट म्हणजे चारा–पाणी–सरपण आणणे ही कामे महिलांची. पूर्वी भात चुलीवर रांधायला टाकून शिजायच्या आत बाई मोळी घेऊन परतायची. जगलं संपत चालली. आता दिवस–दिवस वणवण करावी लागते. पोराला खाटेशी बांधून जावे लागते. राबण्याला सुमार नाही. राबराब राबायचे आणि जिणे असह्य झाले की, खुदकुशी करायची. काही वेळा दोघी–तिघी जणी एकत्र घट्ट बांधून घेऊन नदी जवळ करतात. नयार-नदीमध्ये नुकतीच अशी शोकांतिका घडली होती. परिस्थितीच्या अशा चटक्या-

मुळे साहजिकच महिला या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्या. गावोगावची महिला-मंगलदले वन-रक्षणासाठी सिद्ध होत आहेत. गोपेश्वरचे बांझ-बुरांझचे हरे-भरे जंगल अथवा अदवाणी-रेणीचे ताठ मानेचे जंगल त्याची जिती-जागती निशाणी आहे. आंदोलकानीही महिलांचा सहभाग वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे; पण आंदोलनात आघाडीवर असणाऱ्या महिलांचे एकूण समाज-जीवनातील स्थान गौणच आहे. एखाद्या पोखरी गावच्या महिला हक्काची साप्ताहिक सुट्टी मागतात अथवा बछेरमधली कला-वतीदेवी सर्वांचा विरोध धाव्यावर बसवून सरपंचपदाची निवडणूक लढवण्याची घोषणा करते; पण एरवी मात्र सर्वसाधारणपणे महिला संसाराचा गाडा ओढताना वा पति-देवाची सेवाचाकरी करण्या-तच कृतार्थता मानत असताना आढळल्या. अमक्याची बायको वा तमक्याची आई हीच तिची ओळख आणि या अमक्या-तमक्याच्या परिघातलेच जीवन. सर्वसाधारण लोकच नाही तर आंदोलनातील कार्यकर्तेही स्त्री-मुक्तीच्या जाणिवेपासून सात जन्म दूर !

अर्थात आमचीही परिस्थिती काही फार वेगळी नव्हती. उलट आमच्यामध्येच धम्माल गंमत होती. आमची दोन पथके एकत्र वाव-रत होती. त्यात कार्यकर्ते व बिगरकार्यकर्ते असे दोन प्रमुख गट. कार्यकर्त्यांमध्ये डावे-उजवे-मधले वगैरे आणखी उपगट असले तरी स्त्री-मुक्तीबद्दल बोलताना व विशेषत: बोलल्याप्रमाणे वागताना दोन सरळ-सोट गट पडायचे. एक स्त्री-मुक्तीचा आग्रह धरणारा. दुसरा स्त्री-मुक्ती तत्त्वतः मानणारा; पण परिस्थिती आणि व्यव-हाराच्या संदर्भात सबुरीची (आणि पहिल्या गटाच्या मते पलायन-वादी भूमिका घेणारा). भूमिका घेणारा आणि तिसरा स्त्री-मुक्ती सरळ-सरळ थोतांड मानणारा. एरवी आमने-सामने चर्चेच्या वेळेस काही हरकत नव्हती. प्रश्न यायचा गावात वावरताना. गट क्रमांक चार आणि पाच एकत्र वावरायचे. प्रत्येक गटाला स्वतंत्र मार्ग व मार्गदर्शक मिळवून देण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला; पण संघाची व्यवस्था वा आमचा आग्रह याबाबतीत तोकडा पडला. त्यामुळे दुर्दे-वाने दोन सुटसुटीत गट न रहाता एका विस्कळित समूहामध्ये त्याचे रूपांतर झाले. साहजिकच अपेक्षित सुटसुटीत भेट वा चर्चा शक्य व्हायची नाही. आपण कसलीही मुक्ती वा क्रांती करायला उत्तरा-खंडात जात नाही आहोत ही भूमिका सर्वांच्या मनावर ठसवली असली तरी परिस्थितीनुसार लोकांशी-कार्यकर्त्यांशी चर्चा अपेक्षितच होती. आता 'परिस्थितीनुसार' हा सापेक्ष शब्द झाला. प्रत्येक जण आपल्या मतानुसार त्याचा अर्थ लावायचा प्रयत्न करायचा. त्यामुळे हा नाजूक विषय काढावा की नाही, नाही काढल्यास का नाही, वा काढल्यास किती मर्यादेपर्यंत याविषयी मतभेद व्हायचे आणि ते अपरिहार्यच होते; पण गटक्रमांक तीनच्या साथीदाराप्रमाणे याही गटाचे वा इतरही गटातील साथीदाराचे मोठेपण हे की, त्यांनी तुटे-पर्यंत ताणले नाही आणि ताणल्याशिवाय मजाही नाही. चलता है ! All in the game !

आमच्या चर्चेत एक महत्त्वाचा मुद्दा यायचा की, परिस्थितीच्या रेट्यामुळे या आंदोलनात महिला आघाडीवर आल्या असल्या तरी इतरही आंदोलनात त्यांना जाणीवपूर्वक सहभागी करून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. केवळ स्त्री-मुक्तीसाठी नाही तर आंदोलनाच्या यशस्वितेसाठीही ही गोष्ट महत्त्वाची आहे. पुरुषाचा फ्यूज (अगदी शारीरिकदृष्ट्या) लौकर उडतो. स्त्रिया चुलीसारख्या असतात. पेटायला अवघड आणि धीमे. मात्र आग पकडली की संथ आणि ज्वलंत. सहजा-सहजी विझायची-बुझायची नाही !

आमच्या भटकतीत गावोगावच्या तपशिलापेक्षा अथवा प्रत्येक दिवसाच्या वाटचालीपेक्षा काही महत्त्वाच्या घटना वा प्रसंग मह-त्त्वाचे दोन, तर केवळ अविस्मरणीय एक होळीच्या दिवशीच्या वृक्षा-रोपणाचा आणि दुसरा 'आमचे पाणी-आमची वीज' सकल्पना साकार करणाऱ्या भगीरथ-पुत्राच्या भेटीचा !

## अशी पण होळी !

वगसा गावी पोहोचलो होळी-पौर्णिमेच्या दिवशी. गावात 'उल्हास' ही अतोनात होता; पण रूढार्थाने 'फागुन-मासाचा नाही. ढोल-नगारे-वाजंत्री-ताशे सर्व काही होते; पण एका अनोख्या उन्मादा-साठी. आज वृक्षांच्या चिता धडाधडा जळणार नव्हत्या तर धगधगत्या प्रायश्चित्ताचे प्रतीक म्हणून छोटे-छोटे अंकुर पृथ्वीच्या कुशीत विसावणार होते घट्ट उभे रहाण्यासाठी. इतरांना उभे करण्यासाठी रवींद्रनाथानी शांति-निकेतनामध्ये मातेच्या वात्सल्याने 'बाल-तरूंची' पालखी मिरवली; पण होळीच्या दिवशी वृक्षा-रोपणाच्या कल्पनेचे बीज ज्या कोणा जातिवंत प्रतिभावंताच्या मनात अंकुरले असेल त्याला खुद्द गुरुदेवानी पालखीतून झुलवीत नेला असता. गीताची अंजली नाही तर बौछर केला असता. होळी-पौर्णिमेला गावकऱ्याबरोबर आम्हीही वृक्षा-रोपणात सहभागी झालो. ग्रामसभासस्थानपासून गावापर्यंत पॉपलर्स-मजनू-देवदार-चीडची रोपे लावली. आजही त्या होळी-पौर्णिमेचे रंग ताजे आहेत, जिवंत आहेत. नुसत्या आठवणीने अंगावर रोमांच उभे रहातात !

टगसाच्या या आनंदोत्सवात एक विसंवादी सूर लागला. खरं तर संवादी-विसंवादी आम्हीच होतो. आमच्या कार्यक्रमात एक दारुडा घुसला तोही शिक्षक. शिक्षकाने दारू प्यावी ही कल्पनाच आमच्या-तील अनेकांना मंजूर नव्हती. म्हणजे इतरानी 'चालेऽल' पण शिक्षकाने नको. शिक्षक-डॉक्टर-पत्नी वगैरे मंडळीबद्दल आपण ज्या काही जुन्या आदर्शवादी-भोळ्या-भाबड्या कल्पना जोपासल्या आहेत त्याला तोड नाही. म्हणजे इतरानी लाख धंदे करावेत मात्र डॉक्टर-शिक्षक-पत्नीने कसं सेवाभावी असावे. ते असो. आमचा दारुडा शिक्षक 'टाइट' असला तरी he was talking sense in a way ! साऱ्या बोल-ण्याचा थोडक्यात अर्थ असा की, हे वृक्षारोपण वगैरे सर्व ठीक आहे; पण होळीच्या 'पवित्र' सणाला अशा अहिंसक-रंगहीन-रूपहीन गोष्टी बऱ्या नव्हेत. शोभा देत नाहीत. एकेक सणाचे एकेक महात्म्य असते. पुरुषार्थ असतो तो असा कमी होऊ देता कामा नये. इथेही शिक्षकाशी मी संपूर्णपणे सहमत होतो. फक्त महात्म्य-पुरुषार्थ याच्या व्याख्या बदलायला पाहिजेत. श्री. बाबा आमट्याशी गप्पा मारताना ते एकदा सहज म्हणाले होते की, 'पहिल्यांदा वाघाशी अथवा दरवडेखोराशी झुजण्यातच केवळ पुरुषार्थ वाटायचा. नंतर लक्षात आलं अंगभरच्या जखमात अळ्या पडलेल्या कुष्ठरोग्याला मलमपट्टी करण्यास, सातत्याने उपचार करण्यास पुरुषार्थच लागतो. पराकोटीचा पुरुषार्थ लागतो !' अशी जाण आल्यावर जीवनाचा संदर्भ बदलतो.

अर्थ बदलतो. मात्र अशी जाण येण्यासाठी जीवनाला सामोरे जावे लागते. चाकोरवाट सोडावी लागते !

## आमचं पाणी आमची वीज !

टंगसाची ही रात तर दोगडी–काडई या जुळ्या गावाची रीत आणखी मुलुखावेगळी. या गावच्या लोकानी आमचे गाव–आमचे पाणी एवढीच सकल्पना नाही तर साक्षात विजेलाच धरून आणली. स्वपराक्रमाने गावकऱ्याशी–श्री. आनंदसिंह विष्ट याच्याशी बातचीत करताना पराक्रमाची गाथा प्रत्यक्ष ऐकायला–बघायला मिळाली. आमच्यातील प्राध्यापक शेठांनी त्याचे सुंदर टिपण तयार केले आहे–

दोगडी गाव आहे ५००० फुटांवर. दोगडीचं जुळं भावंड......(प्रा. शेठ टिपण पहा–)

## सरकारला आव्हान देऊन गावासाठी वीज

हिमालयाच्या चमोली जिल्ह्यात ५००० फूट उंचीवर दोगडी गाव आहे. दोगडीचं जुळं भावंड काडई गाव ६००० फूट उंचीवर आहे आणि शेजारचं बनियाल गाव अगदी जीवघेण्या कड्यावर पाइनच्या गर्द झाडीत ७००० फूट उंचीवर विसावलं आहे. या तीन गावांची संयुक्त ग्रामसभा आहे. रस्ता नाही. गोविंदीनदीचे सुसाट वेगाने वाहणारे पाणी विपुल आहे.

या गावातील खेडुताना समोरच्या पपरीयाना, पाडुली, गोपेश्वर गावांतील विजेचे दिवे लुकलुकताना दिसत. आपलेही गाव विजेने उजळून जावे असे वाटू लागले आणि अर्ज–विनंत्या सुरू झाल्या. १९७७ सालापर्यंत अर्जांची भेंडोळी केराच्या टोपलीत गेली !

गरीब खेडुतांचा स्वाभिमान जागा झाला. मने प्रक्षुब्ध झाली, सरकारला धडा शिकविण्याची लाल भाषा सुरू झाली. सभा झाली. कुणी म्हणाले, 'आम्ही रस्ता उडवून देऊ, पूल तोडू, विजेचे खाब कापू, कालवे नष्ट करू !' उत्तराखंडातील आनंदसिंह विष्ट हे सर्वोदयी कार्यकर्ते या सभेला हजर होते. त्या सभेचे वातावरण विध्वंसाकडे जात आहे, हे पाहून ते उभे राहिले. त्यांनी पलसाही येथे ग्रामस्थानात सांगितले, 'मशालीचा जुलुस नको, कालवे तोडू नका ! सरकारकडून प्रतिकाराच्या दबावाने मिळवलेली वीज न मिळाल्यासारखीच आहे आपण स्वतःची वीज निर्माण करू. गोविंदीनदीचं पाणी ईश्वराची देणगी आहे. 'आमचे पाणी आमची वीज' सर्वोदयाच्या योजनेत शासनाला स्थान नाही !'

आनंदसिंह विष्टच्या उद्गाराने सभेला वेगळे वळण लागले.

ग्रामस्थानी अशिक्षित असूनही त्वरित अनेक वीज-निर्मिती-केंद्राना भेटी दिल्या. व्यावहारिक शहाणपणाने तंत्र शिकले आणि आझाद हिंद फौजेतील निवृत्त सैनिक बचनसिंह रावत, खादी ग्रामोद्योगाचे कार्यकर्ते पीताबरदत्त तिवारी, चद्रसिंह राणा, केदारसिंह विष्ट असे लोक आनंदसिंह विष्टच्या नेतृत्वाखाली गोविंदीनदीच्या उगमापासून प्रवाहाची पाहणी करण्यास निघाले. त्यानी बाकोडी गावाजवळ २०० फूट उंचीच्या कड्यावरून गोविंदी नदीचे पाणी वळवून वीज–निर्मितीचा प्रयोग करण्याचे ठरवले. गोविंदीनदीचे पाणी ८०० फूट लाब कालव्यातून कातळ कापून ४ इंच व्यासाच्या २०० फूट लांबीच्या पाइपमधून त्यानी खाली नेण्याचा निर्णय घेतला. या कामी कानपूरच्या आय. आय. टी. मधील प्राध्यापक योगेशकुमारने तांत्रिक मदत पुरवली. त्वरित टरबाइन खरेदी केला. ८ मे १९८१ ला गावच्या अशिक्षित अशा कुंदनसिहने टरबाइन चालवून विजेचा प्रकाश दाखविला. गावकऱ्यांच्या आशा फुलल्या. सरकारला दिलेले आव्हान प्रत्यक्षात आले !

आपल्याच गावच्या जंगलातील लाकूड तोडून खांब उभे केले. या सबध कामामधे जवळजवळ ५०,००० रु. खर्च आला. बँकेचे कर्ज काढले. बँकेचे व्याजाचे आकडे पाहताच पुन्हा प्रश्नचिन्हे निर्माण झाली; परंतु आनंदसिह हरले नाहीत ! ग्रामस्थांनी ८१–८२ सालात सरकारचे ठेके घेऊन कर्जफेड केली आणि ८१च्या दसऱ्यालाच कर्जमुक्त अशा आपल्या स्वतःच्या विजेच्या प्रकाशात राम-लीला केली !

## वीजनिर्मितीबरोबर उद्योगनिर्मिती

वीज घरात आली पण वीज ही उद्योगनिर्मितीसाठी वापरली पाहिजे याची जाण या कार्यकर्त्यांना होती. प्रथम त्यानी या विजेवर पिठाची चक्की सुरू केली. ३५ किलोवॅट वीज निर्माण करण्याचे स्वप्न त्यांचे होते. त्यानी हे अनुभवले होते की, आपले शोषण अनेक जळवानी होते. खाद्यतेल हे तर आवश्यक. आपल्या शेतात थोडीशी सरसो (मोहरी) पिकवून आपल्या घरापुरते तेल निर्माण करण्याची त्याची धडपड होती. पूर्वी या बायाना ४–४ दिवस तेलाच्या घाण्यावर जावे लागत असे. दोन किलो सरसोचे तेल काढण्यासाठी ५ ते ७ किलो गहू मजुरी म्हणून द्यावा लागत असे. हे शोषण थांबविण्याचा निर्णय आनंदसिंह विष्टने घेतला आणि विजेच्या बरोबर तेलाचा घाणा सुरू केला. विजेवर चालणारा हा घाणा चालवायचा तर त्याला सतत काम हवे. हिमालयातील शेतकरी या भागात सहा महिने शेती ओसाड ठेवतात. आनदसिंह विष्टने लोकांना समजावले, '६ महिने आपण येथे सरसो (मोहरी) लावू या. आपण पारंपारिक शेती सोडू या !'

सरसोमुळे प्रत्येक शेतकऱ्याला किमान ३ क्विंटल मोहरीचे तेल मिळेल. १ क्विंटल आपल्यापुरते ठेवून दोन महिने शेतकरी ते विकून आपल्या अन्य गरजा भागवेल. आज दोगडी, काडई गावात सरसोच्या पिवळ्या फुलानी शेती बहरली आहे. आनंदसिंह विष्टने याचबरोबर आपल्या गावातील तरुणाना खादी ग्रामोद्योगाच्या लाकडाशी संबंधित आणि लोकरीशी संबंधित व्यवसायांचे प्रशिक्षण घेण्यास पाठविले आहे.

आनंदसिंह विष्टच्या बरोबरीने टंकसाच्या पिताबरदत्त तिवारजीनीही याच गोविंदीनदीच्या पाण्यावर वीज–निर्मिती सुरू केली. गोविंदीच्या तीरावर त्यानी सॉ-मिल सुरू केली. कारण 'चिपको' आदोलन फार काळ भावनिक पातळीवर टिकून रहाणार नाही. त्यांनी हे पाहिले की, जंगलाशी संबंधित रोजगारही उपलब्ध केला पाहिजे. आनंदसिंह विष्ट व पीताबरदत्त तिवारीनी नर्सरी उभ्या केल्या. यातून त्यानी माल्टाची झाडे लावली. प्रत्येक शेतकऱ्याला माल्टाची रोपे ते देतात. एका झाडावर १५०० ते १००० माल्टा येतात. या माल्टाचा ज्यूस निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

या विजेच्या वापरावरही त्यानी नियंत्रण घातले आहे संध्याकाळी ६ पासून रात्री १२ पर्यंत व सकाळी ५ ते ७ पर्यंत वीज घरी वापरली जाते. चैनीसाठी वीज नाही. तसेच येणारा खर्च समान स्वरूपात वाटून घेऊन वीजनिर्मितीच्या ठिकाणी काम करणाऱ्या ग्रामस्थ बंधूना ते मेहताना देतात.

उत्तरप्रदेश सरकारने या ग्रामस्थांच्या प्रयोगावर आक्षेप घेतले; परंतु आनंदसिह विष्ट जिद्दीचे सर्वोदयी कार्यकर्ते आहेत. त्यानी त्वरित नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. स्वामीनाथन् यांच्याशी संपर्क साधला. डॉ. स्वामीनाथन् यांनी या प्रकल्पाला भेट दिली. त्यानी ग्रामस्थाचे कौतुक केले आणि उ. प्रदेश सरकारला समजाविले. इतकेच नव्हे तर दिल्लीतून त्यानी १ कि. मी. लाबीची विजेची तार देणगी म्हणून मिळवून दिली. काही उद्योगपतीनाही आवाहन केले. आनंदसिह विष्टच्या समोर एक आव्हान उभे आहे. 'वनियाल' या गावी वीज कशी न्यायची ? कारण सरळसोट कडयावर हे गाव उभे आहे. यासाठी त्यांना तंत्रज्ञांची व आर्थिक मदतीची गरज आहे.

## जनसहयोग

आनंदसिह विष्टजीनी हे प्रचंड काम उभे केल्यानंतर कोणाचीही गर्वाने छाती फुगेल; परंतु आनंदसिह विष्टजीजवळ नम्रता आहे. ते म्हणाले, 'हे प्रचंड काम लोकांच्या सहयोगाने झाले.' जनतेचे प्रेम माझ्यावर असल्याने ती मागे आली; परंतु या जनतेत आत्मविश्वास आहे. अडाणी असली तरी स्वाभिमानी आहे. प्रत्येकाला हे काम आपलेच वाटते. गाव एका कार्यकर्त्यामुळे घडत नसते तर गाव घडते; कार्यकर्त्याच्या मागे उभ्या असलेल्या जनशक्तीमुळे ! गावही कार्यकर्त्याला पारखते. माझ्याजवळ नफ्याची भूमिका नाही याची खात्री पटल्यावरच गाव आपल्या शक्तीनिशी उभे राहिले. किडुक-मिडुक विकून बँकेच्या कर्जातून ग्रामस्थांनी मला मुक्त केले !'

आनंदसिह म्हणाले, 'सरकार आज प्रत्येक धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून प्रचंड नफेखोरी करत आहे. वीजधंदा हा शासनाचा आता सोयीपेक्षा जनतला लुटण्याचा बाजार बनला आहे. सरकारची महामंडळे म्हणजे भ्रष्टाचाराचे अड्डे. गोर-गरिबाच्या सुख-दुःखाशी त्यांचा स्पर्श नाही. त्याना गरिबांच्या व्यथा कळत नाहीत. नोकरशाही अडाणी-अशिक्षितांना मेंढरासारखी समजते. यातूनच हा विजेचा प्रकल्प आमच्या स्वाभिमानाने उभा केला. आम्हाला कोणतीही प्रायव्हेट लिमिटेड कपनीही उभी करायची नाही. गावचं पाणी गावची वीज. सारे गाव विजेचे मालक. ना नोकर ना मालकसंबंध ना ग्राहकसंबंध. आम्ही प्रत्येक तरुणाला विद्युतजनित्र चालविण्याचे शिक्षण दिले आहे. मी सर्वोदयी कार्यकर्ता असल्याने माझा विकेन्द्रीकरणावर विश्वास आहे. शासनाने यापुढे केन्द्रीकरणाच्या भूमिकेचा आग्रह सोडावा. एका प्रकारे आमच्या गावाने स्वतःची वीज-निर्मिती करून शासनाला शासकीय मक्तेदारीविरुद्धची सूचना दिली आहे !'

## हिमालय आणि वीज

आज मोठ्या धरणाइतकीच छोटया धरणाची गरज आहे. आपल्याकडे छोटया धरणांचा वापर वीज-निर्मितीसाठी केलेला नाही. प्रचड धरणांपासून अनेक मैल ताराच्याद्वारे वीज वाहून नेण्यात २०% ऊर्जा वाया जाते. वीज खर्चिक पडते. या दृष्टीनेच हिमालयाला असलेले बारमाही पाण्याचा व उंचीच्या वरदानाचा फायदा घेऊन वीज निर्माण करण्याची गरज आहे. भोपाळच्या 'भारत हेवी इलेक्ट्रिकल 'ने छोटी जनित्रे बनविली आहेत. त्यांच्या मते १५ फूट उंचीवरून पडणाऱ्या पाण्यापासून एक टरबाइनद्वारे २२४ वॅट वीज निर्माण होऊ शकेल. हिमालयातील बारमाही वाहणाऱ्या डोंगराळ भागातील छोटया-मोठया नद्यांवर-धबधब्यावर वीज निर्माण केल्यास ५०० लाख किलोवॅट वीज एकटा हिमालय निर्माण करू शकेल ! पंजाब सरकारने हे लक्षात घेऊनच ५० छोटया धरणाची योजना आखली आहे.

दोगडी गावच्या 'जागेश्वर शिक्षण संस्थान 'ने शासकीय मक्तेदारी मोडून देशामध्ये विद्युत-निर्मितीच्या आंदोलनाला नवी दिशा दिली आहे.

आता परवलीचा शब्द, 'आमचे पाणी आमची वीज !'

आम्ही भेट दिलेल्या गावांपैकी कांडई गावाला कोसळकडयाचा (land-slides) सर्वात जास्त फटका बसला आहे. १९५४ साली तिथे मोठ्या प्रमाणावर कडे कोसळले आणि आजतागायत ती टांगती तलवार गावावर, लोकजीवनावर आहे. जगलतोडीबरोबरच आणखी एक गोष्ट यामागे आहे. ती म्हणजे तेथील जमिनीत लोह आणि गंधक मोठया प्रमाणावर आहे. कार्यकर्त्यांनी तिथे झाड लावण्याचा प्रयत्न केला; पण एक तर ती टिकत नाहीत वा आपण लावलेली झाडे सरकार तोडून नेणार नाही असा गावकऱ्याना अजून भरवसा वाटत नसल्याने लोकही वृक्षारोपणाबद्दल फारसे उत्साही आढळले नाहीत.

गावातील लोकाना 'कुदरती जल 'संबंधी म्हणजे निसर्गदत्त पाण्यासंबंधी फार आस्था असल्याचे जाणवते. डोक्यावर जंगल असले की, झरे आटत नाहीत याची त्याना पक्की जाण आहे. गैर गावी जंगलतोड झाल्याने नाल्याचे पाणी आटले व जमिनीची धूप वाढली असल्याचे त्यानी आवर्जून सागितले. टेहरीजवळच्या ल्हाशी गावची गोष्ट आठवते. गावाजवळ एक छोटासा नाला होता. डोक्यावरचे जंगल गेले आणि डोंगरावरचे पाणी झपाट्याने नाल्यातून वाहायला सुरुवात झाली. जमिनीची धूप वाढली. माती-मिश्रित पाण्याच्या घर्षणाने काठाचे बंधन झुगारले. तेथील विश्वंभर बूढा डोळ्यात पाणी आणून सागत होता, 'नातवासारखा गावाचा हात धरून वाहात होता हा नाला-जंगलाचा बंध तुटला आणि एकदम गावाच्या जिवावर उठला हा ! कोण आणि कुणाला समजावणार ?'

श्री. चंडीप्रसाद भट आणि त्याच्या साथीदारानी लोकांना-सरकारला हे 'समजवण्याचे' काम कसोशीने हाती घेतल्याचे जाणवले. कधी सामोपचाराने तर कधी संघटनेच्या बळावर त्यानी सरकारला नमविले आहे. रेणीच्या घटनेनंतर त्यानी सरकारला 'रेणी चौकशी समिती' नेमायला भाग पाडले. समितीने अलकनंदेच्या संवेदनाशील पाणलोटक्षेत्राचा अभ्यास करून या बाराशे चौरस किलोमीटर क्षेत्रात किमान दहा वर्षांकरिता जंगलतोडीस संपूर्ण बंदी घालण्याची शिफारस केली व सरकारला ती स्वीकारणे भाग पडले. मात्र युद्धामधील एका चकमकीच्या विजयावर समाधान मानायची तयारी नसलेल्या आंदोलकाचे एवढ्यावरच कृतकृत्यता मानल्याचे सुदैवाने जाणवले नाही. विजयातून ताकद आणि ताकदीतून विजय मिळवत जाणाऱ्या या बहाद्दर कार्यकर्त्यांचा हिमालयातील इतरही पाणलोटक्षेत्रातील व्यापारी जंगलतोड थाबविण्याचा निर्धार आहे. कोशिश आहे !

मुशाफिरी संपवून गोपेश्वरला परतताना राहून-राहून मनात

विचार येत होता, हिमालयच कशाला देशातील—आमच्या सह्याद्रीतील सवेदनाशील भागातील जंगलतोड आम्हाला थाबवता येईल का ?

हिमालयाच्या जोडीने सह्याद्री ताठ उभा राहील का ? खूप-खूप उशीर होण्याआधी—!

¤

अलकनंदेच्या खोऱ्यातील गट आपापल्या मार्गाला लागले आणि आता मला रस्ता पकडायचा होता भागीरथी खोऱ्याचा. अभ्यास-पहाणीतील ही दोन प्रमुख क्षेत्रे. प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक गटाबरोबर स्थानिक कार्यकर्ते होतेच. तरी पण प्रत्येक गटाचे कामकाज, अडचणी वगैरे पहाण्याची, निगराणी ठेवण्याची जरुरी होती. माझ्याबरोबर नागेश—शेखर वा अनिल असता तर अलकनंदा—भागीरथीच्या आघाड्या वाटून घेता आल्या असत्या; पण ते जमले नाही आणि दोन आघाड्या लढविणे आले. काम मुष्कील असले तरी अशक्य नव्हते. जोपर्यंत सर्व सुरळीत घडते, तोपर्यंत त्याचे विशेष काही वाटत नाही; पण एखादा फासा उलटा पडला की, 'तरी आम्ही सागत होतोच ऽऽ'ची तुणतुणी मागे लागतात. सुदैवाने तशी पाळी आली नाही. असो.

गटक्रमाक तीन – चार – पात्रला अलविदा करून गोपेश्वरहून निघालो. वाटेत श्रीनगरला उतरून पंधरा तारखेचे धर्मशाळेचे बुकिंग, लिफ्ट विद्यालयातील गाठी-भेटी आदि कार्यक्रम पक्के केले आणि दिवसभराचा प्रवास करून संध्याकाळी टेहरी गाठले. मला जायचे होते उत्तरकाशीच्या गटक्रमाक दोनला गाठायला. कारण त्या प्रदेशाची, बरोबरच्या साथीदार कार्यकर्त्यांची नीट माहिती नव्हती. मार्गही बिकट होता; पण टेहरीला पोहोचेपर्यंत उत्तर काशीच्या बसेस निघून गेल्या. आता टेहरीला मुक्काम करणे भाग होते. सहज बरोबरची डायरी काढून पाहिले. ठरलेल्या कार्यक्रमानुसार गटक्रमाक एक हेठल घाटीतल्या खाडी गावी मुक्काम पाहिजे होता. मिळेल तो ट्रक पकडला आणि रात्री खाडी गाठली. मित्र-मडळी भेटलात की नाही याचा भरोसा नव्हता. कारण हिमालयात आखीव कार्यक्रम काय कसलाच भरोसा नसतो; पण मंडळी मुक्कामी होती. हाती-पायी धड सुखरूप होती. मस्त मजेतही होती. माझे येणे त्याना अचानकच होते. ते सहजच आहे हे समजल्यावर त्यांना हायसे वाटले. गटाबरोबर दोन दिवस राहून (त्याची खबरबात नतर) मोर्चा वळवला दुसऱ्या गटाला गाठण्यासाठी लम्बगावला. आश्चर्य म्हणजे ठरलेल्या दिवशी—ठरलेल्या वेळी ते ठरलेल्या जागी होते. This is मात्र three much !

¤

भागीरथी—२ गटाला उत्तराखंडातील उत्तरकाशी आणि टेहरी या दोन जिल्ह्यांतील गावाची अभ्यासपहाणी करायची होती. उत्तरकाशीमधील डाग, पोखरी, कन्सेट, गंगनानी, कनोडिया-गाड, भगेली आणि टेहरी जिल्ह्यातील लम्बगाव, नौघर, रौनिया, पोखरी ( ही अलग पोखरी), सिलयारा, चमियाला ही गावे पहाणीसाठी निवडली होती. यातील डांग, पोखरी, कन्सेंट ही गावे उत्तरकाशी गावाच्या जवळपास आहेत तर गंगनानी, भगेली आदि गावे उत्तरकाशीपासून सुमारे साठ किलोमीटर दूर आहेत.

सुरुवातीपासूनच प्रवास फार भन्नाट झाला! आमच्यातील सीताराम पवार नादेड जिल्ह्यातील मुखेडचा, तर शोभा कोठारवार चंद्रपूर जिल्ह्यातील *आळापल्लीची. राना—वनाचे वळण अगी असले* तरी पहाडा—बिहाडाची संगत जरा कमीच. ऋषीकेशपासून बसने पहाड चढायला सुरुवात केली तसतसा सीतारामजीचा चेहरा पडत—पडत चालला. हिमालयाचे सोडा, मागे सीताराम सातपुड्यातील धडगावला आमच्या एका शिबिराला आला होता. तेव्हा त्याने बसने सातपुड्यातील दोनच पुडे (रागा) फस्ट केल्यावर बसमधून उडी मारून कसा पडणार होतो याची हकीकत सागून सर्वांस हसता—हसता नाकी—नऊ आणले होते! इथे तर त्याला अख्खा हिमालय आणि हिमालयाला सीताराम गवसला होता ! जोडीला खाडीपर्यंत जी जी रे रे. सरकते पहाड आणि कोसळल्या दऱ्या पाहून तो 'अबाऽबा' म्हणून आपल्या बंजारी बोलीत असा काही चित्र—विचित्र आवाज काढायचा, गाणी म्हणायचा की ते ऐकून हसता—हसता हिमालयही पूरा खाली कोसळला असता! झालेही तसेच. ऋषिकेशहून निघालेली आमची बस आम्हाला थेट उत्तरकाशीच्या सर्वोदय आश्रमात पोहोचती करणार होती, पण उत्तरकाशीच्या दहा किलोमीटरआधी बस गप्पकन् थाबली खाली उतरून बघतो तो रस्ता गायब—अगदी लापता! आम्ही जरा हादरलोच. रस्त्यावरची नावाची पाटी वा मैलाचा दगड गायब होणे एक वेळ ठीक आहे; पण रस्ताच गायब म्हणजे काय म्हणावं ! पण विशेष काही घडलं नाही, अशा थाटात विजय जडधारी आम्हाला माती—पत्थराच्या ढिगाऱ्यातून पलीकडे घेऊन गेला. पलीकडची बस गाठली आणि आश्रमात घेऊन आला. तेव्हाच मनात ओळखलं आपला भिडू एकदम पक्का आहे. कुठेही त्याच्याबरोबर बिनधास्त जावं !

उत्तरकाशीचा सर्वोदयआश्रम अगदी भागीरथीच्या किनारी आहे. छोटा आणि सुदर. श्री. सुरेंद्रदत्त भट्ट व त्याचे कुटुबीय तिथे रहातात. सुप्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्त्या श्रीमती इंदुताई टिळेकरही अधून-मधून तिथे मुक्कामाला असतात. आपल्या कार्याने त्यानी कार्यकर्त्यांचे-गाव-कऱ्याचे प्रेम—आदर सपादन केला आहे. श्री. सुदरलाल बहुगुणा तर *त्याना खूप मानतात. आदोलनात त्यानी महत्वपूर्ण सहयोग दिला* आहे, त्याचा ऋणनिर्देशही करतात.

उत्तरकाशीच्या पहिल्या दिवशी पावसाने झोडपून काढले. बाहेर पाऊस आणि आत भटजींच्या बोलण्याची बरसात ! श्री. भटजीकडून या भागाची—आदोलनाची खूप माहिती समजली. दुसऱ्या दिवशी पावसाने जरा आराम घेतल्यावर उत्तरकाशीजवळपासच्या गावाकडे निघालो खुद्द उत्तरकाशी अतिशय रमणीय आहे चारी बाजूनी पहाड, मध्ये खोऱ्यात गाव आणि गावामधून वाहणारी भागीरथी. प्रसिद्ध नेहरू निर्यारोहण संस्था गावाच्या परिसरातच आहे. आम्ही भेट दिलेले पहिले गाव डाग उत्तरकाशीजवळच; पण जरा अवघड जागी, पहाडाच्या पोटाशी वसले आहे. सुमारे साडेपाच हजार फूट उंचीवर वसलेले हे डाग असो वा नंतरची पोखरी—कन्सेंट आदि गावे असोत पहाडाच्या कुशीत विसावलेल्या किंवा पसरलेल्या या गावाची रचना फार मजेशीर असायची. बहुसंख्य घरे लाकडाची. घर दुमजली असले तर प्रथमदर्शनी जिना घराच्या पुढच्या बाजूने. दुसऱ्या मजल्यावर मध्यभागी लाकडाच्या कोरीव काम केलेल्या तीन कमानी असणारच. मग ते घर लाकडाचे असो वा आधुनिक सिमेंटचे असो. घरा-

वर भेलून्ता वा पठाल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या स्लेटच्या दगडांचे ओबडधाबड छप्पर. घराचा खालचा मजला गुरासाठी, चाऱ्याच्या साठवणुकीसाठी आणि वरचा मजला माणसाच्या वावरासाठी. वरच्या मजल्यावर समोर एक लावसडक सज्जा. खोल्या छोटया–छोटया. खोल्यांच्या खिडक्याही नामके वास्ते. घर. आतून खूप ऊबदार. एक मजली घर असले तर काहीसे अंतर राखून गोठे वा गोशाळा बाधलेल्या. अनेक गावांत तर उन्हाळयाच्या दिवसात पशुधन वर डोंगरावरच्या गोशाळेमध्ये हलविले जाते.

आमच्या पहाणीक्षेत्रातील उत्तरकाशी वा लम्वगाव ही तशी मोठी गावे; पण उत्तराखंडातील जिल्हयाची गावेसुद्धा एखाद्या नेपथ्यासाठी सेटवर मांडलेल्या छोटेखानी गावासारखी दिसतात. गावातील कुटुंबसंख्या सरासरी ४० ते ६५, गावांमध्ये रजपूत बहुसंख्य. ब्राह्मण वत्स आणि हरिजनांची दोन–तीन घरं. टेहरीमधल्या पोखरीसारख्या एखाद्या गावाचा अपवाद, तेथील कुटुबसंख्या शंभर, त्यातील हरिजनांची तीस. नावामध्ये 'सिंग', असले ('नावामध्ये काय' असे असले तरी !) की रजपूत, 'प्रसाद वा दत्त' असले की ब्राह्मण आणि 'लाल' असले की हरिजन हे साधे वर्गीकरण हळू–हळू ओळखीचे होत गेले. आम्ही आपापसात प्रपतातलीचे मुद्दे वाटून घेतले होते; पण गावात प्रपत विचारताना ही समीकरणं लक्षात ठेवावी लागत. उदाहरणार्थ एखादा सिंग वा दत्तच सर्व प्रपताची उत्तरे देऊ लागला की, आमच्यातील एखादा सभासद हळूच इतरांकडून माहिती काढायचा. गावामधे सर्वेक्षण करताना वा माहिती घेताना हा धोडा अथवा अडचण नेहमी जाणवते. एक तर आपल्या समाज–व्यवस्थेची अगदी कुटुंबसंस्थेचीही उतरंड इतकी पक्की आहे की गावातला सवर्ण पाटील असो, 'शाळेतला मास्तर असो वा घरातला बाप वा नवरा असो तो एकदा बोलायला लागला की, इतराचे आवाज बंद ! मोकळया चर्चेची सवयच नाही. त्यातून आदर–आदवच्या चित्र–विचित्र कल्पना, आम्ही भेटी दिलेल्या गावात अस्पृश्यता आढळली नाही. तीव्र जातीयतेचाही वास आला नाही. काही गावातून तर राजपुताच्या घरात माडीला माडी लावून हरिजनही चर्चेस बसले होते; पण सगळया वागण्या-बोलण्यात एक जाणवत होते. हरिजन 'आपली पायरी सांभाळण्याची' दक्षता घेत आहेत. एखाद्या ठिकाणी मजूर–मालक नात्यामुळे तसे असेल; पण एकंदर वृत्ती पायरी साभाळण्याची. उद्या जेव्हा हे हरिजन मेहरबानी वा सवर्णांचा चांगुलपणा म्हणून नाही तर समानता हक्क म्हणून मागतील तेव्हा खरी परीक्षा होईल मग बागची–बेलची दूर नही !

गावाच्या सभोवार उतारावर पायऱ्या–पायऱ्याची शेती केलेली असते. खूपशी जंगलजमीन शेती–लागवडीखाली आली असावी. योग्य बांध–बदिस्ती केली नाही त्र अशी डोगर–उतारावरची जमीन अनुत्पादित ठरते. मग पोटा–पाण्यासाठी लोक आणखी जंगल तोडून जमीन लागवडीखाली आणण्याचा खटाटोप करतात वा उपलब्ध जागेचा इंचन् इंच वापर करण्याच्या उद्देशाने अगदी नदीनाल्याच्या काठापर्यंत शेत नांगरून ठेवतात. निसर्गही मग इंच–इंच सोडत नाही. जंगल–आच्छादन गेल्याने जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर वाढते व नदी–नाले काठावरची शेत–जमीन गिळून टाकतात. मग लोक आणखी जंगल तोडून जमीन लागवडीखाली आणतात आणि हे दुष्टचक्र चालू रहाते. अखेर मानवी पर्यावरणाच्या सिद्धान्तानुसार धुपणाऱ्या मातीबरोबर वाहात–वाहात एक दिवस पहाडी माणूस दूर मैदानावर फेकला जातो !

डोंगरउतारावरील शेतीचा हा अवघड सोपान कष्टपूर्ण जीवनाचे वा भविष्यातील अंधःकाराचे प्रतीक आहे. जमिनीची योग्य बाध–बदिस्ती वा वनशेतीने हे संतुलन सावरायला पाहिजे. मात्र पर्यावरणाच्या या समस्याना केवळ यात्रिक वा तात्रिक उत्तरे नाहीत. डोगरउतारावरील अनुत्पादक शेतीकडून वन–शेती (Forest farming) वा वन आणि शेतीच्या मिश्रणाकडे (agri–silviculture) कडे लोकाना जसे वळवावे लागेल तसेच त्याकरिता काही मूलभूत प्रश्नानाही सामोरे जावे लागेल. कारण ही समस्या लोकसंख्येच्या दबावाशी जशी निगडित आहे, तशीच सामाजिक असमानतेशी–जमीनमालकीच्या प्रश्नाशीही निगडित आहे सामाजिक संदर्भ सोडून ही समस्या सोडविता येणार नाही. उदाहरणार्थ मूठभर रईस लोकाच्या हातात जोपर्यंत बहुतांश सुपीक जमीन आहे, तोपर्यंत आम गरीब जनतेचे अनुत्पादक (पण उपलब्ध) जंगल–पहाडी जमिनीवरचे आक्रमण आणि पर्यायी दुष्टचक्र चालूच रहाणार ! गोर–गरिबाना अन्य पर्यायच नाही; परंतु सामाजिक असमानता दूर करणाऱ्या जमीन–मालकीच्या नवीन कायद्यांबरोबर आपोआपच पर्यावरणाची जाणीव वाढीस लागते असा अनुभव नाही. बोलिव्हिया-पेरूमध्ये जमीनमालकीचे नवे कायदे आले; पण जमिनीची प्रचड धूप चालूच राहिली. स्वामित्वाचे नवीन संबंध आपण निर्माण करू शकतो; परंतु नवीन जमीन निर्माण करता येत नाही ! पर्यावरणाच्या गाभ्याला धक्का बसला की मग देश पहाडी वा मैदानी असो अथवा साम्यवादी वा भाडवलवादी असो, निसर्ग कसा ठोकर मारतो ते साहेल देशातील (मॉरिटियाना, सेनेगल, माली इ.) भयानक दुष्काळापासून ते अलकनंदा–भागिरथीच्या हाहाःकारापर्यंत अनेक वेळा सिद्ध झाले आहे. अमेरिकेतल्या 'धी ग्रेट फेनस्' व रशियाच्या 'व्हर्जिन लॅण्ड' येथील शेतीच्या धोकादायक प्रयोगातूनही हाच धोक्याचा लाल बावटा दिसला आहे आपल्या पायाखालची एकुलती एक जमीन हरवू नये म्हणून या प्रयोगाची माहिती खूप मार्गदर्शक ठरेल !
¤

१४ एप्रिल १९३४ रोजी अर्ध्या अमेरिकाखडावर अक्षरशः धुळीचा वर्षाव झाला. ११ मेला परत एक धुळीचं वादळ झालं. न्यूयॉर्क शहरात दिवसा अंधारून आलं. अटलांटिक महासागरात तीनशे मैल आतपर्यंत उभ्या असलेल्या बोटीवरही धुळीचा वर्षाव झाला. या संकटाचं मूळ होतं १५०० मैल दूरवरच्या मोन्टाना भागात–दी ग्रेट लेनस् म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विभागात !

अमेरिकेच्या टेकसासपासून मोन्टाना आणि डाकोटापासून कॅनडापर्यंत पसरलेला विस्तीर्ण प्रदेश दी ग्रेट लेनस् म्हणून ओळखला जातो. तुफान वाऱ्याच्या या गवताळ प्रदेशात भटके रेडइडियनस् म्हशीचे कळप घेऊन हिंडत असत. शेतीपेक्षा पशुपालनावर त्याचे जीवन निर्भर होते आणि प्रदेशाच्या पर्यावरणाशी ही जीवनपद्धती सुसगत होती. किंबहुना प्रदेशाच्या पर्यावरणाशी सुसंगत जीवन–पद्धती त्यानी स्वीकारली होती १९ व्या शतकापर्यंत असा सिलसिला होता.

'विज्ञान–युग' आलं आणि मामला बदलला. निसर्गाची अफाट साधन–संपत्ती आणि तिचे दोहन करण्याची मानवाची अमर्याद बुद्धी याबद्दलचा अपरंपार विश्वास वाढला. १८६० चे यादवी युद्ध झाले आणि मुळातल्या 'दी ग्रेट अमेरिकन डेझर्ट' चे नामांतर 'दी ग्रेट लेनस्' असं झालं. अगदी शहाजोगपणे! रेल्वेकंपन्या आणि जमिनीचे दलाल याना आपल्या धंद्याला बरकत आणण्यासाठी अशा नामकरणाची गरज होती. त्यानीं वर्तमानपत्रात मोठमोठ्या जाहिराती देऊन 'दी ग्रेट लेनस्' मधल्या अफलातून नफ्याचे रंगीत चित्र रंगवले. 'या जमिनी घ्या आणि थोड्या गुंतवणुकीमध्ये पैसाच पैसा मिळवा!' असा आभास निर्माण केला. अमेरिकन स्वभावधर्माप्रमाणे 'दी ग्रेट लेनस्'ची एक 'क्रेझ'च निर्माण झाली. आपली आयुष्यभरची कमाई पणाला लावून वा कर्जाऊ घेऊन लोकाच्या झुंडीच्या झुंडी या मैदानाकडे धावल्या. निसर्गाचा–पर्यावरणाचा जराही विवेक न ठेवता त्यानी जमिनी शेतीसाठी लागवडीखाली आणायला सुरुवात केली सरकारनेही अनेक आकर्षक योजना जाहीर केल्या. दोन–चार वर्षे हे सुख–स्वप्न टिकलं. प्रदेशाच्या निसर्गचक्रानुसार १८९० साली दुष्काळ आला आणि नित्य नेमाने येतच राहिला. गव्हा–मक्याचे पीक बीजासकट गेले! अनेकाची स्वप्ने अक्षरश: धुळीला मिळाली. कारण नागरून-नागरून जमीन भुसभुशीत झाल्याने, अकालाबरोबरच तुफानी वाऱ्याने वरची उपजाऊ मिट्टी भिरकावून दिली गेली. निसर्गाचा इतका सरळसोट धडाही न शिकता काही लोक टॅक्टरने आणखी–आणखी जमिनी लागवडीखाली आणून तोटा भरून काढण्याच्या मागे लागले अधून-मधून वाढणारा गव्हाचा भाव त्याना भुलवीत राहिला. परिणाम एवढाच झाला, हे लोक मातीत गेलेच; पण त्याचबरोबर या मैदानाचे व आजूबाजूच्या प्रदेशांचे मोठ्या प्रमाणावर वाळवंटीकरण सुरू झाले १९३३–३४ च्या भीषण दुष्काळाने तर उरल्या-सुरल्या हिंमतवानाचे कंबरडेच मोडले. शेकडो शेतकऱ्याचे दिवाळे वाजले गुरं-ढोरं शेताभातात उपासाने तडफडू लागली. काही जणांनी हार स्वीकारली आणि पश्चिमेकडच्या आणखी एका नंदनवनाचा-कॅलिफोर्नियाचा-रस्ता पकडला त्याच एका वेड्या आशेने, आंधळ्या विश्वासाने! जॉन स्टाइनबेकने 'दी ग्रेपस् ऑफ रॅथ' या कादबरीत त्याचे अत्यंत दर्दभरे वर्णन केले आहे.

मध्यवर्ती सरकारने अखेर 'मृद सधारण सेवा' विभाग निर्माण करून या मैदानाचा व इतरही ठिकाणचे निसर्गसंतुलन सावरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आजही करत आहे; पण अखेर मनुष्यस्वभावापुढे इलाज नाही. बाजारात जरा अन्न-धान्याचे भाव वाढले की, विज्ञानाच्या जोरावर 'निसर्गावर मात' करण्याची स्वप्ने–दु:स्वप्ने परत पडू लागतात. परत एकवार 'दी ग्रेट प्लेनस्'चे मृगजळ खुणावू लागते!

पण मृगजळामागे–कारणे कोणतीही असोत, फक्त भांडवलदारच धावतात असे नाही, तर साम्यवादीही धावतात. रशियात नेमके तेच घडले. १९५३ साली निकिता क्रुश्चोव्हने अधिकार ग्रहण केला तेव्हा रशियाची अन्नधान्याच्या आघाडीवर बरोबर क्रातीपूर्व हालतच होती. अशा स्थितीत आहे त्या शेत–जमिनीतून अधिक धान्य पिकावयाचे असेल तर प्रचंड भाडवली खर्च करावा लागणार होता आणि ते भारी उद्योग–धंद्यांना प्राधान्य देणाऱ्या राष्ट्रीय उद्दिष्टात आणि अंदाज–पत्रकात बसत नव्हते. त्याऐवजी उत्तरेकडील कझाकिस्तान, पश्चिम सैबेरिया, पूर्वरशियामधील 'कुंवार धरती' (Virgin–land) कामाला आणली तर हमखास फळणार होती. कमी खर्चात–कमी वेळात अपरंपार फळणार होती. निदान तशी अटकळ होती, भरोसा होता.

क्रुश्चेव्हसारखा मनस्वी माणूस! सर्व यंत्रणा त्याने वेठीला लावली. लोकाच्या राष्ट्रभक्तीला साद घातली. लोकानीही अनंत अडचणींची पर्वा न करता जोरदार प्रतिसाद दिला चाळीस दशलक्ष हेक्टर चराऊ जमीन नवीन लागवडीखाली आली. जमिनीचा इंचन् इंच वापरला जाण्याची भाषा सुरू झाली. जमीन 'पडीक' ठेवणाऱ्याच्या परंपरागत पद्धतीचे वाभाडे काढण्यात आले आणि सुरुवातीच्या काही काळात अन्नधान्याचे उत्पन्न ५०% वाढले. त्यात 'ग्रेन फार्मिंग रिसर्च इस्टिट्यूट'च्या कॉम्रेड बारायेव्हचा सबुरीचा सूर पार बुडून गेला!

कॉम्रेड बारयेव्हला उत्पादनवाढीची असूया नव्हती. फक्त ही उत्पादनवाढ चिरंतन आणि शाश्वत ठरावी अशी प्रामाणिक इच्छा होती आणि ती इच्छा व्यक्त करण्याएवढे धैर्य होते. एका बाजूस तात्पुरते उत्पन्न वाढत असले तरी दुसऱ्या बाजूस होणारी जमिनीची प्रचंड धूप त्याला अस्वस्थ करू लागली म्हणून त्याने जमिनीची खोल नांगरट न करण्याचा, जमिनीचा मगदूर ओळखून एकतृतियांश जमीन क्रमाक्रमाने पडीक ठेवण्याचा, तृण–आच्छादनाची पूर्ण विल्हेवाट न लावण्याचा नम्र पण निर्भीड सल्ला दिला; पण ऐकतो कोण? क्रुश्चेव्हने उघड–उघड बारयेव्हवर टीकास्त्र सोडले. क्रुश्चेव्हला साथ देणारे अल्ट्राय रिसर्च इस्टिट्यूटच्या कॉम्रेड नालिव्हायकोसारखे शास्त्रज्ञही मिळाले.

अखेर निसर्गाने आपला हिसका दाखवलाच. १९६३ नतर अन्न–उत्पादन झपाट्याने खाली जाऊ लागले. तीन दशलक्ष हेक्टर जमिनीवरील उभे पीक पाण्याअभावी बरबाद झाले आणि वर्षामागून वर्षे ते बरबादच होत राहिले. मॉर्गन या शास्त्रज्ञाच्या मते तर १९६२–च्या दरम्यान 'व्हर्जिन लॅंड' मधील एकूण सतरा दशलक्ष हेक्टर जमिनीची वाऱ्यामुळे प्रचंड धूप झाली आणि त्यातील चार दशलक्ष जमीन तर लागवडीतून कायमच बरबाद झाली.

'लूझिंग ग्राउंड' ('ढासळती जमीन') Losing Ground या आपल्या उद्‌बोधक पुस्तकात ही उदाहरणे देऊन (Two Costly Lessons ...) एरिक एकहोम हा जगप्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञ आपल्याला सवाल करतो की, इतराच्या घोडचुकावरून आपण काही बोध घेणार आहोत की भाबड्या आशावादाच्या आणि खोट्या अहंवादाच्या घोड्यावर बसून 'निसर्गावर मात' करण्याची तीच (वा त्याच) घोडचुका परत–परत करणार आहोत?

असो. विषयाच्या नादात फारच स्थलांतर आणि कालांतर झालं. परत एकदा आपल्या महाराष्ट्राकडे व हिमालयाकडे जाऊ या! बोला 'बेळगाव–कारवार–निपाणी–टेक्सास–युक्रेनसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे!

तथास्तु!

(क्रमश:)

## खालसा करेगा राज : पृष्ठ ११ वरून

जणू ! ह्याखेरीज सैन्यालादेखील सज्ज राह्यला सांगितलं गेलं होतं म्हणे ! !

दिल्लीतले मोर्चे संपले तरी अमृतसरमध्ये ते अजून चालू आहेत. व ह्या मोर्च्यांची व्याप्ती जालंधर, लुधियाना वगैरे विविध शहरातूनही पसरवायची योजना अकाली तख्तानं आखली आहे. आंदोलन अधिकाधिक उग्रही करण्याचं अकालीनी ठरवलं आहे. प्रत्यक्षात मात्र दहा तारखेला (डिसेंबर १९८२) जेव्हा सर्व बडे अकाली नेते अमृतसरला जमले. तेव्हा समुदरी हॉलचा एकूण नूर काही मला ठीक दिसला नाही. एशियाडच्या वेळी आंदोलनं करून केंद्रसरकारला वेठीस धरता येईल, आपल्या योजनानुसार मागण्या मान्य करून घेता येतील असा आडाखा अकालीनी आखलेला होता. ह्या प्रश्नाला एकदम आंतरराष्ट्रीय पातळीवर एशियाडच्या निमित्तानं नेलं की झकत केंद्राला वाकावं लागेल ही अपेक्षा; पण केंद्रसरकार ह्या वेळी फारच कडक राहिलं. हरियाणा सरकारनंही केंद्राला उत्तम साथ दिली. परिणामत: एशियाडच्या ऐवजी अकालीचे मनसुबेच उधळून लावले गेले. त्यात थोडा अतिरेक होऊन सर्वसामान्य व ह्या तथाकथित 'धर्मयुद्धा' शी तसा संबंध नसलेला शीखही ओढला गेला. त्याच्या भावना त्यामुळे दुखवल्या गेल्या. हा सामान्य धर्मभोळा शीख त्यामुळे भिंद्रनवाले गटाकडे जास्त जास्त ओढला गेला. केंद्राच्या कडक धोरणामुळे एशियाड सुरळीत पार पडले. शीख प्रश्न आतरराष्ट्रीय बनला नाही हे खरं तरी अंतर्गत क्षेत्रात सर्वसामान्य शीख त्यामुळं बिथरला ह्यातही वाद नाही.

ह्याचा फायदा अकालीमधल्या इतर कुणाहीपेक्षा भिंद्रनवाले ह्यानाच मिळाला आहे. समुंदरी हॉलमध्ये अकाली तख्ताची सभा संत लोंगोवाल ह्याच्या अध्यक्षतेखाली चालू असताना संत जर्नेलसिंग भिंद्रनवाले सुवर्णमदिर परिसरातल्याच गुरुनानक निवासात आरामात आपल्या 'खटिया' वर पहुडलेले होते. मी तिथे पोचलो तर माझ्या 'संत' ह्या कल्पनेलाच धक्का बसला. त्यांच्या आजूबाजूला चार-पाच हत्यारी संरक्षक होते. समोर बरीच मंडळी होती. बसून 'संतां' चं बौद्धिक ऐकत होती; पण सहज लक्ष गेलं तर दिसून आलं की, बौद्धिक ऐकणाऱ्या मंडळीवर 'नजर' ठेवणारे हत्यारी संरक्षक त्या खोलीत अनेक होते. संत भिंद्रनवाले ह्याचा हा असला खाक्या तसा प्रसिद्ध आहे. ते दिल्लीत किंवा इतर कुठे बाहेर जातात तेव्हाही त्याच्या आजूबाजूला हत्यारी शरीरसंरक्षक असतात. त्याच्या मागे पुढे दोन दोन गाड्या (त्याही हत्यारबंद !) धावत असतात. आणि संताचा जाण्यायेण्याचा मार्ग, त्याचे निवासस्थान ह्या सर्वांभोवती त्यामुळे आपोआपच गूढतेचं वलय निर्माण होऊन जातं....

### संत उवाच

भिंद्रनवाले बोलतानाही लोकांच्या भावना छेडत, भडकवत बोलतात. ग्रंथसाहिबा, गुरु नानकाची भाष्यं ह्यांचा आधार घेऊन बोलतात. 'सनातनी' शीखच म्हणा ना. त्यात ते मधनंच राजकारणावर घसरून इंदिरा गांधी, केंद्रसरकार ह्यांच्यावरही कडक हल्ले चढवतात. ह्या दोघांची धोरणं शीखविरोधी कशी आहेत ते पटवून द्यायचा प्रयत्न करतात. इंदिराजीच्या 'सेक्युलर' वादावर कडाडून हल्ला चढवून ते म्हणतात, '. त्या पक्क्या हिंदू आहेत. जातीय हिंदू आहेत. म्हणूनच त्यांनी एशियाडच्या वेळी शिखाना होरपळून काढलं त्यांच्याबरोबरच एशियाडसाठी अनेक मशिदी, मुसलमान-वस्त्याही दिल्लीत धुळीत मिळवल्या...मतांसाठी त्या मुसलमानांचा अनुनय मधनं मधनं करतातही; पण तो देखावा असतो. शिखाबाबत तर त्या आणखीनच पक्षपाती आहेत इथे आर्यसमाज, हिंदू सुरक्षा समिती वगैरेंच्या लोकाना त्या नेहेमीच पक्षपाती वागणूक देतात. वादापायी ह्याच्याशीही त्यांची आतून हातमिळवणी चालू आहे ..'सेक्युलर'च्या नावाखाली इथे शिखांची आणि शीखधर्माची गळचेपी चालू आहे हिंदू ब्राह्मणाना त्यांचं जानवं वापरायला इथे परवानगी आहे. शिखांना कृपाणही तितकंच, किंबहुना त्याहून अधिकच, पवित्र आहे; पण ते वाळगायला मात्र बंदी आहे. दाढी-केस न राखण्याबाबतही आमच्यातल्या तरुण मुलाना फूस दिली जाते. शीख जमातच नष्ट व्हावी असा हा एक मोठा सर्वपक्षीय कट आहे इंदिराजी तर सामील आहेतच; पण आमच्यातले काही लोकही ह्या गोष्टीना अप्रत्यक्ष मदत करतात. जनता, भाजपा वगैरेंशी संगनमत करतात. संघाशी हातमिळवणी करतात...आज म्हणून आवश्यक आहे ती शुद्ध शीख शिकवणूक. तिची जपणूक. गुरु नानक, गोविंदसिंग ह्याची आणि 'ग्रंथसाहिबा' ची नुसती पूजा करून भागणार नाही, तर त्याची शिकवणूक आचरणात आणायला हवी. त्याच्या रक्षणासाठी लढायला हवं आणि शिखाची अस्मिता (Sikh Nationality) राखायची असेल, तर भारत संघराज्यातर्गत 'स्वायत्त शिखिस्थान' शिवाय दुसरा तरणोपाय नाही ! ...'

संत भिंद्रनवाले शिखांवरील अन्यायाचे इतरही अनेक दाखले देतात. विमानअपहरण-प्रकरणाचे समर्थन करतात. पोलीस, सैन्यातले अनेक शीख 'शिखाना' मदत करायला कसे तयार आहेत ह्याचे दाखले देतात आणि ह्या सगळ्याचा 'अकाली दल' कसा नीट उपयोग करून घेत नाहीत ह्याचीही उदाहरणं सांगतात.

भिंद्रनवाले अकालींच्या सभेत स्वत: कधी भाग घेत नाहीत; पण त्याची मतं, त्यांनी दिलेल्या शिव्या तिथपर्यंत अवश्य पोचतात. १० ता. च्या बड्याच्या सभेत काहीसा पराभूत सूर लागला होता. पुढे काय करायचं, राजिनामे पुढे पाठवायचे की नाही काहीच ठरत नव्हतं. त्या वेळी कुणी तरी मध्येच उभं राहून म्हणाल, '...सोडून द्या हे सगळे उद्योग तुम्ही. भिंद्रवाल्यांच्या हाती सगळं सोपवून द्या. मग बघा मार्ग सापडतो की नाही. अशा तऱ्हेनं भिंद्रनवाले प्रत्येक अकाली सभेवर आपली छाप पाडतात आणि अकालीना अधिकाधिक कडक धोरण स्वीकारायला भाग पाडतात. वास्तवात प्रकाशसिंग बादल, सुरजितसिंग बर्नाला, बलवतसिंग रमालिया व खुद्द संत हरचंदसिंग लोंगोवाल वगैरे वरिष्ठ अकाली नेते तितकेसे कडक नाहीत. खाजगीत बादल, बर्नाला वगैरे मान्यही करतात की, 'एशियाडच्या वेळी आम्ही फार ताणलं...त्या वेळी समझौता करायला हवा होता. कदा-

चित चदीगढ आम्हाला मिळाल असतं. धार्मिक मागण्या तर मान्य होतच होत्या नदीच्या पाण्याच्या वाटपाबाबतही समिति नेमली गेली असती तशा मागण्या पदरात पडल्या असत्या तर सन्मानपूर्वक तिढा सुटला असता, पण भिंद्रानवाले, तलवंडी वगैरेंनी 'आनंदपूर ठराव' हाच शेवटचा समझौता असा आक्रमक आग्रह धरला. शिखात आपली प्रतिमा जहाल राहावी म्हणून मग बाकीच्यानाही त्याची 'री' ओढण क्रमप्राप्त झालं. त्यातनं आजची परिस्थिती निर्माण झाली आहे...केंद्र सरकार स्वायत्ततेची मागणी मान्य करणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे, त्याना ते अडचणीचे आहे हेही मान्य. तीच गोष्ट सुवर्णमदिरात ट्रान्समीटर बसवण्याची. ह्या अशक्य मागण्या सोडून द्याव्यात असं आम्हालाही वाटतं; पण आज आम्ही ते तसं करणं म्हणजे लढाऊपणात आम्ही कमी पडलो असं जाहीर करण्यासारखं ठरेल. सघटना खच्ची होईल...त्यापेक्षा केंद्रानं आपण होऊन काही घोषणा कराव्या. त्यानी धार्मिक मागण्या मान्य करण्याच घोषित केल आहेच. स्वतंत्र ट्रान्समीटर ऐवजी दिल्ली–अमृतसर आदि नभोवाणीकेंद्रावरून 'गुरुवाणी' सादर करण्याची कल्पनाही त्याना जवळजवळ मान्य आहे. त्याची व चंदीगढची घोषणा त्यानी करावी म्हणजे आम्हालाही लवचिक धोरण स्वीकारता येईल.'

काँग्रेस गोटातल्या सूत्राना मात्र खात्री आहे की, अशी काही घोषणा केंद्रसरकार करणार नाही. "...तस करणं म्हणजे अकाली दडपणापुढे मान तुकवण होईल. एकदा दबलेलं शासनाला सारखंच दाबण्याचा प्रयत्न होईल आणि शिखाचा दबाव आणायचं तंत्र म्हणजे दहशतवाद. एकदम आंतरराष्ट्रीय प्रश्न बनवायाचा प्रयत्न. पुन्हा एका ठिकाणी मान तुकवली की, इतरत्र काय ? आसाम, नागा असे अनेक प्रश्न चिघळतील त्याच काय ? अकालीपुढं फक्त मर्यादित प्रश्न आहे इंदिराजी आणि केंद्राला सर्व प्रश्न एकूण देशाच्या सदर्भात सोडवावे लागतात. तशी सावध पावल टाकावी लागतात !... खर तर इथे आतरराष्ट्रीय राजकारण आहे. अमेरिका तिथल्या शिखाना भडकावत तिथले शीख इथे येतात. इथल्या लोकाना चिथवतात. अमेरिकेच्याच सल्ल्यानुसार पाकिस्तान सरकारलाही शिखाविषयी सहानुभूती दाखवायला सांगितल गेलं आहे. त्याना मदत करायला सांगितल गेल आहे. . तेव्हा हा प्रश्न साधा नाही. अतिशय गुतागुतीचा आहे. ..."

एका वरिष्ठ पण मवाळ अकाली नेत्याच्या मते मात्र '...हा प्रश्न तसा आतरराष्ट्रीय मुळीच नाही. जगभर शीख पसरले आहेत हे कबूल; पण त्यातले मूठभर सोडले तर कुणालाही 'खलिस्थान' किंवा 'शिखिस्थान' नको आहे. वर्षानुवर्षे बाहेर राहून ही शीखमंडळी अधिकाधिक प्रगतिशील बनलेली आहे. मायभूमीबद्दल प्रेम राखूनही ही मडळी आहेत त्या त्या ठिकाणी त्या त्या समाजात सरमिसळून गेली आहेत. राष्ट्राची शान ते सर्वत्र वाढवत आहेत. मूठभर मडळीना चिथावून त्याच्या मागण्याद्वारे भारतात गोंधळ माजवायचा प्रयत्न कुठे होतच नसेल असं नाही; पण सर्व शिखाचा त्याला पाठिंबा नाही हे सत्य आहे आम्ही भारताचाच एक भाग आहोत. 'तन–मन–धन' सर्वस्वी आम्ही भारतीय आहोत व तसेच राह्यचा आमचा निर्धार आहे. म्हणूनच म्हणतो हा प्रश्न आतरराष्ट्रीय मुळीच नाही. असलाच तर तो काँग्रेस अंतर्गत झगड्याचा आहे. दरबारासिंग विरुद्ध झैलसिंग असा तो झगडा आहे. आजही जर्नैलसिंग भिंद्रनवाले ह्यांना राष्ट्रपतिभवनातून सूचना येत राहतात अशी एक वोलवा अमृतसरमध्ये आहे .. एवढं मात्र आज दुर्दैवानं खरं आहे की, हा प्रश्न झैलसिंग विरुद्ध दरबारासिंग एवढा आज मर्यादित राहिलेला नाही, त्याची व्याप्ती त्यापलीकडे गेली आहे. निव्वळ दरबारासिंग जाऊन आज हा प्रश्न सुटणार नाही'

### जनता पक्षप्रयोग

अकाली, कम्युनिस्ट, जनता, भाजपा, हिंदू संघर्ष समिती आदी काही ठिकाणी मात्र दरबारसिंगांची मुख्यमंत्रीपदावरून उचलबांगडी झाली आणि चंदीगढ पंजाबला मिळाल की, आजचं आंदोलन संपेल अशी खात्री अनेकांना वाटते. एवढं झालं की, सत जर्नैलसिंग भिंद्रनवाले–तळवंडी गटाला आवरलं जाईल. इतर अकालीना झोडपून काढलं जाईल किंवा इतर काही आमिषं दाखवली जातील व लढा मिटेल. सर्वत्र हिंडल्यावर व अनेक कार्यकर्त्यांशी बोलल्यावर मला स्वतःला

---

### खलिस्तानला पाठिंबा सर्वांचाच

पजाबात अनेक ठिकाणी हा किस्सा मला ऐकायला मिळाला पजाबातल्या काँग्रेसजनाची अनौपचारिक बैठक भरली होती. अनेक महत्त्वाचे पुढारीही ह्या बैठकीला हजर होते. मुख्यमंत्री दरबारासिंग हेही होते. विषय खलिस्थानवर घसरला. बैठकीत अमेरिकन व कॅनेडियन शिखांवर, खलिस्थानवर तोंडसुख घेतलं जाऊ लागलं. मध्येच कुणी तरी म्हणालं, "....ह्या देशातला प्रत्येक शीख मग तो कितीही उच्चपदस्थ असू दे–त्याची 'खलिस्थान' ह्या शब्दाला सहानुभूती आहे मागणीला मनातल्या मनात तरी पाठिंबा आहे. उघडरीत्या, व्यावहारिकदृष्ट्या खलिस्थानला पाठिंबा देणं शहाणपणाच नाही हे माहीत असूनही ! ..."

"तुम्ही म्हणता ते खरं असेलही कदाचित्; पण एक अपवाद जरूर आहे !" इति मुख्यमंत्री.

"कोण तो ?" ह्या कुणाच्या तरी प्रश्नावर मुख्यमंत्री दरबारासिंग ह्यांनी उत्तर दिलं, "तुमच्यासमोर बसलेला मी !"

किस्सा ऐकवणारे प्रत्येक जण पुढे म्हणत, "...निदान मुख्यमंत्री असेपर्यंत तरी नक्कीच !" ....

... ...शिरोमणी गुरुद्वारा प्रबधक कमिटीचे ओळीने चौदाव्या वर्षी अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या सत गुरुचरणसिंग तोहरा ह्यानी मात्र अगदी अलीकडेच जाहीर केलं आहे–

"...नाइलाजच झाला तर खलिस्तानला आम्हाला पाठिंबा द्यावा लागेल व मग त्यासाठी जिवाचं रान करून झगडावं लागेल... !" *

---

मात्र तसं वाटत नाही. कदाचित् सत्तेचं साटंलोटं झाल्यावर राजकीय लढा थंडावेलही; पण आज जे त्याला धार्मिक स्वरूप आलं आहे त्यावर मात्र ह्या मलमपट्टीचा उपयोग व्हायची शक्यता नाही. हिंदू-शीख भावना ह्या दोन्ही समाजात आज तीव्रतेनं पसरलेल्या आहेत. शहरी भागात त्याची तीव्रता जास्तच दाहक आहे. ह्यावर जोपर्यंत पूर्णत्वानं तोडगा सापडत नाही तोपर्यंत हा प्रश्न पूर्णपणे मिटणं अवघड आहे.

प्रकाशसिंग बादलांसारखे काही अकालीनेते, भाजपाचे पंजाब प्रदेश अध्यक्ष, सरदार स्वर्णसिंग ह्यांना मात्र हे प्रश्नही सुटू शकतील असं वाटतं. प्रकाशसिंग बादल, बर्नाला वगैरे त्यासाठी जनता राजवटीच्या काळातला पंजाबातला 'अकाली-जनता' सहकार्याचा दाखला देतात. 'शिखांना अनेक विरोधकांचा पाठिंबा आहे. त्यांची सहानुभूती आहे. मोठ्या प्रमाणावर हिंदू शिखांशी सरमिसळून राहतातही. दुर्दैवानं राजकीय स्वार्थासाठी एकमेकांपासून अलग पाडलं गेलं. आम्ही ह्या राजकीय डावाला बळी पडलोही एक प्रकारे .. पण अजूनही मला वाटतं की, आम्ही धोरणात थोडी लवचिकता आणली तर जनता, भाजपा वगैरेंचं सहकार्य आम्हाला मिळू शकेल. काँग्रेसची कारस्थानं आम्ही उघळून लावू शकू ...'

'जनता राजवटीत तुम्ही २॥-३ वर्षे सत्तेवर होतात. केंद्रातही सत्तेत तुमची भागिदारी होती. तेव्हा चंदीगढचा व इतर पंजाब-प्रश्न तुम्ही सोडवू शकला असतात ?' ह्या माझ्या प्रश्नावर बादल म्हणाले की, 'त्या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील होतो; पण आम्हाला वेळ फार कमी मिळाला. त्या वेळातही काँग्रेसनं अनेक अडथळे आणायला सुरुवात केली होती. हिंदू-शीख वादाला स्वत.च्या स्वार्थासाठी खरं उग्र वळण त्याच वेळी काँग्रेसनं दिलं. त्यात जनता पक्षातली अंतर्गत भांडणं वाढत गेली ...'

'खरं तर जनता पक्षाच्या निवडणूक-जाहीरनाम्याप्रमाणे त्या वेळी, राज्यांना अधिकाधिक अधिकार देण्यालाही जनता राजवट वचनबद्ध होती.' आमच्या चर्चेत मध्येच हस्तक्षेप करत संत लोंगोवाल म्हणाले, 'आजही आम्ही त्यापेक्षा काही फार वेगळं मागत नाही. प्रत्येक राज्याला, त्या त्या राज्याशी निगडित प्रश्नांसंबंधी स्वयंनिर्णयाचे हक्क असावेत एवढीच आमची मागणी आहे. स्वतंत्र शिखिस्थान किंवा खलिस्थान आम्ही कधीच मागितलेलं नाही. फुटून निघण्याचा विचार सर्वसामान्य शिखांतही नाही आणि अकालीनेत्यात तर नाहीच नाही ! ते सारे केंद्रानं आणि काही हितशत्रूंनी शिखांना बदनाम करण्यासाठी उभे केलेले सापळे आहेत. त्यांच्या कल्पनाशक्तीतून तयार झालेले. शीख अशा सापळ्यात अडकणार नाहीत. लढा चालूच ठेवतील आणि आनंदपूर ठरावानुसार सर्व मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा चालूच राहील. मग कितीही वर्षे वाट पाहावी लागली तरी ! ...

## विनोद आणि धोका

"...पंजाबी हिंदू आणि पंजाबी शीख ह्या खऱ्या तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हिंदूंची पंजाबी शीख भाषा आणि शिखांच्या धर्मसूत्रांचं मूलतत्त्व असलेला हिंदूधर्म ह्यामुळे ह्या दोन्ही समाजांना एका मजबूत सूत्रानं एकत्र बांधलेलं आहे. दुर्दैवानं आज त्यांच्यात बेकीचे प्रयत्न होत आहेत.शीख पंजाबी भाषा आणि गुरुमुखी लिपीचा आणि शीख धर्माचा हेका धरून आहेत, तर हिंदू समाज हिंदी भाषा, देवनागरी, हिंदूधर्म ह्याचा हट्ट धरून वेगळ्या चुलीचा आग्रह धरत आहेत. आणि ही भाडणं सर्वसामान्य हिंदू आणि शीख समाजाच्या माथी मारत आहेत तथाकथित सुशिक्षित पुढारी आणि पत्रकार !

"...'खलिस्थान' ही ह्याच सुशिक्षित आणि पत्रकार मंडळींनी मांडलेली कल्पना आणि ह्या कल्पनेची माडणी, भाडणं हे सगळं चालू असतं उर्दूतून ! जालंदरमधून प्रसिद्ध होणाऱ्या प्रताप, मिलाप आदी उर्दू वृत्तपत्रातून. ही उर्दू वृत्तपत्रं चालवतात हिंदूच ! उर्दूतनं पजाबी-हिंदी-देवनागरी--गुरुबाणी अशी भांडणं चालावीत ह्यापरता दुसरा विनोद कुठला ?

"...पण ह्या तथाकथित सुशिक्षितांना, पत्रपंडितांना एक धोक्याचा कंदील दाखवावासा वाटतो. विशेषत: ते जेव्हा 'खलिस्थान' हा शब्द प्रचलित करीत आहेत तेव्हा ! असं म्हणतात की, 'पाकिस्तान' हा शब्दही ह्या मंडळींनीच प्रथम पुढे आणला, लोकाच्या गळी उतरवला !! हाच तो धोक्याचा इशारा."

—एस्. डी. सिंगी, दिल्ली

('हिंदुस्थान टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झालेले एक पत्र)

## लोंगोवालांचा सुवर्णमध्य

सत लोंगोवाल ह्यांच्याकडचा मामला संत भिंद्रनवाले ह्यांच्यापेक्षा खूपच सौम्य आहे. तिथे हत्यारबंद शिखांची इकडून तिकडे वर्दळ दिसत नव्हती आणि स्वत: लोंगोवाल ह्यांची बोलण्याची पद्धतही संयमी, विचारशील, समोरच्यावर छाप पाडणारी वाटली. त्यांच्याशी बोलताना असं मनातही येऊ शकणार नाही की, त्यांची जी अलीकडची वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेली वक्तव्यं आहेत ती त्यांचीच असतील ! इतके ते शात वाटले. त्यांच्याविषयी बोलताना काही पत्रकारांचंही म्हणण असं पडलं की, मुळात त्यांचा तसा स्वभावही नाही. आज दोन्ही बाजू आपापल्या विचारसरणीला घट्ट पकडून बसलेल्या असताना खर तर अकालींनी जो उघड पवित्रा घेतलेला आहे त्यानुसार पंजाब केव्हाच पेटायचा; पण एकीकडे अतिशय जहाल भाषा वापरत असतानाही दुसरीकडे अकालींमधल्या भिंद्रनवाले-तळवंडी-तोहरा गटाला काबूत ठेवण्याचं कामही लोंगोवाल-बादल प्रभृतीच करत आहेत. सरदार स्वर्णसिंग पतप्रधानाचे खास दूत म्हणून वावरतात हे खरं; परतु सरदार स्वर्णसिंग व इतर अकाली ह्यांच्या बोलण्यात मध्यस्थही एक प्रकारे स्वत. लोंगोवालच आहेत असं म्हटलं तर वावगं ठरू नये ... किंबहुना त्यांच्यामुळेच सरदार स्वर्णसिंग थोडी तरी प्रगती अकाली बोलण्यामध्ये करू शकले आहेत

संत लोंगोवालांविषयी मी जे ऐकलं आणि प्रत्यक्ष बघितलं, त्या पार्श्वभूमीवर माजी सैनिकांना जे आवाहन त्यांनी केलं आहे ते मला

विसंगत वाटलं. त्याविषयी बोलताना संत लोंगोवाल म्हणाले, '...अत्यंत विकृत स्वरूपात ह्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. अनेक माजी सैनिकांनी आम्हाला सहानुभूती दिलेली आहे. अनेकांनी सध्याच्या आंदोलनात प्रत्यक्ष उडी घेऊन स्वतःला अटकही करवून घेतलेली आहे. अनेक माजी अधिकारीही ह्या संबंधात आम्हाला मदत करू इच्छितात आता ह्या सर्वांना आमच्या मागण्याबाबत विचारविनिमय करायला आम्ही एकत्रित बोलावलं तर त्यात वावगं काय? त्यांना बोलावलं तर लगेच आम्ही सैनिकी डावपेच लढवणार आहोत किंवा सशस्त्र हिंसाचारी लढा सुरू करणार आहोत असा खोटा डांगोरा पिटण्याचं कारणच काय? सैन्यात महत्त्वाच्या अधिकारावर राहिल्यानं केंद्रसरकारमध्ये ह्या माजी अधिकाऱ्यांचे चांगले संबंध आहेत. त्या संबंधाचा उपयोग करून आमचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीनं काही मदत मिळू शकते का एवढंच पाहण्याचा आमचा विचार आहे. आमचं आंदोलन शांततामय आहे. ते तसंच राहील. हिंसेवर आमचा विश्वास नाही.'

असं संत लोंगोवाल म्हणत असले तरी देशभर संत लोंगोवालांनी माजी सैनिकांची सभा बोलावण्याच्या प्रश्नावर हलकल्लोळ उठला. बाजूच्या हरियाणा राज्यात मुख्यमंत्री भजनलाल ह्यांनी तडकाफडकी माजी सैन्याधिकाऱ्यांची एक सभा बोलावून त्यांचा सन्मान केला. सैन्याधिकाऱ्यांच्या व सैनिकांच्या राष्ट्रीय वृत्तीचा, अतुलनीय शौर्याचा गौरव करून त्याच सभेत अशा राष्ट्रीय बाण्याच्या लोकांना भडकावण्याच्या 'काही लोकांच्या' प्रयत्नावर कडाडून हल्लाही चढवला. त्याच सभेत साहजिकच एका माजी सेनाधिकाऱ्यानं उठून केंद्रसरकारला आपला संपूर्ण पाठिंबा प्रत्येक वेळी राहील असं घोषित केलं. '...सैनिकांना, मग ते माजी असोत वा आजी, असं आवाहन करणंच मुळात राष्ट्रविरोधी आहे...' असही त्या अधिकाऱ्यानं त्याच सभेत जाहीर करून टाकलं. गंमत ही की, हरियाणात झालेल्या सभेत बोलणारा हा माजी सेनाधिकारीही सरदारजीच होता! ह्या सगळ्याचा साहजिक परिणाम म्हणजे अनेक सेनाधिकाऱ्यांनी व त्यांच्या संघटनांनी ह्या तऱ्हेच्या सभेला पूर्ण विरोध जाहीर केला आहे. प्रत्यक्षात मात्र आजही अनेक आजी-माजी शीख सेनाधिकारी भिंद्रनवाले-लोंगोवाल ह्यांना भेटत आहेत. अमृतसर-जालंधरमधल्या काही पत्रकारांच्या मते भिंद्रनवाले-सेनाधिकारी असा जो घनिष्ठ दुवा गेल्या काही महिन्यात सांधला गेला त्याला शह देण्यासाठीच लोंगोवाल ह्यांनी हा डाव टाकला आहे. ह्या सूत्रानुसार, 'अनेक आजी-माजी सेनाधिकाऱ्यांशी भिंद्रनवाले संपर्क साधून आहेत. भिंद्रनवाले ह्यांनी आपल्या कर्मठ-सनातनी भूमिकेमुळं अनेक कडवे भक्त निर्माण केले आहेत. साधारणतः मध्यमवर्गीय तरुणवर्ग त्यांच्याकडे झुकलेला आहे. अनेक शस्त्रास्त्र-पारंगत तरुण त्यांच्या दिमतीला नेहमी हजर असतात त्यांच्यामार्फत ते कुठलीही आततायी कृत्यं स्वतः नामानिराळे राहून करवून घेऊ शकतात. जालंदरच्या 'पंजाब केसरी'चे संपादक लाला जगत्‌नारायण ह्यांचा खून हाही त्यातलाच एक प्रकार असं अमृतसरमध्ये सगळेच उघडउघड बोलतात.. पैशाची कमतरता भिंद्रनवाल्यांना कधीच नाही! ...मागे काही अमेरिकन शीख अमृतसरला आले होते. त्यांनी इथल्या सनातनवादाला खतपाणी घातलं. त्यांनी भिंद्रनवाल्यांनाही पाठिंबा दिला. तेव्हापासून भिंद्रनवाले ह्यांना पैसा उभं करणं अजिबात अवघड उरलेलं नाही. असं म्हणतात की, 'वेळ पडली तर, भिंद्रनवाले एका दिवसात कोटी कोटी रुपये उभे करू शकतात! ...'भिंद्रनवाले व त्यांच्या जहाल अनुयायांनी प्रचंड शस्त्रसंभारही गोळा केला आहे हे अमृतसरमध्ये प्रत्येकजण उघड बोलतो. तरुण शिखांना ह्या शस्त्रांच्या वापराचंही शिक्षण इथं दिलं जातं. अशीही बोलवा अमृतसरमध्ये आहे की, अमेरिकी-पाकिस्तानी मदतीने सरहद्दीपलीकडे नेऊन अशा तरुणांना गनिमी युद्धाचं शिक्षण देण्याचेही प्रयत्न चालू आहेत आणि ह्या व अशाच विविध अतिरेकी चाळ्यांना पायबंद घालून एकूण आंदोलन व शीखसमाज स्वतःच्या नेतृत्वाखाली ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न लोंगोवाल-बादल-बर्नाला गटाचे चालू आहेत.

ह्या संदर्भात अतिरेकी अकाली गटांनी अमृतसरमध्ये सर्व अल्पसंख्याकांची परिषद बोलावून कॉंग्रेस व केंद्रसरकारविरुद्ध लढ्याच्या प्रयत्नाला जो विरोध झाला त्याचा प्रामुख्याने विचार करायला हवा.

---

## दरारासिंग भिंद्रनवाले

संत जर्नेलसिंग भिंद्रनवाले ह्यांचा आज पंजाबात जबरदस्त दरारा आहे. ते व त्यांच्या तैनातीत असलेले सशस्त्र दल ह्यांची दहशत सामान्य जनतेला तर आहेच आहे, पण पोलीसदलातल्या लोकांनाही आहे. भिंद्रनवाल्यांच्या अनेक गोष्टी त्यामुळे सध्या पंजाबात ऐकायला मिळतात. एकदा म्हणे त्यांच्या अनुयायावर अमृतसरमध्ये पोलिसांनी छडीमार केला. काहींना पकडलं. प्रक्षुब्ध जमावावर गोळीबारही झाला. भिंद्रनवाले पोलिसांवर संतापले. काही पोलिसांना त्यानंतर सज्जड दम भरला गेला. काहींना बेदम चोपलं गेलं, तर नंतर गावात बॉम्बस्फोटांची मालिकाच सुरू झाली. मंत्र्यांची, पोलीसअधिकाऱ्यांची घरं, पोलीसचौक्या ही लक्ष्य होती. काही दिवसातच संबंधित पोलीसअधिकारी भिंद्रनवाल्यांच्या भेटीला आले आणि त्यांनी म्हणे जर्नेलसिंग भिंद्रनवाल्यांची चक्क माफी मागितली...

आणि मग असे प्रकार नित्याचेच होऊ लागले. असं म्हणतात की, कुणी कुणी येऊन केव्हा कशी माफी मागितली त्याचा तपशील जर्नेलसिंग भिंद्रनवाले जाहीरपणे सभांमधून सांगतात...

...भिंद्रनवाल्यांची मिरवणूक हाही असाच दरारा निर्माण करणारा प्रकार आहे. त्यांच्यामागे सशस्त्र पहारेकरी असतात. मागच्या-पुढच्या गाड्यांतून संदूकी रोखलेले खालसा पथीय असतात.

...त्यांचा हा असा दरारा. खास कर्मठ सनातनी विचार. बोलण्याची ढब. लोक त्यांना गुरु नानकांचा अवतार किंवा देवदूतच मानतात... *

माझ्याशी बोलताना गुरुचरणसिंग तोहरा अशा परिषदेविषयी बोलले होते. लोंगोवाल ह्यानीही अमृतसरहून अशा परिषदेच्या शक्यतेची घोषणा केली होती. प्रत्यक्षात प्रयत्न सुरू झाले तेव्हा जम्मू–काश्मिरचे मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला, जामा मसजिदीचे शाही इमाम व इतर काहीशी गुफ्तगू करण्याचा प्रयत्न अतिरेक्यांनी केला. असं म्हणतात की, प्रयत्न होता तो प्रामुख्याने मुसलमान–शीख आघाडी उभारण्याचा व त्याला फारुख अब्दुल्लाचा आशीर्वाद होता. 'काश्मिरचं धान्यकोठार पंजाब आहे.' असं फारुख अब्दुल्ला म्हणतात व त्यामुळं पंजाबात शांतता नांदणं आवश्यक आहे, असंही ते म्हणतात; पण मुळात हिंदूविरुद्ध आघाडी उभारून त्याना ठोकण्याचा व नंतर शिखानाही वेगळं काढून ठोकण्याचाच हा 'पॅन–इस्लामी' डाव असावा असंही काही पत्रकार खाजगीत बोलूनही जातात. त्यातलं खरं–खोटं त्यात गुतलेल्यांनाच माहीत; पण प्रत्यक्षात, अकालींच्या दहा तारखेच्या अमृतसर बैठकीत मात्र अशा प्रस्तावाला विरोधच झाला. इमाम–अब्दुल्ला वा आणी कुणाला ह्यात गोवू नये असंच ह्या बैठकीत ठरलं. ह्या निर्णयाचं श्रेय लोंगोवाल–

### अखंड पंजाब !

मी ज्या दिवशी अमृतसरला पोचलो त्याच दिवशी लाहोरला भारत–पाकिस्तान ह्यांच्यातला पहिला क्रिकेट-कसोटी सामना सुरू होणार होता. सध्या सरहद्दीनजीकच्या अतारी रेल्वेस्टेशनवरून लाहोरला तासाभरात पोचता येतं. हे स्टेशन अमृतसरहून अवघ्या दहा–बारा किलोमीटर अंतरावर होतं. क्रिकेट–सामन्याच्या निमित्ताने लाहोरला जायसाठी त्या दिवशी अमृतसरहून ह्या स्टेशनकडे लोकाची सारखी रीघ लागलेली होती. त्यात सरदारजींचच प्रमाण जास्त होतं. अनेक पंजाबी हिंदूही अर्थात होतेच.

विशेष चौकशी केली, काही बातचीत केली तेव्हा असं समजलं की, ह्यात अनेक, क्रिकेटचं निमित्त करून पाकिस्तानला इतर कारणासाठी भेट देणारे उत्सुक होते. त्यातल्या अनेकांना आपलं मूळ 'वतन', आपलं 'घर' बघायचं होतं. अशा शिखाना म्हणे पाकिस्तानात वागणूकही चागली मिळते. त्याच्या प–पंजाबात राहिलेल्या अनेक पवित्र गुरुद्वाराना (विशेषत: लाहोरच्या "नानका साहिब"ला) भेटी द्यायला म्हणे खास सवलती पुरवल्या जातात. त्यातही आणखी विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे पाकितानात, विशेषत: मूळच्या प. पंजाब प्रदेशात अनेक ठिकाणी म्हणे भिंद्रनवाले याचे फोटोही आढळतात..."

"....जर्नेलसिंग भिंद्रनवाले खरोखरच देवाचे अवतार आहेत. नानकसाहिबच म्हणाना! एकना एक दिवस दोन्ही पंजाब एक आणून आमची अत्युच्च पवित्र तीर्थक्षेत्रं, जी आज पाकिस्तानात आहेत, आमच्यासाठी खुली करून देतील तर ते भिंद्रनवालेच!..." असा अनेक धर्मश्रद्ध शिखाचा विश्वास आहे......

*

बादल गटालाच जावं !

'...असे प्रयत्न अजूनही जारी आहेत' असं हिंदू कृतिसमितीच्या लोकाना मात्र वाटतं. आर्यसमाजाच्या पुढाऱ्याच्या पुढाकाराखाली ही समिती काम करते. अमृतसरमध्ये एका हिंदू देवळातून एक महंत आज सनातनी हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या आवश्यकतेवर भर देतात. तिथे त्यांची प्रवचनं सुरू असतात. किंबहुना जे सुवर्णमंदिरात किंवा मंजीसाहिब गुरुद्वारात चालतं त्याला प्रत्युत्तर असाच काहीसा हा प्रकार चालू असतो. '...शीख समाजाला खरं तर गेल्या ३५ वर्षांत सर्व मानमरातब मिळाले आहेत. अधिकाराच्या, सत्तेच्या सर्व जागा शिखांनीच भूषवलेल्या आहेत. इथला शीख समाज अत्यंत प्रगत झालेला आहे, श्रीमंतही आहे आणि असं असूनही हा समाज 'अन्याय होतो, अन्याय होतो' असं ओरडत असतो नि केंद्रासकट सगळे त्याचे लाड पुरवत असतात...खरा इथे दडपला जातो तो हिंदू समाज. मुसलमान अल्पसंख्य म्हणून त्याचे लाड. शीख प्रभावशाली म्हणून त्याच्यापुढे नतमस्तक. हिंदू समाज असा की, त्याच्यावर कितीही प्रहार केले तरी तो ते सहन करतो. म्हणून त्यानाच शासन, शीख सगळे ठोकून काढत असतात. ह्याला कुठे तरी पायबंद घातला गेलाच पाहिजे...'

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका प्रचारकांचं मत थोडं वेगळं आहे. ते म्हणतात, '...मुळात हिंदू–शीख हा भेदच कृत्रिम आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळच्या विभाजनापासून आजतागायत सतत आम्ही संघाचे लोक व शीख बाधव खांद्याला खांदा लावून परकीयांशी लढलेले आहोत. शीख वा अन्य कुठलेही सैनिक आघाडीवर लढत असताना मागची फळी आम्ही कुठलाही गाजावाजा न करता सांभाळली आहे. कित्येक शीख माझे स्वतःचे अतिशय चांगले मित्र आहेत..आजची यादवीसदृश परिस्थिती म्हणूनच मला फार फार निराश करते. ह्याच्यावर काही तरी मार्ग शोधला गेला पाहिजे. तुम्ही पत्रकारांनी परिस्थिती सुधारायला मदत केली पाहिजे!'

### व्यापार–उद्योगावर परिणाम

अमृतसरहून जालंधर–लुधियाना ह्या व्यापारी शहरांकडे जाताना हेच वेगवेगळे विचार मनात होते आणि काही अशी संघप्रचारकांच्या विचारांशी मिळते–जुळते विचारच इथल्या व्यापारी प्रतिनिधींनी, उद्योजकानी व्यक्त केले. ह्या आंदोलनामुळे ह्या वर्गाचं नुकसान फार मोठ्या प्रमाणावर झालेलं आहे. उद्योगधंद्यांमधल्या उत्पादनावर परिणाम झालेला आहे. गिऱ्हाईक व म्हणूनच एकूण धंदा रोडावलेला आहे. राज्याबाहेरील व्यवहारही ढासळू पाहात आहेत, लुधियानातले एक सायकल–कारखानदार म्हणाले की,...'हे निरर्थक आंदोलन असेच पुढे सुरू राहिले तर अत्यंत प्रगत समजल्या जाणाऱ्या पंजाबची अर्थव्यवस्थाच धोक्यात यायची शक्यता आहे. इथे आम्ही शीख–हिंदू एका घरातल्यासारखे वावरतो. माझा एक सख्खा भाऊ हिंदू आहे. जावई हिंदू आहे. हिंदू–शीख झगडा आमच्यासारख्या सामान्य नागरिकांत नाहीच मुळी! ते राजकारण्याच्या डोक्यातून निघालेलं खूळ आहे. त्याची व्याप्ती आता वाढते आहे. समाजाच्या खालच्या थरातून हे विष पसरत चाललेलं आहे. हा निव्वळ वेडाचार आहे. तो थांबला नाही तर पंजाबची धडगत नाही...'

जालंधरमध्ये मी हिंदी दैनिक 'पंजाब केसरी'च्या कार्यालयाही भेट दिली. लाला जगत नारायण ह्याच वृत्तपत्राचे संपादक होते. त्यांच्या निर्घृण खुनापासूनच ह्या प्रकारणाला खरी धार चढली. त्या प्रकरणातच जर्नेलसिंग भिंद्रनवाले प्रसिद्धीला आले. त्यानी त्या वेळी स्वतःच्या इच्छेनुसार स्वतःला अटक करवून घेतली त्याची अटक, नंतरची दंगल, विमानअपहरण आणि नतर त्याची सुटका–हे सारच एक मोठ नाटच होतं ! लालाजी आर्यसमाजी. साहजिकच अकालीच्या विविध मागण्याचे, खालसा पंथाचे, 'राज करेगा खालसा' घोषणेचे विरोधक. पंजाब केसरीतून त्यानी अकाली आंदोलनावर कडाडून टीका केलेली. भिंद्रनवाले ह्याच्या कट्टरतेवरही त्यानी हल्ले चढवलेले. साहजिकच त्यांचा अडसर अनेकाना नकोसा होता. शिवाय इंदिराजीची साथ होती असा संशय. अशा लालाजीच्या पंजाब केसरीच्या कार्यालयात साहजिकच, एकूण अकाली आंदोलनाविषयी, तो हाताळीत असलेल्या मार्गाविषयी कडवट प्रतिक्रिया मला ऐकायला मिळाली.

'... ह्याना परदेशाची फूस आहे यात शका नाही. तिथनं पैसाही येतो.. धार्मिक अंधःश्रद्धा सर्वसामान्य जनतेत असतातच. त्याचा गैरफायदा घेऊन, त्या भडकवण्याचा व त्याद्वारे ह्या सीमेवरच्या राज्यात गडबड-गोंधळ माजवण्याचे प्रयत्न चालू आहेत. हिंदू समाज त्यातनं भरडला जातो. सामान्य जनजीवन विस्कळित होऊन जातं, म्हणून हे आंदोलन निष्ठुरतेनं निपटून काढायला हव, हाच ह्यावरचा एक मात्र उपाय. अन्यथा ह्या आदोलनाचं लोण सर्वत्र पसरण्याचा धोका आहे. आसाम, नागालँड, मिझोराम वगैरे ईशान्य सीमा पेटलेली आहेच. दक्षिण अगदी शांत अजिबात नाहीच. पंजाबात शिखाच्या मागण्या आज मान्य केल्या गेल्या तर त्याचे पडसाद सर्वत्र उठतील आणि देशातलं एकूण राजकारणच अशक्य होऊन बसेल'

पंजाब केसरीच्या कार्यालयात ऐकायला मिळालेल्या ह्या उद्गारात बरच तथ्य आहे ह्यात वाद नाही, पण मग एकूण पंजाब प्रश्नावर तोडगा काय ? अबाला ते चंदीगढ ते अमृतसर लुधियाना-जालधर-पठाणकोट असा बराच पंजाब मी पालथा घातला. एकूण शीख समाज समृद्ध आहे ह्यात वाद नाही. सुरुवातीपासूनच्या परिस्थितीचा परिणाम म्हणूनही असेल कदाचित; पण पंजाबी, त्यातही विशेषेकरून शीख माणूस परिस्थितीवर मात करणारा, संकटांशी झुजणारा व कमालीचा आक्रमक असा आहे. त्यात पंजाब्याच्या नशिबाने त्यांना देशातील अत्यंत सुपीक असा प्रदेशही मिळाला असेलच भारतीय स्वातंत्र्यात त्याना व्यक्तिगत विकासालाही भरपूर वाव मिळाला. त्याचाही पंजाब्यानी व विशेषतः शिखानी पुरेपूर लाभ उठवला आहे ह्या साऱ्याचा परिणाम म्हणजे पंजाब हे देशातलं सर्वांत अग्रेसर अस राज्य आज आहे. दरडोई उत्पन्न पंजाबात सर्वांत अधिक आहे. धरणांखालील जमीन पंजाबात सर्वांत जास्त आहे. साहजिकच त्याचं शेतीउत्पन्नही सर्वांत जास्त आहे. उद्योगधंद्याच्या बाबतीतली त्याची घोडदौड तर खूपच बोलबाला झालेली आहे. भारतातल्याच नव्हे तर जगातल्या सर्व प्रमुख शहरांतनं दाढीवाल्या सरदारजीनी स्वत.चं बस्तान बसवल आहे. देशात तर अनेक महत्त्वाच्या जागी शीख विराजमान झालेले आहेत. एशियाडविरुद्ध शिखानी आदोलन छेडलं खरं; पण एशियाडच्या सोहळ्यात भारतातर्फे मानाच पान होतं सरदारजींनाच ! एवढ असूनही शिखाना देशात दुय्यम दर्जाची वागणूक मिळते हा त्याचा आरोप खरा किती व त्यात राजकारणाचा भाग किती ह्याचा अंदाज ज्याचा त्याने करावा. तूर्तास एवढं मात्र खरं की, सत्तास्पर्धेच्या राजकारणातून निर्माण झालेलं हे वादळ राजकारणाच्या मदांध पेल्यापुरतं आज मर्यादित राहिलेलं नाही ! त्याला हिंदू–शिखामधल्या धर्मयुद्धाचं स्वरूप आज आलं आहे आणि हे धोकादायक आहे.

## वाढत चाललेला धोका

ह्या धोक्याची व्याप्तीही हळूहळू वाढत आहे ह्याचा अदाज मी पठाणकोटला पोचल्यावर आला. पठाणकोटला डॉ. महाजन भेटले ते डोग्रा पंडित आहेत. त्याच्या मते, 'आज आम्हा काश्मिरी हिंदूनाही पंजाबातल्या शीख आदोलनाचा उपसर्ग पोहोचू शकतो. तिकडे आमच्या काश्मिरमध्येही जम्मतल्या व श्रीनगरमधल्याही हिंदूवर अनन्वित अत्याचार प्रत्यही होत आहेत. जम्मूतल्या आम्हा डोग्रा जमातीनं हे किती वर्षं सोसायच ? त्यापेक्षा लदाख–जम्मू व पंजाबातला पठाणकोट तालुका आणि हिमाचल प्रदेशातला कागडा-चंबा आदी परिसर मिळून विशाल जम्मू प्रात निर्मून तो भारतीय संघराज्यातला प्रदेश म्हणून जाहीर केला गेला तर ? तर कदाचित आम्हा जम्मूवासीय हिंदूचे हाल थाबतील. नाही तर परिस्थिती गभीर आहे. इथे आणि तिथेही ..'

पठाणकोट इथे एकूण पजाबी प्रश्नाला अगदीच वेगळी कलाटणी मिळते. हा प्रवेश जम्मूच्या अगदी जवळचा. जेमतेम शंभर किलोमीटर अंतरावरचा. इथे खूप काश्मिरी लोक सापडतात. त्यामुळे पजाबीबरोबरच डोग्रा, हिंदी भाषाचंही वर्चस्व जाणवू लागतं. त्यामुळे लुधियाना, जालंधर, अमृतसरप्रमाणे कडवा पंजाबी रुबाब इथे आढळत नाही. शीखही कदाचित पन्नास टक्क्यापेक्षा खूपच कमी असावेत, पण तरीही इथे आदोलनाची धास्ती जाणवते. त्याच वेळी शेजारच्या जम्मूत चाललेल्या तणावाचीही पडछाया इथे भेडसावते. त्यातून एक आगळाच विचार, वर दिल्याप्रमाणे ऐकू येतो.

¤

ह्यावर उपाय काय ? पठाणकोटहून जम्मूकडे कूच करताना बसमधल्या दोन, अडीच तासाच्या प्रवासात हेच प्रश्नचिन्ह मला वारंवार छळत होतं. गेल्या काही दिवसात पंजाबात जे ऐकलं, वाचलं, पाहिलं त्याचा आलेख डोळ्यांसमोर उभा राहात होता. 'पंजाबला खतरा तर देशालाही खतरा' हे वाक्य वारंवार मनात येत होतं. 'एशियाड' आणि 'एशियाडला खतरा' हे दोन्ही प्रश्न आशियाई स्पर्धांच्या सांगतेबरोबर संपले आहेत नि म्हणूनच मला वाटतं सर्वांनी मिळून ह्या प्रश्नाचा गभीर विचार करायला हवा आणि खऱ्या अर्थानं तिढा सुटायला हवा असेल, तर मला वाटतं सर्वांत आधी हिंदू–शीख लढा संपायला हवा. 'हिंदू–शीख ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्यातला झगडा हा घरेलू झगडा आहे व तो आपसात वाटाघाटी करूनच सोडवला पाहिजे.' हे मा. बाळासाहेब देवरसाचं मत आहे. मला वाटतं ह्या बाबतीतला आपला प्रामाणिक विचार शिखाना समजावून देऊन त्याचा विश्वास संपादन

करायचं कार्य संघ कार्यकर्त्यांना करावं लागेल. त्यासाठी पंजाबात राहून हिंदीचा आग्रह न धरता पंजाबीतूनच शिखांशी व्यवहार करून संघीय म्हणतात, मानतात तो हिंदू–शीख भ्रातृभाव पुन्हा एकदा निर्माण व्हायला हवा.

अकालीमधल्या लोंगोवाल-बादल गटानीही थोडी लवचिकता दाखवायला हवी असं वाटतं. इतर राज्याचा विचार न करता केवळ पंजाबलाच स्वायत्तता देणं केन्द्राला कदापि शक्य नाही हे त्यांना चांगलं ठाऊक आहे. त्याचप्रमाणे चंदीगढ वगळता बाकी विवाद्य प्रदेशांचा हट्टही केन्द्र चालू देणार नाही हेही अकाल्याना माहीत आहे. तेव्हा ह्या अवास्तव मागण्या सोडून देऊन त्यानी समझौत्याचा मार्ग स्वीकारणं आवश्यक आहे आणि तशी लवचिकता दाखवायला अकाली स्वतः तयार नसतील तर त्याना ती स्वीकारायला जनता राजवटीतल्या त्यांच्या सहकारी पक्षानी भाग पाडलं पाहिजे. विरोधी पक्षाचं ते एक राष्ट्रीय कर्तव्य आहे. नुसतं, हा प्रश्न अकाल्यांचा एकट्यांचा नाही; केन्द्रानं सर्व विरोधी पक्षाशी सल्लामसलत केली पाहिजे म्हणून मागणारं नाही, तर काही विधायक दृष्टिकोण स्वीकारून, निव्वळ 'कांग्रेस हटाव' एवढाच कार्यक्रम न ठेवता, वेळप्रसंगी अकाल्यानाही मित्रत्वाच्या नात्याने कानपिचक्या विरोधी पक्षांनी द्यायला पाहिजेत. कारण हा एक राष्ट्रीय महत्त्वाचा पक्ष आहे!

केंद्रसरकारनं एशियाडच्या वेळी अकाल्यांना रोखून धरून बाजी मारली आहे ह्यात शंका नाही; पण ही आक्रमक भूमिका कायम ठेवण्यानं प्रश्नाचा गुंता सुटणार नाही हेही लक्षात ठेवलं पाहिजे. अकल्याच्या योग्य अशा व पूर्वीच मान्य केलेल्या धार्मिक व चंदीगढ-विषयक मागण्या शासनानं पूर्ण करून अकाल्यांमधला लोंगो–वाल–बादल गटाचं नीतिधैर्य, मनोधैर्य वाढवावं. तसं जरी झालं तरी, अकाली वाटाघाटीना तयार होतील. अकाल्याच्या दुहीतून व हिंदू–शीख झगड्यातून कांग्रेसला फायदा कदाचित् होतही असेल; पण हा फायदा तकलादू असेल हेही केंद्रानं लक्षात ठेवायला हव. शिवाय कांग्रेसला कदाचित् फायदा होत असला तरी राष्ट्रपुरुषाला त्यातनं धोका निर्माण होतो आहे ह्याची पोच शासनानं ठेवून त्यानुसार पावलं उचलायला हवीत. त्यासाठी विरोधी पक्षानाही विश्वासात घ्यायला हवं!!

माझ्या माहितीप्रमाणे सरदार स्वर्णसिंग वरीलपैकी शेवटच्या दोन गोष्टीसाठी धडपडताहेत. संघानं पहिल्या सूचनेसाठी, आपल्या स्वयं-सेवकी वृत्तीनं का जग जंग पछाडू नयेत ??

पण हे असं होईल का? ह्या शक्तीना वर दिलेल्या मार्गांद्वारे पंजाब–प्रश्न सोडवणं शक्य होईल का ?? की सत्ताध राजकारण ह्या सान्या विचारांना बाजूला सारून नेहमीचं 'फोडा–झोडा' धोरणंच अवलंबेल ???

....गचका देऊन बस थाबली. चेकनाक्यावरची तपासणी चालू होती. मनातली विचारशृंखला त्या गचक्यानिशी तुटली. समोर पाहिलं. पाटी होती – "Welcome to Jammu & Kashmir"

मी जम्मूत दाखल झालो होतो!

□

# अकालींचा आनंदपूर ठराव

एशियाडच्या वेळी देशी-परदेशी पाहुण्याना अकालीच्या मागण्यां-संबंधी शिक्षित करावं ह्या हेतूनं अकाली दलानं 'आनदपूर ठराव आहे तरी काय?' अशी पत्रिका प्रसिद्ध केली. तिचा गोषवारा –

१८ व्या अखिल भारतीय अकाली परिषदेनं लुधियाना इथे १९७८ साली, हा श्री आनंदपूरसाहिब ठराव मंजूर केला. मुळात तो अकालीच्या कार्यकारी समितीन १९७३ मध्ये मंजूर केला होता.

ह्या ठरावानुसार अकालीच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत–

(१) गुरुद्वारांच्या अधिक चागल्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने अखिल भारतीय गुरुद्वारा कायदा करून मूलभूत शीख धर्मकल्पनाचा पुरस्कार करणे. अशा कायद्यामुळे आज विविध राज्यातल्या गुरुद्वारांच्या व्यवस्थापनातला विस्कळितपणा दूर करणे.

(२) अमृतसर 'पवित्र शहर' म्हणून जाहीर करणे व तिथे मद्यपान, सिगरेट वगैरेंवर बंदी घालणे.

(३) अमृतसर इथल्या सुवर्णमंदिरातून 'गुरुबाणी'च्या प्रक्षे-पणासाठी स्वतंत्र ट्रान्समीटर बसवायला परवानगी देणे.

(४) विविध भाषा, धर्म, जाती, जमाती, पंथ ह्यांनी विनटलेल्या भारताचं स्वरूप ध्यानात घेऊन 'फेडरल राजवट' प्रस्थापित व्हावी म्हणून घटनेत बदल करणे. थोडक्यात देशाच्या प्रचलित धोरणात बदल करून राज्यांना खऱ्या अर्थानं स्वायत्तता प्रदान करणे.

(५) चंदीगढचा पंजाबमध्ये समावेश करणे.

(६) खेडे घटक धरून शेजारच्या राज्यामधला सर्व पंजाबी भाषिक प्रदेश पंजाबमध्ये आणण्यासाठी भाषाप्रभूचं कमिशन नेमणे.

(७) रावी–बियास नद्याच्या पाण्यातला पंजावचा वाटा वाढवून मिळणे. अलीकडेच ह्या नद्यावर धरण बाधून आणखी काही पाणी हरयाणाकडे वळवण्यात आल आहे.

(८) भाक्रा-नानगल धरण, विद्युतकेंद्र ह्याचा संपूर्ण ताबा पंजाब शासनाकडे देणे.

(९) अलीकडे सैन्यात भरतीच्या वेळी लोकसंख्येच्या प्रमाणात त्या त्या प्रांतातल्या लोकांना स्थान द्यायला सुरुवात केली आहे. पूर्वीप्रमाणे लायकी–योग्यतेच्या आधारे प्राधान्य द्यायची प्रथा बंद झाली आहे. त्यामुळे शिखांचं सैन्यभरतीतलं प्रमाण १५–१८% वरून २–३% वर आलेलं आहे. त्यामुळे नवीन प्रथा बंद करून क्षमते-प्रमाणे सैन्यभरती केली जावी व शिखांवरचा हा अन्याय दूर केला जावा.

(१०) उत्तरप्रदेश, तेराई वगैरे भागात 'जमीन सुधारणा' नावाखाली शिखांवर होणारा अन्याय तावडतोब थाबला पाहिजे. कसेल त्याला जमीन. असा कायदा सर्वत्र तावडतोब लागू केला पाहिजे.

# इतस्ततः

## ◻ कॅनडा ते दिल्ली-जेल

आशियाई सामन्यांच्या वेळी शिखांविरुद्ध जे अटकसत्र अवलंबलं गेलं तेव्हा बऱ्याच वेळी तारतम्य बाळगलं गेल नाही हे प्राजळपणे कबूल करायला हरकत नसावी.

दिल्लीतल्या कॅंप जेलमध्ये गुरुदीपसिंग गिल नावाचे गृहस्थ, त्यांच्या पत्नी व ८।१० वर्षांचा मुलगा, एशियाड-काळात बंदिस्त होते. ते कॅनडातनं पंजाबातल्या नातेवाइकांना भेटण्यासाठी आले होते. मुलाला 'अपना मुल्क' दाखवायला आले होते. 'गलती' फक्त एवढीच होती की, ते एशियाड-काळात आले होते. पालम हवाई अड्डयावरून त्यांची रवानगी थेट कॅंप जेलमध्ये झाली.

अमेरिकेतनं आलेले ठाकोरसिंग, खुशालसिंग व पुरनसिंग हेही असेच विमानतळावरून थेट तिहार जेलमध्ये गेले. त्यांची वयं अनुक्रमे ६८, ७२ आणि ६० अशी आहेत. इंटरपोलने म्हणे त्यांच्याविषयी भारत सरकारला माहिती दिली होती. त्यांच्या मते, ते अक्षरशः कौटुंबिक भेटी—गाठीसाठी भारतात आले होते. वयं झाली म्हणून एकदा 'मुल्क' व 'अपने-वालो'ना भेटायला, पाहायला ते आले होते.

आईयासिंग हा सत्तरी गाठलेला मेरठचा व्यापारी पतियाळाला आपल्या नातवासह चालला होता. बस दिल्लीला येण्यापूर्वी वाटेत थांबवून दोघानाही जेलची हवा खावी लागली.

दिल्ली—अमृतसरला असे अनेक किस्से मला ऐकायला मिळाले. ◻

## ◻ लाठी आणि तलवार

" ··· ··· संघात कवायती चालतात, लाठी-काठी चालवायला शिकवतात, त्यांची संचलनं होतात, ह्या कारणानी संघाला निमलष्करी ठरवलं जातं. संघ हिंदूंची बाजू मांडतो, त्यांना संघटित करतो म्हणून तो जातीय ठरवला जातो. अशा 'जातीय' व 'निमलष्करी' संघावर बंदी घालायला आज देशभर सर्व टपले आहेत. मग पंथ खालसा किंवा अकाल्यांचं काय ? ते तर आज नखशिखात कडव्या जातीयवादाचं समर्थन करीत आहेत. त्यांच्या मिरवणुकी तर तलवारी, कृपाण ह्याच्याशिवाय निघूच शकत नाहीत; हे शासनाला कसं चालतं ? की अकाली लोक प्रत्येक प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरूप द्यायचा आणि प्रत्येक वेळी प्रच्छन्न दहशतवादाचा उपयोग करतात म्हणून शासन त्यांच्यापुढं नमतं घेतं ?"

······ जालंधरमध्ये एका कडव्या हिंदुत्ववाद्याची ही प्रतिक्रिया मला ऐकायला मिळाली.

ह्यावर तिथल्याच एका संघ-प्रचारकांची प्रतिक्रिया अतिशय बोलकी होती. ते म्हणतात, "भेदभाव नसावा हे कबूल; पण म्हणून अकालींच्या अशा मिरवणुकांवर बंदी असावी हेही मला पटत नाही. संपूर्ण लष्करी नाही तरी स्वसंरक्षणापुरतं काही तरी शिक्षण प्रत्येक समाजाच्या प्रत्येक व्यक्तीला आवश्यक आहे. हिंदूंना तर ते फारच आवश्यक आहे. वर्षानुवर्षे शांती आणि आत्मशुद्धी, आत्मोन्नती ह्यांचा इतका भडिमार हिंदू मनावर झालेला आहे की, 'समाज' म्हणून प्रतिकाराची त्यांची शक्तीच नष्ट झालेली आहे. त्यामुळेच कुठल्याही राजकारण्यांना अल्पसंख्यांकांची एकगठ्ठा मते मिळवण्यासाठी हिंदूंना सरसहा जातीय ठरवणं, ठोकून काढणं सोपं जातं. प्रतिकार होतच नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपासून सातत्यानं चाललेला हा खेळ थांबलाच पाहिजे... आणि त्यात शीख समाजाची मदत घेऊन, त्यांच्यापासून खूप काही शिकणं हिंदू समाजाला आवश्यक आहे..." ◻

## ◻ शिखांना न्याय द्या.... हॉकीचा विजय घ्या !

अकाली आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर जी काही अफाट वक्तव्यं करतात त्याचे अनेक नमुने मी माझ्या पंजाबातल्या भटकंतीत ऐकले. ह्यातली बरीच वक्तव्यं संत जर्नेलसिंग भिंद्रनवाले ह्यांच्या मठीतनं बाहेर प्रसृत होतात. मग रस्त्यावरचे शीखही तेच तुम्हाला ऐकवतात...

ह्यातलंच एक मासलेवाईक वक्तव्य ! "......आशियाई सामन्यात भारताचा हॉकीत व बाकीच्या खेळात दारुण पराभव झाला. साहजिक आहे; ह्या भारतीय संघातून शिखांची संख्या कमी झाल्यानंतर हे असंच होणार ! शिखांची संख्या जास्त होती तोपर्यंत भारत हॉकीत कधीच हरला नाही; आता तिथेही शिखांवर अन्याय करून चांगल्या शीख खेळाडूंना डावललं जातं आणि मग भारत हरतो !

......आता तर काय सैन्यातलंही शिखांचं परिमाण सरकार कमी करणार म्हणे ! हॉकीतला अनुभव तरी सरकारला शहाणपण देईल असं वाटतं......"

हे वक्तव्य भारतीय हॉकी संघाचे शिक्षक बलबीर सिंग व इतर खेळाडूंनी ऐकलं तर...?

कपाळावर हात मारून घेण्यापलीकडे काय करू शकतील बिचारे !!

—बंडू ठाणेकर

जम्मू–काश्मिरमध्ये रा. स्व. संघावर बंदी येऊ घातली आहे.

संघावर बंदी म्हणजे भारतापासून फुटून अलग होण्याची पहिली पायरी.

या पहिल्या पायरीवर आज काय स्थिती आहे ?

' माणूस प्रतिनिधी ' जम्मू–श्रीनगरला ही स्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी गेला.

तो लिहितो :

" काश्मिर खोऱ्यात हिंदू आज नावालाच उरले आहेत. देवळात मशिदी उभ्या होताहेत. प्रसिद्ध स्थानांची हिंदू नावे बदलून त्यांना इस्लामी नावे मिळताहेत आणि आता रोख जम्मूकडे आहे. लडाखही निम्मा मुसलमान करून झालाच आहे. अब्दुल्लांचे हात पाकिस्तानात पोचताहेत असं सगळे म्हणतात. . . . "

भारतीयांना प्रिय आणि पवित्र वाटणारी सिंधूनदी दुरावत चालली तेव्हा सावरकरांनी अक्षरशः टाहो फोडून, मोठा आकांत मांडून, आपल्या देशबांधवांना जागृत करण्याचा, वेळीच सावध होण्याचा अकटोविकट प्रयत्न केला.

तरीही ती ' सुरसरिता सिंधू ' भारतीयांना दुरावली ती दुरावलीच !

आता श्रीनगर–काश्मिरची आजची जेहलम,
प्राचीन काळची ती वितस्तानदीही दुरावत चालली आहे.

## या दुरावणाऱ्या जेहलमची हाक
## महाराष्ट्रात सर्वत्र पोचवणारा अंक

# माणूस

# जेहलम विशेषांक

**प्रसिद्धी लवकरच : तपशील पुढील अंकी**